

८ मार्च १९७५
क रुपया
चित्र वार्ता पुस्तक पुरवणीसह
माणूस
भारत
विश्वविजेता
झाला...
ोककुमार
हरचरण
अजितपाल
अस्लामशेर

प्राध्यापकांचे बहिष्कार आंदोलन

# समाजाचा ब्रेन आपल्या मागण्यांसाठी आज रस्त्यावर आला आहे

**–माणूस प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील प्राध्यापक वर्ग आज जागा झालेला आहे.

मागण्या स्पष्ट आहेत. विद्यापीठांच्या परीक्षांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय लावून धरला आहे. शासनाची विद्यापीठाशी चर्चा चालू आहे. परीक्षा होतील की नाही ? झाल्यास केव्हा होतील ? किती दिवस पुढे ढकलल्या जातील ? कोणालाच माहिती नाही. शासन, विद्यापीठ व प्राध्यापकही काहीच सांगू शकत नाहीत. मागण्या मान्य झाल्याशिवाय बहिष्कार उठणार नाही, एवढे मात्र निश्चितपणे दिसते आहे.

खाली मान घालून वर्गात प्रवेश करणारा, पुस्तक सांभाळीत कॉलेजबाहेर पडणारा, अधूनमधून चर्चासत्रात भाग घेणारा, काहीसा मवाळ, काहीसा अलिप्त, विद्यार्थीनींच्या चेष्टा, विद्यार्थ्यांचे कागदी बाण झेलत, मॅनेजमेंटची शिरजोरी मुकाटपणे मानणारा प्राध्यापक आम्हाला माहिती आहे. गेली अनेक वर्षे आम्ही तो पाहतो आहोत. परंतु बहिष्काराच्या आंदोलनातील प्राध्यापक निराळा आहे. अन्यायाविरुद्ध तो पेटून उठलेला आहे. सुसंघटीत नाही तरी आपल्या सगळ्या पातळ्यांवरील मतभेद विसरून तो एकत्र आलेला आहे. एकीतलं बळ त्याला जाणवलंय. 'हमारी युनियन हमारी ताकद' अशा घोषणा तो आडवेढे घेत का होईना देऊ लागला आहे. शासनाला, विद्यापीठाला, मॅनेजमेंटला त्याने ठणकावून आपल्या मागण्या पुढे टाकल्या आहेत. मारू किंवा मरू असा त्यांचा आवेश दिसतो आहे.

१४ मार्च. स. प. महाविद्यालयातील पुटाची सभा. सभागृहात शिरण्यापूर्वी थोडी पार्श्वभूमी. 'पुटा' पूना युनिव्हर्सिटी टीचर्स असोसिएशन ही २० वर्षापूर्वी स्थापन झालेली संघटना. नेमस्तपणा व मवाळ धोरण. कार्य फक्त पुणे शहर व आसपास. चर्चा, निवेदने यापुढे पाऊल नाही. थोडक्यात आंदोलनाच्या रिंगणातून माघार घेणारी ही क्लब टाईप संघटना.

पुक्टा ही संघटना धुळ्यात उदयास आलेली. अध्यक्षा सौ. नलिनी तारळेकर. कणखर नेतृत्व. धुळे, जळगाव, नाशिक, नगर अशा अनेक जिल्ह्यात नेटाने कार्य व भरघोस पाठिंबा. फेगडे प्रकरण शेवटपर्यंत लढविलेले. पुटाच्या कार्यकारिणीचा व अध्यक्षांचा बहिष्कारास विरोध असताना सुद्धा सर्वसाधारण सभेने बहिष्काराचा निर्णय घेतल्यामुळे पुटाचे अध्यक्ष भाऊसाहेब पटवर्धन व उपाध्यक्ष नाडकर्णी यांनी पूर्वीच राजीनामा दिला.

## गाजलेली सभा

१४ मार्चची सभा अनेक कारणाने गाजलेली. बहुसंख्य प्राध्यापक उपस्थित. त्यात तरुण प्राध्यापकांचा भरणा. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष प्रा. ढवळीकर. सभेत प्रचंड गोंधळ. प्रत्येकजण बोलण्यासाठी पुढे. सभा अनियंत्रितच झालेली. एवढे असले तरी बहिष्काराचा निर्णय मात्र शंभर टक्के. आंदोलनात फूट पडू नये या दृष्टीने निवडणुका न घेताच बरखास्त झालेली, गाजलेली व पुटात लढाऊ वृत्ती निर्माण करणारी ही सभा. या सभेत बहिष्काराचा ठाम निर्णय घेण्याची मागणी करणारे प्रा. दा. रा. गोळे व एन्. डी. मेहेता यांच्या हातीच लढ्याची सुत्रे.

प्राध्यापकांच्या मागण्या तरी काय आहेत ? ज्यासाठी हे आंदोलन उभे करण्यात आले आहे ती सर्व आर्थिकच आहेत. कामगार ज्याला 'वेतनवाढ' म्हणतो, त्यालाच प्राध्यापकी उच्च भाषेत 'वेतन श्रेणी अंमलात आली पाहिजे' असे म्हणून लढ्याचा श्रीगणेशा.

नोकरीची शाश्वती असावी. केंद्राने मान्य केलेली ७००–१६०० ची वेतनश्रेणी लागू करावी. (पश्चिम बंगालने ही श्रेणी लागू केली आहे.) डेमॉन्स्ट्रेटर, मेथड मास्तर, पी. टी. डायरेक्टर व लायब्ररीमन यांना प्राध्यापकांचे वेतन द्यावे, ट्रेझरीतून पेमेंट द्यावे, सर्व प्रकारची रिट्रेंचमेंट थांबवावी, हा मागण्यांचा जाहीरनामा. ◻

पुण्यातील प्राध्यापकांचा बहिष्काराला पाठिंबा मिळविण्यासाठी धडाडीने कार्य करणारे स. प. महाविद्यालयातील प्रा. दा. रा. गोळे. स्वातंत्र्याच्या लढ्याशी संबंध असल्यामुळे लष्करातून काढून टाकल्यानंतर प्राध्यापकाच्या पेशाकडे वळालेले. काश्मीरचा लढा, गोवा मुक्तिसंग्राम व बांगला देशाच्या स्वातंत्र्य-संग्रामात स्वतःहून एक स्वयंसेवक म्हणून कार्य केलेले. त्यामुळे धोरणात प्रखर लढाऊपणा.

'पगार वाढीसाठी हे बहिष्कार आंदोलन उभारले आहे काय ?'

'बहुतेक मागण्या आर्थिक आहेत हे मान्य पण त्यामागची पार्श्वभूमी लक्षात घ्या. समाजापासून अलिप्त राहणारा, समाजाच्या

मलपृष्ठ १ वर

# माणूस


| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २९ मार्च | अंक : त्रेचाळीसावा(४४) |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी ४३४५९ । मुखपृष्ठ : अनंत सालकर
छायाचित्र मांडणी : सुनिल कुरणे


केवळ दहा रुपये पगारवाढीवर माध्यमिक शिक्षकांचे आंदोलन थंडावले. त्याचवेळी प्राध्यापकांच्या आंदोलनातली हवाही निघून जाईल असे वाटले होते. पण 25 च्या मोर्चाचा कॉल देऊन हे आंदोलन आधीक उग्र करण्याचा 'पुक्टोचा' विचार दिसतोय.





# मुंबई



नरीमन पॉईंटवरील हे
शिपींग हाऊस.
शिपींग कार्पोरेशनचे कार्यकारी संचालक
के. एन. जी. मेनन यांनी गुरूवारी
२० मार्चला दुपारी अडीच वाजता
या इमारतीच्या पंधराव्या मजल्यावरून
उडी घेवून आत्महत्या केली.

शिवसेनेच्या महिला शाखेचा
कमिशनरच्या कार्यालयावर
गेलेला हा मोर्चा





'हम भी कुछ कम नही'

निसर्गाने अवकृपा केलेल्या या छोट्या छोट्या अपंग मुलांनी परवा मुंबईत मनोरंजनाचा एक सुरेख कार्यक्रम सादर केला.

बेलापूर रस्त्यावरील फायझर फॅक्टरीसमोर १७ मार्चला आमदार डॉ. दत्ता सामंत यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ मुंबईतील कामगारांनी काढलेला मोर्चा.



# मुक्काम अकलुज

**‘ हे सारं माझं राज्य आहे. ’**

ज्या बोटाच्या इशाऱ्यावर अकलुज हलते
ते अकलुज सम्राट
सहकार महर्षी मोहिते शंकर पाटील.









हिंदी चित्रपटाचा हा सेट नाही.
सहा लाख रुपये खर्चून जिर्णोद्धार केलेले
हेच ते महादेवाचे मंदीर.
गाभाऱ्याबाहेरची ही भिंत
वटबटीत रंगाने रंगवलीय.

उजव्या हाताला आहे
नांगर धरणारा शेतकरी
तर डाव्या हाताला हेलिकॉप्टर.
आधुनिक शेती, मोटर व
बेलबॉटममधला मुलगा व बॉबी

# शंकरराव मोहिते पाटील यांच्या राज्यात एक दिवस —स्वखर्चाने....

**प्रकाश जोशी**

यात्रा म्हटली की मामाचं गाव आठवतं. गॅसबत्त्या, माळरानावर देवीचं देऊळ, रंगीबेरंगी पताका, गोल फिरणारे पाळणे आठवतात. पाणी भरलेला रबरी चेंडू, पिपाणी दिसते. गोडी शेवेची चव तोंडात रेंगाळते.

'अकलूजच्या यात्रेला जाणार का?' संपादकांचा प्रश्न. मी एका पायावर तयार.

अकलूज स्टँडवर उतरलो. तांबडं फुटलेलं होतं. गार वारं. दूरवर बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज. स्टँडवर गर्दी. येणाऱ्यांची-जाणाऱ्यांची. यात्रेचा उत्साह जाणवला.

जो तो आपल्या घाईत. जवळचे पान-पट्टीचे दुकान, बारकसं हॉटेल, कटिंग सलून सजविलेलं. पलीकडे कोपऱ्यात 'यात्रा-स्पेशल' उभी. पण आत दोघंतिघंच. डोळ्यांवर झोप होतीच. उसळत घुसळत का होईना, एस. टी.त थोडी डुलकी लागलीच होती.

गाव जागं व्हायचं होतं. रस्ते सुनेच. मातीचे. फसाफस उडणारी धूळ. ट्रॅक्टर दुरुस्ती केंद्र, शेती अवजारे डेपो, बी-बियाणे, खतांचे होलसेलर्स यांची दुकाने दाटीवाटीने रस्त्यांच्या दुतर्फा बसलेली. मध्येच एखाद-दुसरी सहकारी संस्था. जाता जाता उडप्याचं बऱ्यापैकी हॉटेल दिसलं. हरितक्रांतीच्या नगरात 'रामभरोसे' टाईम हॉटेल्स असतील असं वाटलं होतं.

पण येथेही उडपी. आत ओळीनं चार टेबलं लावलेली. काऊंटरवर लुंगी दुमडलेला स्वामी. आत गेल्या गेल्या समोर मोठ्या तसबिरी. महात्मा गांधी, पंडित नेहरू, सुभाषचंद्र बोस व सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील. फोटो न्याहाळत मी चहाची ऑर्डर दिली. डाव्या हाताला हॉटेलच्या उद्घाटनाचा प्रशस्त फोटो. उद्घाटक अर्थातच मोहिते पाटील. समोर दोन पांढऱ्या कपड्यातील मध्यमवयीन पावमिसळवर ताव मारीत होते. चर्चेचा विषय भ्रष्टाचार. बहुधा ग्रामसेवक असावेत. खतांच्या काळ्या-बाजारात अमका तमका विकास अधिकारी व दोघे तलाठी कसे बडतर्फ झाले, नवा साहेब कसा आहे वगैरे वगैरे.

बाहेर पडलो. ताशा व झांझांचा आवाज ऐकून मागे वळलो. एक डौलदार तयार वळू सजवून वाजतगाजत चालविलेला होता. ताशा वाजविणाऱ्याला दहा वर्षांच्या मुलाची झांझेची साथ. पांढऱ्या शुभ्र वळूच्या कपाळी गुलाल माखलेला. बाकदार शिंगावर दोन तांबडे गोंडे लावलेले. ताशाच्या तालावर वळू झुलत डुलत निघालेला. मागे घरधणी-नीच्या कमरेवर बारकं पोरगं नी हाती शेळीची दोरी.

'काय बाबा कुणीकडं?'

काय खुळा आहे अशा नजरेनं त्यानं माझ्याकडे पाहिलं.

'जत्रा हाय नव्हं. तिकडं पशू परदरशनां-कडं चालविला हाये.' वेळ न घालविता ती मंडळी पुढे.

बऱ्यापैकी लॉज गाठली. सगळ्या कॉटस् फुल्ल. सगळी यात्रा मंडळी. म्हणजे प्रदर्शना-तील स्टॉलची संबंधित. तोंडावरून हात फिरविला.

'यात्रेला जायला एस्. टी. आहेत ना?'

'आहेत की. पण भरवसा नाही. पॅसेंजर भरले की सुटते. त्यापेक्षा असं करा, चौकात उभं राहा. ट्रक, ट्रॅक्टर, जीप कोणीही सोडेल. पण इतक्या सकाळी सकाळी काय आहे तिकडे?' मॅनेजरचा प्रश्न.

'शेतीबाबत चर्चासत्र वगैरे.'

'असेल बाबा. ते काय माहिती नाही. पण खरी मजा संध्याकाळीच असते. लायटिंग वगैरे जोरदार आहे.'

चौकात ताबडतोब जीप मिळाली. रस्ता पताका, कमानी यांनी सजलेला. आजूबाजूला झाडी. अकलूज गावातले रस्ते मातीचे. पण साखर कारखान्याकडे जाणारा रस्ता पक्का बांधलेला. अनेक यात्रेच्या दिशेने निघालेले. ट्रक, जीप, बैलगाड्या. पण बहुसंख्य पायीच. बरोबर पशुधन. पायात काही असो–नसो. चेहऱ्यावर यात्रेचा उत्साह.

पाच मिनिटांतच कृषी, पशू व औद्योगिक प्रदर्शन. टेकडीवर शंकरनगरातील महादेवाचे जीर्णोद्धारीत देऊळ. पायथ्याशी यशवंत सहकारी साखर कारखाना व लागूनच ४० एकरांत भरलेले प्रदर्शन.

प्रदर्शनाची कमान वेगळ्या पद्धतीची. दोन्ही बाजूला रंगीबेरंगी झेंडे. मध्यभागी छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्धपुतळा. पुतळ्याच्या उजव्या हाताला शंकरराव मोहिते पाटलांचा सहा फुटी हसतमुख फोटो व डाव्या हाताला त्यांचा मुलगा यशवंत साखर कारखान्याचा संचालक विजयसिंहाचा सात फुटी फोटो. चला, स्वागत तर चांगलं झालं!

प्रदर्शनाची मांडणी व व्यवस्था अप्रतीम. सजावट कौशल्यपूर्ण. निरनिराळे २३७ स्टॉल्स्. त्यात जास्त स्टॉल्स् पाणी खेचण्याच्या पंपांच्या कंपनीचे. त्याखालोखाल, ट्रॅक्टर, खतांच्या निरनिराळ्या कंपन्या, बी-बियाणांचे विक्रेते, शेतकऱ्यांना कर्ज पुरविणाऱ्या बँका, सहकारी संस्था, कुटुंबनियोजन, कृषी, सहकार इत्यादी सरकारी खात्याचे अनेक स्टॉल्स्. आपापल्या परीने प्रदर्शनाची रंगत वाढविणारे.

गर्दी वाढतच आहे. गटागटाने लोक आत येत आहेत. तिकीट नाहीच. म्हातारे-कोतारे, तरणे-ताठे बाया-बापड्या, पोरं-सोरं. झुंडीच्या झुंडी आत येत. चेहऱ्यावर उत्साह. बावरल्याचा भाव. नावीन्याचे कौतुक. नवे बघण्याची धडपड. लाजत-बुजत पुढे सरकत. समोर दिसणारे ट्रॅक्टर, पाण्याचे पंप, खताची पोती, धष्टपुष्ट जनावरं, दाणेदार पिकांच्या जाती आशाळभूत नजरेनं न्याहाळत गर्दी पुढे सरकत आहे. काही ठिकाणी रेंगाळते आहे.

पण कोणी थांबलाय, प्रश्न विचारतोय, माहिती घेतोय, काही शंका विचारतोय, किमत विचारतोय, असं फारसं दिसलं नाही. राणीचा बाग बघावा. कौतुकाने, उत्साहाने, जाता जाता म्युझियममध्ये चक्कर मारावी, तशा पद्धतीने प्रदर्शनातील गर्दी पुढे सरकत आहे. त्यांना थांबवून स्वतःहून माहिती सांगण्याचा प्रयत्न फारच थोडचा स्टॉलवर दिसला.

पाणी खेचण्याचा पंप तयार करणाऱ्या एका कंपनीचा स्टॉल. तात्पुरत्या उभारलेल्या पाण्याच्या टाकीतून पाणी उपसून ते परत टाकीतच सोडण्याचं प्रात्यक्षिक. त्यामुळे टाकीतील पाणी न संपता अखंड उसळतंच. शेजारी दोन तरुण शेतकरी. फेसाळणारं पाणी बघून त्यांचे डोळे लकाकले आहेत.

'असं पाणी मिळलं ना, तर सोनं हुईल सोनं.' एकाचे उत्स्फूर्त उद्‌गार फारच बोलके होते.

'काय कसं काय वाटतंय प्रदर्शन ?'

'ग्वोड हाये की.'

दोघंही अनवाणी. डोक्याला टोपी. अंगात कुडते. एकाचा पायजामा तर दुसऱ्याचे ठिगळ लावलेले मळके धोतर. चेहरे उन्हानं करपलेले. खुरटी दाढी वाढलेली. त्यातला एक बोलका वाटला.

'काय काय पाहिलंत ?'

'समदं पाहिलं. इंजिनं पायलीत. दुकानं पायलीत. काई ठिवलं नाही.'

'प्रदर्शन आवडलं ना. पण त्यापासून काही फायदा आहे का ?'

'हाय तर. केवडी मोठी इंजिन हाएत. खत हायेत. गुरं पाहाया मिळत्यात.'

'अहो, नुसतं पाहून काय फायदा ?'

'तेबी खरं हाय. करणाऱ्याला मोप फायदा हाये. नाही त्याला काय नाही. काहीबी झालं तरी भांडवल पायजे. नाहीतर टकामका बघत राह्याचं एकमेकाकडं.'

मी बघतच राहिलो. बघता बघता दोघंही गर्दीत विरून गेले. गर्दी पुढे सरकतेय. बॉबीच्या तालावर 'हमतुम एक कमरेमे...'

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या एका संशोधन केंद्राचा स्टॉल. मोजून ओळीनं पंधरा सोळा तक्ते. शाळेत मास्तर तयार करून घ्यायचे तसे. त्यांची शीर्षकं 'लवकर पेरणीचे प्रयोग', 'संरक्षक पाणी', 'हंगामामध्य दुरुस्ती' वगैरे. एका बाजूने आत गेलेले दुसऱ्या बाजूने बाहेर पडताहेत. तक्त्यांकडे शून्य नजरने बघत. स्टुलावर हात बांधून बसलेला शांतपणे बघतो आहे. त्याच्या संथपणात आहे शासकीय निरुत्साह. निर्विकारपणा. पाटचा टाकण्याची वृत्ती.

'काहो हे हंगाम दुरुस्ती म्हणजे काय ?' माझ्या प्रश्नाने त्याला जाग येते.

'कोरडवाहू जमिनीच्या अभ्यासावर आधारित निष्कर्ष आहेत. या भागातील पारंपरिक पेरणीचा दिवस जर पुढे घेतला तर दर एकरी उत्पन्नात वाढ होईल. जमिनीच्या बाईंडिंग कॅपॅसिटीवर खताचे परसेंटेज अवलंबून आहे.'

त्याची पुस्तकी बडबड सुरूच. इग्रजी शब्दांचा मारा. नुकताच बी. एस. सी. ॲग्रिकल्चर झालेला. त्यामुळे बरंच लक्षात असावं. शेवटी मीच त्याला थांबविलं.

'हे सर्व ठीक आहे. पण तुम्ही जे काही निष्कर्ष काढलेत त्याचा सामान्य शेतकरी कितपत उपयोग करतात.'

'शेतकऱ्यांच्या सवयी बदलायला फार त्रास पडतो. त्याला कारण त्याचं अज्ञान. पण एकदा त्यांना पटलं तर ते हळूहळू बदल करतात.'

पुढच्या स्टॉलमध्ये शिरण्यापूर्वी दोन मिनिटे स्तब्धपणे एक अनाऊन्समेंट ऐकत उभा राहिलो.

'आपल्याला शांती पाहिजे असेल तर आमच्या स्टॉलला भेट द्या. प्रजापिता ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाच्या ज्ञानरत्नाच्या स्टॉलला भेट देऊन आत्मज्ञान मिळवा. आपल्या मनाला समाधान देणारं प्रदर्शनातील एकमेव स्टॉल. भेट देण्यास विसरू नका.'—

आत्मज्ञान काय किलो मिळते हा प्रश्न विचारण्याचा मोह मी टाळला. मागे डेक्कन जिमखान्यावर भरलेल्या त्यांच्या प्रदर्शनाला एकदा भेट दिली असता 'मै क्या है, ये मै कहनेवाला मै कौन है' या 'मै'च्या चक्करात अर्धा तास वाया गेला होता. त्यामुळे चार हातांचे अंतर ठेवूनच मी पुढे सरकलो. दिवसभरात या स्टॉलवर फारशी गर्दी नव्हती. थोडीफार असायची ती चित्र बघत व 'ही मोटार आहे. हिचा ड्रायव्हर म्हणजे आत्मा'ची टेप पुन्हा पुन्हा ऐकत.

प्रदर्शन पाहून झाले. यात्रा समितीच्या कार्यालयात आमदारसाहेब काही कोठे दिसले नाहीत. विजयसिंह मोहिते पाटील भेटले. पांढरा झब्बा, पायजमा, कोल्हापूरी चपला व रुबाबदार मिशा.

'नमस्कार. मी माणूसतर्फे आलोय.'

'नमस्कार. अरे, यांची सगळी सोय करा.'

'मी माझी सगळी सोय केली आहे. प्रदर्शनही बघितलंय. यात्रा व इतर बाबतीत जरा माहिती हवी आहे.'

'थांबा हं, तुम्हाला पॅम्प्लेट देतो.'

'पॅम्प्लेट नकोत. जरा चर्चा करायची आहे.'

'असं होय. मग असं करा. तुम्ही साहेबांनाच भेटा. ते अध्यक्ष आहेत. त्यांनीच माहिती सांगणं बरोबर ठरेल. अर्ध्या एक तासात भेटतील ते.'

'चालेल.'

शंकरनगरातही पर्वती आहे. त्यावरील महादेवांच्या मंदिराचा सहा लाख रुपये खर्चून जीर्णोद्धार करण्यात आला आहे. मध्यभागी कारंजे आहे. दोन्ही बाजूंनी पायऱ्या. डाव्या हाताला यशवंत सहकारी साखर कारखान्यांची प्रतिकृती. भव्य प्रवेशद्वार. काम अजून पूर्ण झालेले नाही. बगिच्याची मशागत चालू आहे.

मंदिरासमोरच्या हिरव्या पॅगोडयावर चढलं की अकलूजची हिरवीगार पंचक्रोशी नजरेत भरते. कुस्तीचा भव्य आखाडा, शेजारी वाहणारा कॅनॉल, सिमेंट पाईप निर्मितीचा कारखाना, राजहंस कुक्कुट पालन केंद्र, सामुदायिक विहिरी, यशवंत सहकारी साखर कारखाना, कामगारांची वस्ती, अद्ययावत ऑफिस, दूरवर दिसणारे अकलूज गाव. शिवरत्न बंगला व दूरवर पसरलेली हिरवीगार शेती लक्ष वेधून घेते. माळराना-वरचा बेबंद वारा उल्हासित करतो. काही वर्षापूर्वी उजाड असलेल्या माळशिरसच्या माळाचा कायापालट किती विविध अंगाने झालाय ते जाणवतं. सहकार महर्षींच्या परि-श्रमाची कल्पना येते. कुस्तीच्या मैदाना-पलीकडे पशुप्रदर्शन भरले आहे. बैलांच्या गळयातले घुंगरांचे नाद परिसरात घुमत आहेत. त्यापलीकडे उभारलेल्या शामियानात रात्री पैंजणांचा झंकार उमटेल. करमणूक करण्यासाठी बरीच ' मंडळी ' जमलीत.

महादेवाच्या मंदिरातील जयपुरी मूर्ति-काराने बनविलेली मूर्ती, शंकरपार्वतीची मूर्ती मुबक आहे. गाभाऱ्यात भितीवर बिलोरी आरसे बसविलेले आहेत.

मंदिराच्या मंडपात शिरल्या शिरल्या एखाद्या हिंदी सिनेमाच्या सेटवर उभे आहोत असे वाटते. गाभाऱ्याबाहेरच्या भिंतीवर देखावे रंगविलेले आहेत. डाव्या बाजूला मागासलेला, नांगर हाकणारा शेतकरी व उजव्या हाताला आधुनिक शेती, कारखाना, बंगला, मोटार व त्याशेजारी गप्पा मारणारा तरुण व बेलबॉटमवाली तरुणी. जुन्या-नव्यातील, सत्य-स्वप्नातील फरक दाखवि-ण्याची कल्पना चांगली. पण देवळातील जागा चुकल्यासारखी वाटते. बाग तयार झाल्यावर एक चांगला ' पिकनिक स्पॉट ' तयार होईल.

खाली आलो. सहकार महर्षी आलेले नव्हते. यांची आमदारसाहेबांशी गाठ घालून द्या असं एका वेलफेअर ऑफिसरला सांगून विजयसिंह निघून गेले. उन्हामुळे गर्दी थंडा-वली होती. जेवण केलं व गेस्ट हाऊसवर थोडा आराम.

प्रदर्शनातील एकंदर व्यवस्था, टापटीप व कामाचा उरक जबरदस्त. एवढे मोठे प्रदर्शन अकलूजसारख्या ठिकाणी भरविणे म्हणजे सोपी गोष्ट नव्हे. पण कामाची व्यवस्थित विभागणी. यात्रा महोत्सव समितीच्या चौदा समित्या. शंकररावांचे सर्वत्र जातीने लक्ष.

यशवंतराव चव्हाणांपासून अनेक मंत्री, राज्यमंत्री, माजी मुख्यमंत्री प्रदर्शनास भेट देऊन गेले. रोज वीस-पंचवीस हजार लोकांनी भेट दिली. जनावरांचा बाजार, दुग्ध व पीक-स्पर्धा, पाकशास्त्र-स्पर्धा, चर्चा-सत्रे, कुस्त्यांचे फड असे अनेक कार्यक्रम पार पडले. चार साखर कारखाने, जिल्हा परिषद, सहकारी संस्थांनी या यात्रेचा खर्च उचलला असून राज्यपातळीवर भरलेले हे पहिलेच मोठे कृषी औद्योगिक प्रदर्शन.

बराच वेळ झाला. उन्हं उतरली तरी आमदारसाहेबांची भेट होईना. शेवटी ते ऑफिसमध्ये झोपल्याचे कळले. साखर कारखान्याचे ऑफिस एकदम पॉश. ऱ्ही आकाराची आधुनिक इमारत, हिरवेगार लॉन, सुरूची उंच झाडे. आधुनिक फर्निचर. बराच वेळ वाट पाहत थांबलो. यात्रेतील अनेकजण पोराबाळांसह ऑफिसला भेट देत होते. आमदारसाहेबांच्या चेंबरमध्ये काचेतून डोकावून बघत होते. एखाद्या मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करावा असे भाव चेहऱ्यावर.

आदल्याच दिवशी यशवंतराव चव्हाणांची प्रदर्शनास भेट झालेली. त्याचा शीण. साडे-सहा वाजता आमदारसाहेब उठून बाहेर आले. चेहरा थकलेला पण समाधानी दिसला. कालच झालेला गौरव डोळयातून ओसंडत होता.

' मी माणूसतर्फे आलोय. आपल्याशी चर्चा करायची आहे. '

' ठीक आहे. आपण वर भेटू. '

मला ' वर ' म्हणजे नेमके कोठे कळेना.

' यात्रा समितीच्या कार्यालयात. ' त्यांनीच वाक्य पूर्ण केले.

आमदारसाहेबांची गाडी बाहेर पडताच लोकं जागची हालली. सुस्ती गेली. आल्या आल्या आमदारसाहेबांची एका स्टॉलला भेट. माईकवरून अनाऊन्समेंट ' फोटोग्राफ-रने स्टॉल नंबर...अमूक अमूकवर ताबडतोब यावे. '

आमदारसाहेब यात्रासमितीच्या कचेरीत परतले तेव्हा कचेरी माणसांनी फुल्ल. काहींनी अंग चोरले. बोलण्यातला मोकळे-पणा संपला.

एक-दोघांना कटविल्यानंतर आम्ही बसलो. बैठक जमली. □

## " शेतकऱ्यांनी किती दिवस भणंग रहायचं ? तो बागायती करणार, कॅश पीक घेणार "

' हे प्रदर्शन मी बघितले. त्याची व्यवस्था, मांडणी व कल्पना आवडली. पण प्रश्न असा आहे, या सर्व खटाटोपाचा काही फायदा आहे का ? '

' फायदा आहे तर. अशा प्रकारचे प्रदर्शन ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर भर-विण्याचा हा पहिलाच प्रयोग आहे. या प्रदर्शनाला जोडूनच आम्ही अनेक विषयांवर चर्चासत्रे सुरू ठेवली. पशुप्रदर्शन भरविले. यातून शेतकऱ्याला खूप फायदा आहे.

' आता फायद्याचे उदाहरण घ्यायचे झाले तर माझं स्वतःचेच घ्या. प्रदर्शनातील दोन स्टॉल्स् आहेत. एक कोंबडयांच्या संवर्धनाचा व दुसरा मत्स्यालयाचा. दोन्ही स्टॉल पाहून माझ्या मनात एक कल्पना आलीय. कोंबडी पालन व मत्स्यपालन दोन्ही एकदम करता येतील. शेतीवर डिलिव्हरी चेंबरमध्ये आडवा अडसळ घालून त्यावर पिंजरे टांगले पाहिजेत. या पिंजऱ्यात कोंबडया ठेवल्या व पाण्यात मासे पाळले तर फार सोयीचे होईल. कोंबडीची विष्टा पाण्यात पडल्यावर मासे खातील व पाण्यात वाहून गेलेल्या विष्टेचा उपयोग खतासारखा होईल. काय आहे, अशा प्रदर्शनामधून नवी दृष्टी मिळते. नवे मार्ग दिसतात. मनोरंजन होते. अशा प्रकारचे उपक्रम सर्वत्र घ्यावेत असे मला वाटते. '

' यात्रा प्रदर्शनाची कल्पना कशी सुचली ? '

' येथील महादेवाचे मंदिर इतिहासप्रसिद्ध आहे. शिवाजी महाराजही येथे येत असत. माझं कुटुंबच शिवभक्त आहे. लहानपणी मी

एकादशी व श्रावणी सोमवारी मंदिरास भेट देत असे. पूर्वी मंदिर १० फूट व्यासाचे होते. त्याची मालकीही खाजगी होती. ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल माझा सत्कार करण्यात आला. अनेकांनी अनेक भेटी दिल्या. माझ्या आईने मला ' हरिविजय ' भेट दिला. माझ्या हातून धार्मिक कार्य व्हावे ही तिची इच्छा. माझ्याही मनाने घेतले. मनात आले की ' ॲक्शन ' ही होणारच. कारखान्याने मंदिर खरेदी केल्यानंतर त्याचा जीर्णोद्धार व यात्रा भरविण्याच्या कामास सुरुवात केली.'

' या उपक्रमामागची प्रेरणा धार्मिक आहे. '

' शेवटी माणसाच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी धर्म हवाच. अंधश्रद्धेने देवदेव करणे व टाळ कुटणे मला पसंत नाही. मानवतेच्या दृष्टिकोणातून मी बरेच काम केले आहे. मी शिवपार्वती ट्रस्ट स्थापन केला असून, त्याचा २० लाख रुपये फंड आहे. दुष्काळात १२ टँकरने पाणी पुरविले. विद्यार्थ्यांना मोफत जेवू घातले. याच ट्रस्टतर्फे, कन्याशाळा, पब्लिक स्कूल व सहकारी तत्त्वावर इस्पितळ उभारण्याची योजना आहे. '

' प्रदर्शनाच्या उपक्रमासाठी यात्राच का निवडली ?'

' यात्रा हा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग आहे. यात्रेत नुसता शेतकरी येत नाही तर त्याच्या बरोबर त्याचं सर्व कुटुंब येत. सामान्य शेतकऱ्यापुढे काही आदर्श ठेवण्यासाठी ही चांगली जागा आहे असे मला वाटते. '

' मघाशी मी या उपक्रमाचा काही फायदा आहे काय असे जे विचारले होते ते सामान्य शेतकऱ्यांच्या संदर्भातच. मोठमोठी अवजारे, ट्रॅक्टर्स, उंची खते, नवीन प्रयोग व तात्त्विक चर्चा यापासून तो काय मिळविणार ?'

' लहान शेतकऱ्यालाही यात बरेच घेण्यासारखे आहे. लहान शेतकरी आधुनिक यंत्रसामग्री घेऊ शकत नाही हे खरे आहे. शेतकरी फार अज्ञानी व परंपरावादी आहे. नवीन प्रयोग करण्याचे त्याला धैर्य होत नाही. कारण नुकसान सोसायची त्याची ताकद नसते. प्रयोगात धक्का सहन करण्याची क्षमता असलेल्या मोठ्या शेतकऱ्यांनी उदाहरण घालून दिले पाहिजे. कोणतीही नवी गोष्ट मी स्वतः माझ्या शेतावर करून पाहतो. माझी खात्री पटली की मग मी लोकांना सांगतो व लोक ती करतात. एखादी गोष्ट मला पटली की मी तिचा ध्यास घेतो. केवळ कीर्तन न करता प्रत्यक्ष करून बघतो व नंतर लोकांना करायला सांगतो. '

आमची चर्चा अगदी एकांतात चालली होती असं नाही. अनेकजण येत होते, जात होते. एका ग्रामपंचायतीच्या सरपंचाने एक लेखी निवेदन दिले. ते वाचून आमदारसाहेबांनी खिशात घातले. कोल्हापूरच्या एका शिष्टमंडळाची राहण्या–जेवण्याची सोय करण्याचा आदेश दिला. एक–दोघांना गोड बोलून बसविले. एक म्हातारे गृहस्थ टेबलापुढे येऊन उभे राहिले. डोक्यावर काळी टोपी, चष्मा, धोतर व मळखाऊ कोट. काही न बोलता बघत उभे राहिले.शेवटी आमदारसाहेबांनीच विचारलं काय पाहिजे म्हणून– ' काही नको. सहज आलो. प्रदर्शन बघितले. म्हटलं जाता जाता आपले दर्शन घ्यावे. काम काही नाही. '

' तुम्ही म्हणता, शेतकरी बागायती शेतीच करणार. पण परवा यशवंतराव चव्हाण तर म्हणाले की, धान्योत्पादनासाठी जिरायती शेतीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.'

' जिरायती करून काय मिळतं ? शेतकऱ्यांनी किती दिवस भणंग राहायचं. जिरायती करून जर उत्पादनखर्चही मिळत नसेल तर शेतकरी बागायती करणार. कॅश पीक घेणार. त्याला कोणी अडवू शकणार नाही. '

' पंचवीस वर्षांत महाराष्ट्रात शेतीबाबत जे प्रयत्न झाले त्यांचा फायदा बड्या शेतकऱ्यांनाच झाला. गरीब शेतकरी मात्र गरीबच राहिला. त्याच्यासाठी काय केले पाहिजे ?'

' कोण म्हणतो शेतकरी श्रीमंत झाला ? शेतकरी सुस्थितीत आहे असे म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही. एक टक्का शेतकऱ्यांची परिस्थिती बरी आहे. माळशिरस तालुक्याचं उदाहरण घ्या. जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून सुरुवातीस विकासकार्यासाठी १८ लाखांचं कर्ज घेण्यात आलं. ६७ साली २८ लाख कर्ज होतं तर आता ते २ कोटी ८० लाखांच्या घरात गेलं आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावरचं कर्ज वाढतच आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्षच होते. शेतात कुटुंब राबतं, बैलं राबतात, खत, पाणी, बियाणे यांचा खर्च आहे. पण धान्याची किंमत ठरते तेव्हा त्याचा विचार होत नाही. शेतकऱ्याच्या श्रमाची किंमत मिळालीच पाहिजे. उत्पादनखर्चाचा विचार करूनच धान्याची किंमत ठरली पाहिजे, अशी आमची मागणी आहे. शेतकऱ्यांना नुसता स्वार्थत्यागाचा सल्ला देऊन काही उपयोग नाही. पगारदाराचे उत्पन्न जसे महागाईला जोडलेले असते त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या वेळी सुद्धा त्याचा विचार व्हायलाच पाहिजे. '

' तुम्ही म्हणता त्याप्रमाणे सामान्य शेतकऱ्याची स्थिती अत्यंत वाईट आहे हे दिसतेच, पण वारेमाप खर्च करणाऱ्या श्रीमंत शेतकऱ्यांचं काय ?'

' कर्ज काढून सगळा शो आहे. मोटार घ्या, स्कूटर घ्या. जरा का मंदी आली तर फार वाईट परिस्थिती ओढवणार आहे. चिमूटभर मातीसुद्धा राहणार नाही हातात. कारखानदारीमुळे सध्या राहणीमान थोडं सुधारलंय एवढंच. '

वसंतराव नाईकांचा ट्रंक कॉल. कोपऱ्यातील फोन उचलला जातो. ' हॅलो.... बरं.... बरं.... बरं. नक्की जमेल. बरं बरं. ' एवढंच.


' हे प्रदर्शन आपल्या शक्तीचं प्रदर्शन भरविण्यासाठी आयोजित केलेलं आहे. राजकीय ताकद दाखविण्यासाठी भरवलंय असा एक आरोप आहे. '

' माझं आपलं विधायक कार्य चालू असतं. त्यात लोकांना राजकारण दिसतं, वारेमाप खर्च दिसतो. आम्ही खानदानी आहोत. खानदानी सौंदर्याला उगाच मिरवावं लागत नाही. अंगावर कपडे नसले तरी ते उठावदार दिसतं. नट्टापट्टा करावा लागत नाही. माझी राजकीय ताकद कायम आहे. तिचे प्रदर्शन करण्याचे मला काहीच कारण नाही. त्यामुळे ती वाढणार नाही किंवा कोणाची कमी होणार नाही. '

' महाराष्ट्रातील नेतृत्वातील बदलानंतर अनेक वाद, मतभेद संपले असून समझोते होत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील तुमच्या जगताप गटात समझोता होण्याची शक्यता ?'

' अहो, तात्त्विक मतभेद असतील तर समझोता वगैरे होतो. बापू–दादा वाद हा


पृष्ठ ११ वर




झुकझुक . . . आगीनगाडी
यात्रेचे एक आकर्षण.




तुमी सांगताय ते समदं पटतंय !
पर आमाला काय फायदा ?
, बीयाण, इंजीन घ्यायला पैसा पायजे की !
तो कुणीकुन पैदा करायचा ?



ज्याच्या घरी जर्सी
तेथे समाधान वास करी.
विलायती गोमाता.



काय आहे आत ?
खूप आहे. पण त्याचा मला काय उपयोग ?
आतला आत मग्न आहे.
मी बाहेरचा बाहेरंच आहे.






हातात बोचकं, कडेवर पोरगं
आणि चेहऱ्यावर बावरलेले भाव घेऊन
बाहेर पडलेली ही बाई.
काय मिळवलं तिनं या प्रदर्शनातून ?



खत घालणारा हा शेतकरी
एक देखावा . . .

तात्त्विक होता. तो मिटला. पण आमचा तात्त्विक वाद नाहीच मुळी. मी खरं म्हणजे वादात-भांडणात स्वतः पडत नाही. कोणावर टीका, हल्ले करीत नाही. कारण त्याची मला गरज नाही. मी काहीही केलं तरी जगताप गट माझ्यावर टीकेचा हल्ला करतो.

'मला राजकीय जीवनातून खतम करण्याचा काय कमी प्रयत्न झाला का? पण मी सर्वांना पुरून उरलो आहे. मला कोणाचा वरदहस्त नाही किंवा आशीर्वाद नाही. पण माझे स्थान अढळ आहे. लहान-मोठी विधायक कार्ये करीत मी लहानाचा मोठा झालेलो आहे. सामान्य लोकांतील माझ्याविषयीच्या आदराला, स्थानाला हात लावणे कोणाला कधीच जमणार नाही. या भागात मला आव्हान देणे सोपे नाही, हे बहुतेक लहान-थोरांच्या लक्षात आलेलं आहे. मी हाडाचा शेतकरी आहे. त्याच्या विकासासाठी जे जे विधायक काम करणे शक्य आहे ते केले आहे व करीत राहणार आहे.'

समोरच्या स्टॉलवरची एक कमान पडली. 'ए, ती कमान कोणाची पडलीय बघा.'

दहा लोक कमान उचलायला धावली. सर्वत्र बारीक नजर. कामाचा जबरदस्त उरक. लोकांकडून काम करवून घेण्याचे कसब. तेवढाच दरारा. तेवढीच बेपर्वाई. वेळ बराच झाला होता. अनेक मंडळी आमदारसाहेबांशी बोलण्यासाठी ताटकळत बसली होती. इतका वेळ खलबत करणारा हा कोण अशा नजरेनं बघत होती. तेवढ्यात एका स्टॉलचे मालक आले. भेट देण्याची गळ. मग शंकररावांसह सर्व ताफा त्या स्टॉलकडे. माईकवरून फोटोग्राफरला निमंत्रण.

अंधार पडलेला. गर्दी तुफान. प्रदर्शनाचे आवार – शंकरनगर – देवालय – आसपासची झाडी. साखर कारखान्याचे ऑफिस लुकलुकतंय. डोळे दिपविणारी विद्युत्‌रोषणाई. रस्त्याच्या कडेच्या झाडाझाडांवर तारकाच उतरल्यात असं वाटावं. प्रदर्शनाला भेट देणारा प्रत्येकजण कुतूहलानं, कौतुकानं न्याहाळतोय. प्रदर्शनाच्या बाजूला 'फन्‌-फेअर' आहे. मिनी रेल्वे आहे, दोन तोंडांचं माकड आहे, फसवे आरसे आहेत, मिनी थिएटर आहे, शेव-मिठाईची दुकाने आहेत. सगळा लोट शेवटी तिथं.


प्रदर्शन व यात्रेसाठी खास विजेचं कनेक्शन, पाण्याची सोय, आल्या-गेल्याची उतरण्याची सोय. प्रचंड भपका. अमाप खर्च. कोणासाठी? कोणाच्या पैशातून. उपक्रम स्वागतार्ह. नव्हे आवश्यकच. पण त्याचा फायदा सामान्य शेतकऱ्याला किती? त्याची बेरीज-वजाबाकी किती? तिथे येणाऱ्याला मनोरंजनापलीकडं

माझ्यावर कोणाचा वरदहस्त नाही.
मला कुणाचा आशीर्वाद नाही.
लहान-मोठ्या विधायक कार्यातून
मी वर आलोय.
तीच माझी खरी शक्ती आहे.

मोहिते पाटील.

मा. यशवंतराव

आणि 'अकलुज कुमार',
विजयसिंह मोहिते पाटील.





हे अकलुज कुमार विजयसिंह मोहिते पाटील.
शंकररावाचे चिरंजीव
त्यांच्या बरोबरीने यांचे फोटो, नाव
सध्या झळकू लागलं आहे.
प्रचंड वृक्षाच्या सावलीत वाढणारं हे रोपटं
आहे की स्वतंत्र क्षमता असणारं बीज आहे
हे कळायला काही मार्ग नाही.

## याचसाठी केला होता अट्टाहास ....




यात्रा, कृषी औद्योगिक प्रदर्शन यांना सर्वात जास्त गर्दी झाली ती परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी भेट दिली तेव्हाच.

## नुसतं प्रदर्शन यशस्वी झालं, लहानमोठे मंत्रीगण येऊन गेले एवढ्यावरच संपलं का ?

काही मिळालं की नाही ? का शेवटी ते एक प्रदर्शन ठरलं ? यात्रेच्या नावाखाली निव्वळ उधळपट्टी ठरली ? निव्वळ उधळपट्टी असेल तर या राज्यव्यापी यात्रेत व पंढरपूरच्या महायज्ञात फरक काय ? तेथेही समाजाच्या हिताच्या नावानं वारेमाप खर्च होतोच आहे ना. सार्वजनिक पैशाचा अपव्यय होत आहे ना ? नुसतं प्रदर्शन यशस्वी झाले, लहानमोठे मंत्रिगण येऊन गेले. लाख लोकांनी भेट दिली. व्यवस्था उत्तम होती, एवढ्यावरच संपले का ? मग तसे असेल तर एका पारंपरिक धार्मिक घटनेला एक सामाजिक आशय देण्याचा प्रयत्न आहे त्याचे काय ? ज्या यात्रेत तळागाळाचा लहानमोठा ग्रामीण माणूस सहकुटुंब एकत्र येतो, तेथे जर समाज-प्रबोधनाचे, लोकशिक्षणाचे थोडेबहुत का होईना कार्य जर झाले नाही तर प्रचंड खर्चाला अर्थ काय ? त्याचे प्रयोजन काय ? या यात्रेत त्या दृष्टीने प्रयत्न झाला नाही असे नाही; पण त्याचं प्रमाण फार कमी वाटलं. एखादे दोन पंप खरेदी करू शकेल, नवे प्रयोग करू शकेल असा श्रीमंत व मध्यमवर्गीय शेतकरी वगळता बहुसंख्य गरीब शेतकरी दुर्लक्षिलाच गेला. यात्रेच्या नियंत्रकांकडूनच नव्हे तर आपल्या मालाची जाहिरात, विक्री करणाऱ्या स्टॉलवाल्यांकडूनही.

उत्साह प्रचंड होता. प्रदर्शनाचे आवार गच्च भरलेले. वालचंदनगर इंडस्ट्रीच्या स्टॉलवर गेलो. तेथे कंपनीचे श्री. एस. डी. निलेकर भेटले. 'यात्रेत शेतकरी मोठ्या प्रमाणावर येतात. त्यांच्या मनावर कंपनीचे नाव व एम्ब्लेम ठसविता येते. यात्रा ही जाहिरातबाजीसाठी योग्य जागा असल्याचं लहान मोठ्या उत्पादकांच्या लक्षात आलं आहे. या प्रदर्शनाविषयी काय ? गर्दी खूप होती. आमची व्यवस्थाही चांगली होती. पण बारा दिवस म्हणजे टू मच. थोड्या दिवसांत सुद्धा जास्त लोक येऊ शकले असते. अनेक स्टॉलवर थोडी-फार विक्री झालेली, थोड्या-फार ऑर्डरी नोंदविलेल्या आढळल्या.'

'खरं सांगू का, आम्ही शेतकऱ्यांशी सुसंवाद साधू शकलेलो नाही.' हेक्स्टचे अधिकारी श्री. जी. आर. जोशी यांनी सांगितलं. 'शेतकऱ्यांना त्यांच्या भाषेत सांगितल्याशिवाय कळत नाही, पटत नाही. आमचे पोटेंशियल ग्राहक आमच्यापर्यंत येऊन गेलेत, पण आम्ही त्यांना काही देऊ शकलो नाही. अर्थात त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे अनेक मार्ग आहेत. वगनाट्य आहे, फिटपॅपलिंग आहे, ग्रामीण भागात पोहोचणारी वस्तू म्हणजे काड्यापेटी घ्या. तिच्यावर सोपा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचू शकतो. अनेक मार्ग आहेत.'

फिरता फिरता कारखान्यात वरच्या हुद्यावर असलेले व राजकारणात सहभागी असलेले एक गृहस्थ दिसले. बोलता बोलता विषय निघाला. विश्वास संपादन केला होताच. पहिल्यांदा ते बिचकलेच. नंतर जरा मोकळेपणाने बोलू लागले. 'या पंचक्रोशीचं राजकारच कळणं फार अवघड आहे. वेगळं आहे. बाहेरून ते कळणार नाही. इथला प्रत्येक माणूस शंकररावांना मानतो. अक्षरशः देवासारखा पुजतो. त्यांच्या सल्ल्यानुसार सगळं चालतं.'

'देवभक्ती निर्माण व्हावी असं त्यांनी काय केलंय ?'

'काय केलं नाही विचारा. इथल्या प्रत्येकासाठी त्यांनी काही ना काही केलंय. प्रत्येकाच्या डोक्यावर त्यांच्या उपकाराचे ओझे आहे. कधी कोणाला नाही म्हणणार नाहीत. कामाच्या बाबतीत वाघ माणूस. परत मीपणा नाही. कोणीही केव्हाही भेटावे. घरचा असो, दारचा असो. आदरातिथ्य केल्याशिवाय ते राहायचे नाहीत.'

'सामान्य माणसांचं ठीक आहे. पण तुमच्यासारख्या त्यांच्या बरोबरीने काम करणाऱ्यांचं काय ? तुम्ही तुमची मतं मांडता की नाही. कधी विरोधाचा प्रसंग येतो की नाही.'

'विरोध कशासाठी ? त्यांच्या सर्व योजना जर विधायक असतात तर विरोध कोण व कशासाठी करणार ? सगळे निर्णय एकमताने होतात. विरोधाचा प्रश्नच येत नाही. इथलं राजकारण कळायचं नाही असं मी जे म्हणालो होतो ते हेच.'

समोर शंकरनगराची विद्युत्‌अक्षरे तेजानं तळपत होती. साखर कारखाना, अकलूज, यशवंतनगर, माळीनगर ही शंकरनगराची उपनगरंच वाटावीत. शंकर-नगराचं सर्वत्र लक्ष आहे. वचक आहे. तिसरा डोळा उघडला तर समोरचा विरोध भस्म-सात झाल्याशिवाय राहणार नाही, असंच ती अक्षरं सांगताहेत असं वाटलं.

रात्र चढत होती. यात्रा रंगत होती. ढोलकीचा आवाज घुमू लागला. बरीच मंडळी तिकडेच वळाली. रात्री दीडपर्यंत गर्दी होतीच. फोटो घेतल्यावर लुकलुकते शंकरनगर सोडून अकलूजकडे परतलो.

सकाळी स्टँडवर आलो. तोबा गर्दी. यात्रा स्पेशल कोपऱ्यात उभी. जेमतेम पंधरा–वीस बसलेले. चौकशी केली. यशवंतराव आले तेव्हा ५० फेऱ्या झाल्या. इतर दिवशी जरा कमीच. खरी वाहतूक ट्रक व ट्रॅक्टर, ट्रॉली-मधूनच झाल्याची कबुली.

कोपऱ्यात पोरगं वर्तमानपत्र विकत होतं. एक वृद्ध. डोक्याला पटका. अंगात लांब सदरा. स्वच्छ धोतर. चेहऱ्यावर अनुभवाच्या सुरकुत्या. तिथंच मांड ठोकून तो बोलू लागला. आवाज तापू लागला. चार लोकं जमली. कोंडाळं वाढलं. म्हातारा उभा राहिला. आवाजाला धार आली. हातवारे वाढले. शनवारवाड्यावर उभा असल्यागत बोलू लागला.

'कायबी झालं की यानला पटकेवाला बरा घावतो. पाटलुनी घालून फिरत्यात नि मजा करत्यात. आज काय ह्याच्या किमती वाढल्या, त्याच्या किमती वाढल्या. पर आमची आठवण व्हते का ? आमी मरमर मरतुया पर धान्यांच्या किमती वाढवून मिळत्यात का...'

म्हातारा बोलतच होता. माझी एस. टी. सुटली. शेतकऱ्याची तळमळ, त्याचे दुःख सांगणारा तो वृद्ध यात्रेच्या पार्श्वभूमीवर खूप वेळ तरळत राहिला. ☐ ☐

# प्रेक्षक सहभाग : काही विचार

'Audience Participation' ही कल्पना आपण गेली काही वर्षे प्रायोगिक रंगभूमीच्या संदर्भात उच्चारीत असतो. परंतु प्रेक्षक सहभाग म्हणजे काय? तो कशासाठी आवश्यक वाटतो, याचा आपण पुरेसा विचार केलेला नाही असे आपल्या प्रायोगिक नाटकाचे दिग्दर्शन व प्रेक्षकस्वभाव पाहून वाटते. म्हणून एका इंग्रजी लेखाच्या आधारे याविषयीच्या चर्चेला चालना देण्याचा प्रयत्न केला आहे.

Tulane Drama Review या नियतकालिकाच्या T. 51 या अंकात Richard Schechner या लेखकाचा 'Audience Participation' हा लेख आहे. [आज हा लेख या लेखकाच्या Farrar, Straces & Giroax या प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात अंतर्भूत आहे.] हा लेखक वर उल्लेखिलेल्या नियतकालिकाचा एकेकाळचा संपादक व नाट्यगृहाबाहेरील नाट्यचळवळीतील एक महत्त्वाचा दिग्दर्शक म्हणून 'माणूस'च्या वाचकांना परिचित असेलच. ज्याला आज आपण 'environmental theatre' म्हणतो, ते आक्रमकरित्या प्रत्यक्षात आणण्यासाठी या दिग्दर्शकाने अनेक प्रयत्न केले. त्याचे विचार पुढील विधानात तीव्रतेने व्यक्त होतात—'Theatre is an unliterary art, a here and now experience. Its finest expressions are immediate, gestural, involved, inclusive and participatory.' या विधानातील 'here and now'चाच विचार त्याने लेखात विशद केला आहे. नाट्यप्रयोग एका विशिष्ट वेळी विशिष्ट स्थळी सादर केला जातो. तो सादर केला जात असतानाच अवतीभवतीच्या अवकाशावर हुकमत गाजवणे महत्त्वाचे! मात्र ही हुकमत सर्वस्वी नटाची नसावी यासाठी प्रेक्षकक्षेत्र व अभिनयक्षेत्र तो बेमालूमपणे मिसळून टाकीत असे. टांगत्या गॅलऱ्यातून, अभिनयक्षेत्रातून आडव्यातिडव्या पसरलेल्या मार्गांतून प्रेक्षक बसलेले असत.

सर्वसाधारण प्रेक्षागृहाची रचना अशी असते की, दुसऱ्या प्रेक्षकांच्या अस्तित्वाची किमान जाणीव व्हावी. या दिग्दर्शकाच्या मते प्रेक्षकाने केवळ नाटकाला सामोरे जाऊन चालत नाही—प्रेक्षकसहकाऱ्याला सामोरे जावे लागते आणि प्रेक्षागृहातील अवकाशावर स्वतःचा हक्क शाबीत करावा लागतो.

माओकडून कल्पना उसनी घ्यायची झाल्यास प्रेक्षक हे पाण्यासारखे असतात. त्यात नट पोहत असतात. पण पाणी आक्रमक झाल्यास नटांना मागे सरावे लागते. म्हणूनच प्रेक्षकांना अवकाशावर हक्क सांगण्याची, प्रसंगी तो हक्क मिळविण्याची मोकळीक असली पाहिजे. या पद्धतीने प्रेक्षकांना नाट्यप्रक्रियेचा सहभाग म्हणून अंतर्भूत केले की, ग्राहक-विक्रेता संबंध संपुष्टात येतो. खऱ्या अर्थाने व्यावसायिक रंगभूमीपासून विलग होता येते. अर्थात आपल्या वा कोणत्याही देशातल्या नाट्याविषयीच्या कल्पना हा प्रेक्षकसहभाग सोपा करीत नाहीत. त्यात अनेक अडचणी अपरिहार्य दिसतात. उदाहरणार्थ—

१. प्रयोगाची लय बिघडणे शक्य आहे.

२. सर्व सहभाग हा अखेर पूर्वनियंत्रितच राहणार कारण नाट्यवस्तू नटांना पूर्वपरिचित असणार.

३. सर्वांना मुक्तद्वार असा प्रयोग म्हणजे एक दिशाहिन गोंधळ होण्याची शक्यता आहे.

४. प्रेक्षक नाटक पाहायला येत असतील तर सहभागी होण्याचा कार्यक्रम व नाट्यप्रयोगाची रचना यात गोंधळ होईल.

५. अजून तरी नट वा प्रेक्षक दोघांनाही या सहभागाचे शिक्षण नाही.

यात आणखीही धोक्यांची भर घालता येईल. परंतु सहभाग विधायक होण्यासाठी पुढील काही गोष्टी करून पाहण्यासारख्या आहेत.

१. एकमेकींशी नाते नसणाऱ्या आकस्मिक लयी, पूर्वनियोजित लयीप्रमाणेच कलात्मकदृष्ट्या प्रस्तुत मानणे.

२. प्रत्येक प्रयोगात अशी एखादी जागा शोधणे की जिथे प्रयोगातील नट व प्रेक्षक समपातळीवर येऊन अनुभवाचे संशोधन करू शकतील.

३. नाट्यप्रयोगात अशी रचना शोधणे की जीत पूर्वनियोजित व पूर्वरचित स्वरूपास समांतर अशी मुक्त रचना असू शकेल.

४. एखादे दिवशी प्रयोग मध्येच थांबला तरी हरकत नाही. 'कम्यून'च्या एका प्रयोगात दोन तास थांबून प्रयोग सुरू झाला.

५. प्रेक्षकांना बोलता येते, हलता येते, नाचता येते, याची जाणीव करून देणे आवश्यक आहे.

प्रेक्षकांना 'कम्यून'च्या प्रयोगात सहभागी करून घेण्यासाठी पादत्राणे काढून आत येणे अशी अट होती. पाश्चात्त्य वातावरण लक्षात घेता नाट्यगृहातील औपचारिक सामाजिक संकेत मोडण्याचे ते प्रतीक असावे.

या प्रेक्षकसहभागात दोन विचारसूत्रे अंतर्भूत आहेत. त्यातील एक प्रेक्षक हा आळशी वा सुप्त घटक न मानता प्रत्यक्ष प्रतिक्रिया जागृत करणे हे आहे. दुसरे अधिक महत्त्वाचे नाट्यवस्तूचे म्हणजेच अनुभवाचे वातावरण नाट्यगृहाच्या प्रवेशद्वारापासूनच निर्माण करणे— 'enviromental Theatre' या दोन्ही विचारसूत्रांची मूलभूत चर्चा करावयाची असल्यास आपल्याला भरताच्या नाट्यशास्त्राची पुनर्मांडणी करावी लागेल.

अजून मराठी प्रायोगिक चळवळीत निकटवर्ती रंगमंचही प्रेक्षागृहाचा अवकाश व अभिनयक्षेत्राचा अवकाश वेगळा मानणारा आहे. दिलीप कोल्हटकरांच्या 'बूटपॉलिश' व 'राजाचा खेळ' यामध्ये अभिनयक्षेत्र वर्तुळाकार वा आडवे पट्टीसारखे असले तरी नाटक प्रेक्षकात घुसविण्याचा यत्न नाही. प्रेक्षकातून एखादा नट येणे वा प्रेक्षकांना अक्षता वाटणे यापलीकडे हा सहभाग जात नाही. वस्तुतः 'चल रे भोपळ्या' वा 'गोची' या स्वरूपात लवचिक होऊ शकेल— परंतु आमचे प्रेक्षकही स्वतःच्या नावारूपाचे भान टाकून सामील होणार नाहीत.

'रंगायन'च्या 'होळी'चा 'I. I. T.'च्या विद्यार्थ्यांपुढे प्रयोग चालू असताना हे विद्यार्थी प्रयोगात सामील झाले होते. शेवटी नटांना हे नाटक प्रेक्षकांकडून परत मिळवावे लागले होते. तरी छबिलदास शाळेच्या सभागृहात या स्वरूपाचे प्रयत्न व नंतर त्यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

यातील दुसरा मुद्दा वातावरण निर्माण करणाऱ्या प्रयोगाचा— त्याविषयी पुन्हा कधीतरी!

—पुष्पा भावे

# सोलकढी

## □ शहाणपण शिकवायचे वेड

आपल्याला आवडणारा अंगाचा साबण जसा आपण शोधपूर्वक निश्चित करतो तसेच सकाळी वाचायचे वर्तमानपत्रसुद्धा आपण शोधपूर्वक निश्चित केलेले असते. मला अंगाचा साबण कोणता आवडतो ते मी तुम्हाला सांगणार नाही. ते माझे एक सुगंधी, मुलायम, फेसदार गुपित आहे. पण रोज सकाळी मी 'महाराष्ट्र टाईम्स' वाचतो हे मात्र मला तुम्हाला कधी तरी सांगायचे होते. 'महाराष्ट्र टाईम्स'चे संपादक गोविंद तळवलकर यांना १९७४ सालचे दुर्गारतन पारितोषिक मिळाले याचे निमित्त करून, मला जे सांगायचे होते ते मी सांगून टाकले आहे. तळवलकरांना उत्कृष्ट वृत्तपत्रकारितेबद्दल हे पारितोषिक मिळाले, याचा आम्हाला संतोष वाटतो; पण त्याही-पेक्षा, आम्ही आधीच निवडलेल्या संपादकाला हा बहुमान मिळाला, हे आम्हाला अधिक संतोषकर वाटते.

खरे सांगतो, गोविंदराव तळवलकरांचे हे असे काही तरी होणार, असे आम्हाला पुष्कळ दिवसांपासून वाटत होते. पेनमध्ये शाईऐवजी तळमळ वगैरे भरून रोजच्या रोज-दररोज जर तुम्ही वाचनीय व विचारणीय अग्रलेख लिहू लागलात तर तुमचे दुसरे काय होणार ? आपल्याच हाताने रोज काही तरी लिहिणे काही लोकांना कसे जमते, याचा मला अचंबा वाटतो. आठवडाभरात 'सोल-कढी'ची दोन पाने लिहिताना माझे उभे अस्तित्व ठणकू लागते. त्यामुळे रोज काही लिहायची पाळी वैऱ्यावरसुद्धा येऊ नये असे मला वाटते. पण गोविंदराव भलेभरगच्च अग्रलेख गेले कित्येक महिने ज्या अखंड उत्साहाने लिहिताहेत तो पाहिला की, ते अग्रलेख लिहायची चैन करतात असे वाटते. अग्रलेखांपलीकडे, जाडयाजाडया इंग्रजी पुस्तकांचा परिचय करून देण्यासाठी आणि प्रसंगोपात्त खासखबरी लेख (उदा. 'जय-प्रकाश यांच्या समवेत बिहारमध्ये', 'नाथांचे भारूड') लिहिण्यासाठी संपादक तळवलकर शाई शिणवत असतात. शाईतून शहाणपण शिकवण्याच्या वेडाने हे बुवा झपाटलेले दिसतात.

आपले लोकसुद्धा असे मूर्ख : खरोखरच कधीकधी शहाणपण शिकतात. गोविंदरावांनी लिहिलेल्या 'नाथांचे भारूड' या प्रबोधक लेखांमुळे मराठवाडा विद्यापीठाच्या कार-भाराची चौकशी करणारी समिती नेमली गेली आणि कुलगुरू रे. पं. नाथांचे एकछत्री साम्राज्य उलटे झाले. महाराष्ट्रातल्या आम-दारांना राज्याबाहेर दहा हजार किलोमीटर्स-पर्यंत मोफत प्रवासाची सोय करायचा ठराव संमत होण्यापूर्वी गोविंदरावांनी त्याच्यावर टीका केली; आणि आश्चर्य असे वर्तले की, काही आमदारांनी हा टीकाबोध हृदयी धरून प्रावासिक सवलत नाकारली. मागे नाईक-मंत्रिमंडळवाढीच्या वेळी अनंतराव नाम-जोशींना वगळले, त्यालासुद्धा तळवलकरांनी केलेले त्या पुण्यश्लोक शिक्षणमंत्र्यांचे चरित्र-गान कारणीभूत ठरले, अशी वदंता आहे. एवढे कशाला, निक्सनच्या पदच्युतीमागे गोविंदरावांचा पेनधारी हात आहे, असे म्हणणारे बिनभाबडे लोक मला ठाऊक आहेत. तसा हा माणूस भयंकरच आहे. हवे तर विनोबा भावे, डॉ. शंकर दयाळ शर्मा, अब्दुल गफूर, बन्सीलाल, आर. डी. भंडारे, शशी भूषण, बारुआ, बॅ. अब्दुल रहमान अंतुले, रामराव आदिक, भाऊसाहेब वर्तक, जवाहरलाल दर्डा, प्रल्हादाचार्य बाळाचार्य गजेंद्रगडकर, पवार, आपटे, महाजनी वगैरे प्रतिभाशाली इंद्र–उपेंद्रांना विचारा : ते गोविंदजींना पाण्यात पाहत असतात.

मात्र यावरून, संपादक तळवलकरांनी लिहित्या हातात बंदूक किंवा तलवार किंवा तीरकमठा किंवा घण किंवा वाघनखे धारण केली आहेत, असा जर आपला समज झाला असेल तर तो निखालस चुकीचा आहे. त्यांच्या हातात लेखणीच आहे. या बाबतीत तेजस्वी मराठी पत्रकारपरंपरेचा वारसा तळवलकरांना सांगता येणार नाही ! आमच्या पत्रकारांनी काय काय एकेक शस्त्रे हाती घेऊन आपली ऊर्जस्वल अस्मिता सांभाळली, हे पाहिले म्हणजे उरात काही तरी उचंबळून येते. तळवलकरांना शस्त्राधार मानवत नसावा. शिवाय लेखणीने त्यांचे बऱ्यापैकी भागते. कारण खून चढवणे, भावना भडकवणे यापेक्षा माहिती पुरवून विचार करायला लावणे, सारासारविवेक जागा करणे, जबाबदारीची जाणीव करून देणे या गोष्टी त्यांच्या लेखणीला कराव्याशा




UH 744

वाटतात. आपल्याकडे आजसुद्धा शस्त्र चालवणारे पत्रकार पुष्कळ आहेत; लेखणी चालवणारे थोडेच आहेत.

तळवलकर आपल्या अग्रलेखात, विषय-निरुपणाच्या निमित्ताने, इतकी उपयुक्त माहिती तपशीलवार पुरवतात की वाचकाला त्या विषयाचे नेमके भान येते. इतकी माहिती त्यांना कशी असते, रोजच्या रोज कशी असू शकते, याचे मला आपले कौतुक आहे. तसा माहितीने लडबडलेला लेख मीसुद्धा वर्ष–सहा महिन्यांत एखादा लिहू शकेन. पण रोज? आठवड्याचे सात आणि महिन्याचे तीस दिवस? याला म्हणजे दररोज पुरणपोळ्या करणाऱ्या गृहिणीचाच उरक हवा. पुन्हा ही माहिती हवी तशी फसफशीतपणे सांडलवंडलेली नसते. ती जिथल्या तिथे असते. नेमून दिलेले काम निमूटपणे करते.

समतोलपणा हा तळवलकरी दृष्टिकोणाचा आणि लेखनाचा आणखी एक विशेष. मराठी लेखकाला समतोल शोभत नाही. असमतोल हा मराठी पत्रकारितेचा पाया आहे! तळवलकरांचा खाक्या वेगळाच (किंवा आगळाच) आहे. समतोल लिहिले नाही तर त्यांना उचकी लागते की काय कुणास ठाऊक. समतोल सोडून लिहिण्यातली आणि ते वाचण्यातली गूळगंमत त्यांना कधीच कळणार नाही. तळवलकरांच्या समतोलाचे एकच लाजवाब उदाहरण दिले तरी पुरेल : जयप्रकाश नारायण या लोकनायकाचे स्तोत्र गाण्यात गेले कित्येक महिने ते रंगदंगून गेले आहेत. जयप्रकाशांचे महाराष्ट्रातले आंदोलन तळवलकर आणि त्यांचे वाचक यांच्यापुरते मर्यादित आहे, असे आमचे एक मित्र म्हणतात. तळवलकर असे आणि इतके जयप्रकाशित झाले असले तरी जयप्रकाशांचीही चूक ते नेमकी देखूदाखवू शकतात. त्यासाठी २१ जानेवारी १९७५ रोजी त्यांनी लिहिलेला 'नेहरू की सरदार?' हा अग्रलेख मुद्दाम पाहावा. त्या अग्रलेखाला जयप्रकाश नारायणांनी त्या सुमारास बार्डोली येथे केलेल्या एका भाषणाचा संदर्भ आहे. या भाषणात, जयप्रकाशांनी सरदारांचे गुणगान करताना नेहरूंची निंदा केली होती. ते म्हणाले होते, सरदार पटेल यांच्यासारखा वास्तववादी नेता जर भारताचा पहिला पंतप्रधान नेहरूंच्याऐवजी झाला असता तर देश अधिक समृद्ध व बलवान झाला असता. सरदारांचे पाय जमिनीवर होते, तर नेहरूंचे मस्तक आभाळात होते. जयप्रकाशांनी केलेले नेहरू–पटेलांचे हे तौलनिक मूल्यमापन कसे अवास्तव आहे, हे सप्रमाण दाखवून देऊन तळवलकरांनी अग्रलेख संपवताना अशी समज दिली आहे : 'आज जयप्रकाश यांचे इंदिरा गांधींशी कितीही मतभेद असले तरी त्यांचे सावट ऐतिहासिक मूल्यमापनावर पडणे योग्य नाही. त्या वेळी वल्लभभाईंवर टीकास्त्र फेकणे हे लोकप्रिय होते, आज नेहरूंवरील टीकाही अनेकांना आवडेल; पण जयप्रकाश यांच्यासारख्यांनी हा मोह टाळला पाहिजे.'

कधी कधी मात्र तळवलकर सात्विक संतापतात. 'पुण्यश्लोक नामजोशी', 'नाथांचे भारूड', 'सचिवालयात मेहुण', 'सूक्ष्मातले विनोबा, स्थूलातले आपण', 'बीडचे संकटस्वामी', 'डांगे यांचा म्हातारचळ', 'पत्रक निघाले, सार्थक झाले' यांसारख्या मथळ्यांतून सुद्धा त्यांच्या संतापाची धग जाणवते. पण हे लेखनायकच इतके उपक्रमशील असतात की तळवलकरांचा सुद्धा नाइलाज होत असावा.

वास्तविक सकाळच्या सकाळी झटून अग्रलेख वाचावे असे माझे वय नाही. पण या 'महाराष्ट्र टाईम्स'मधले अग्रलेख वाचायची आता चटक लागून राहिली आहे. सकाळी वाचण्यासाठी 'महाराष्ट्र टाईम्स' हे वर्तमानपत्र ज्या कारणांसाठी मी निवडले, त्यातले अग्रकारण म्हणजे गोविंदराव तळवलकरांचा अग्रलेख. तो सकाळच्या-सकाळी वाचल्याचे समजल्यामुळे माझ्या वयाबद्दल गैरसमज होत असतील. पण मला त्याची पर्वा नाही. ◻



# □ मोहनदासांचा सत्याग्रह

जयप्रकाश नारायणांचे आंदोलन पुष्कळ-खूप दिवस चालले आहे. ते यशस्वी व्हावे अशी शुभेच्छा बाळगणाऱ्यांनी, ते यशस्वी झालेच आहे, होतच आहे, होणारच आहे, अशी साखर सगळीकडे वाटली आहे. उलट ते एक बंडेबुजगावणे आहे, असे स्वत:ला आणि इतरांना सांगत, काँग्रेसपक्षीय गुलाबरावांनी, तिकडे पाहायचे नाही, असे ठरवून टाकले आहे. दोघांचेही बरोबर आहे असे माझे ठाम मत आहे. एकाचे बरोबर ठरेपर्यंत. आत्ताचे माझे मत ठाम तसेच बरोबरसुद्धा राहाणार आहे. आणि एकाचे बरोबर ठरायला भारतात पुष्कळ-खूप दिवस लागतात. तोपर्यंत एखादी चकमक जयप्रकाश जिंकणार; एखादे खिडार काँग्रेसपक्ष बुजवणार.

मोहन धारियांना मंत्रिमंडळातून वगळून कांग्रेसने असे एक खिडार नुकतेच बुजवले. मोहन धारियांना पंतप्रधानांनी बडतर्फ केले की त्यांनीच हसतमुखाने (पाहा : गेल्या काही दिवसातली धारियांची छायाचित्रे.) राजिनामा दिला, याबाबत निश्चित असे काही सांगता आले नाही तरी आता ते मंत्रिमंडळात नाहीत, त्यांच्या मोटारगाडीवर झेंडा-दिवा नाही हे निश्चित बरे का. गेले काही दिवस, मोहनदास धारियांनी जयप्रकाश नारायण यांच्याशी संवाद करा, असा घोशा धरला होता. ही समाजवादी चालचलणुकीची माणसे घोशा धरण्यात महा चिवटचंगी असतात. वास्तविक, जयप्रकाश नारायणांशी संवाद करायचा नाही, असे काँग्रेसपक्षाने पक्के ठरवले होते. संवाद करण्याइतके जयप्रकाशांचे आंदोलन आणि अस्तित्व महत्त्वाचे आहे, असे काँग्रेसपक्षाला खरोखरच वाटत नव्हते. पक्षाला जे वाटते तेच आपल्याला वाटवून घेणारे पक्षी जवळजवळ सगळेच. धारियांसारख्या एखाद्याला पक्षापेक्षा वेगळे काही वाटते. अशाही वेळी चोच पंखात खूपसून निश्चल बसायचे असते. पण धारियांनी तरुणतुर्की चोच चावट चिवचिव करू लागली; करत राहिली.

जयप्रकाशांचे सगळेच साजुक चांगले आहे, असे धारियांनासुद्धा वाटत नाही. बिहार विधानसभा बरखास्त करावी आणि विद्यार्थ्यांनी शिक्षण सोडून आमूलाग्र परिवर्तनाचे कार्य हाती घ्यावे, या जयप्रकाशांच्या दोन कल्पना त्यांना अयोग्य वाटतात. मात्र निवडणूकपद्धती सुधारावी, शिक्षणव्यवस्था नव्याने मांडावी, भ्रष्टाचाराला पायबंद घालावा, या जयप्रकाशांच्या मागण्या नुसत्या योग्यच नाहीत तर सत्ताधारी काँग्रेसपक्षानेही योग्य मानाव्या अशा आहेत, असे या वैयक्तिक मालमत्तेचा तपशील जाहीर करणाऱ्या आणि प्राप्तीकर भरायला न विसरणाऱ्या मोहनदास धारियांना वाटते.

एकवेळ पाण्यात राहून सुसरीशी वैर धरता येईल; पण काँग्रेसपक्षात राहून इंदिराबाईंपेक्षा वेगळी सदसद्विवेकबुद्धी नाही धरता येणार. मोहनदास धारियांनी ती धरली. त्यासाठी सत्याग्रह केला. त्यांचे योग्य, उचित, आणि स्वाभाविक फळ त्यांना मिळाले : त्यांच्या मस्तकावरचा मंत्रिपदाचा मुकुट मातीत पडला. इतर अनेकांना त्याबद्दल वाईटवाईट्ट वाटले तरी धारियांना तसे बिलकुल वाटले नसावे. उलट धारियांसारख्या समाजवादी, सेवादलित, सैनिकी वृत्तीच्या कार्यकर्त्याला राजिनामा देण्यात काही हुळहुळीत आत्मिक समाधानच वाटते, असा माझा होरा आहे. म्हणूनच असले कार्यकर्ते अधूनमधून राजिनामे देत असतात.

मागे, २७ फेब्रुवारी १९६१ रोजी मोहनदासांनी प्रजासमाजवादी पक्षसदस्यत्वाचा असाच राजिनामा दिला होता. त्यावेळी प्रजासमाजवादीपक्षाचे सरचिटणीस नानासाहेब गोरे यांना पाठविलेल्या राजिनामापत्रात धारियांनी म्हटले होते : राष्ट्रवादावर हल्ला करून साम्यवादी समाजरचना आणण्याच्या कम्युनिस्टांच्या कारवाया व भांडवलशाही आणि परंपरावाद यांचेकडे खेचण्याचा स्वतंत्र पक्ष व जनसंघाचा प्रयत्न यामधून लोकशाहीवर आधारलेला समाजवाद निर्माण करण्याचे अवघड कार्य साधावयाचे असल्यास काँग्रेसमधील व आपल्या पक्षातील समाजवादी मंडळींनी सत्वर एकत्र येणे सर्वच दृष्टींनी अत्यंत आवश्यक आहे. तसे झाले तरच राष्ट्रउभारणीचे व लोकशाहीवर आधारलेली समाजवादी समाजरचना निर्माण करण्याचे महान कार्य आपण पूर्ण करू शकू.

आज, १४ वर्षांनी, ते महान कार्य पूर्ण करण्यासाठी जयप्रकाश नारायणांशी संवाद व्हायची आवश्यकता धारियांना वाटते. त्यांच्या काँग्रेसपक्षीय अन्य सहकाऱ्यांना मात्र ते महान कार्य आपणच पूर्ण करू, असा खंबीर आत्मविश्वास वाटतो. वाटण्यातले वेगळेपण उभयताना गैरसोयीचे. म्हणून मोहनदास धारियांनी राजिनामा दिला; इंदिरा गांधींनी त्यांना मंत्रिमंडळातून वगळले.

आता मोहनदास धारिया काय करतील, अशी फिकीर करायचे मात्र कारण नाही. महान कार्य करू पाहणारी माणसे तुमच्यामाझ्यासारखी कायम बुचकळ्यात पडून राहत नाहीत. त्यात पुन्हा धारियाजींना सदसद्विवेकबुद्धीची निरुपाय बाधा झालेली आहे.

अशी माणसे कुंपणावर समतोल साधून न बसता कुंपण ओलांडून चालत राहतात आणि सहसा दमत नाहीत.

—अनंतराव


बॉंबे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना पुणे-४ लक्ष्मीरोड पुणे-३०
मिलच्या दरांत
खरेदी करा !
मिलच्या
दुकानांत
खरेदी करा !!
सुपर ऑफर

**....इंडियन लोकांमध्ये येऊन एक महिना लोटला. खाणे-पिणे, आराम आणि समुद्रकिनाऱ्यावर भटकणे हाच पॅपिलॉनचा नवा उद्योग. लालीबरोबर त्याचा संसारही सुरू झाला होता. समुद्रातून शिंपले काढण्याची चांगली पद्धत त्यानं शोधून काढली. टोळीप्रमुख झेटोच्या छातीवर वाघाचं तोंड गोंदल्यापासून तर पॅपिलॉनचं महत्त्व फारच वाढलं. लालीची धाकटी बहीण झोरायमा हीसुद्धा त्याच्या गळचात पडली. काळ आनंदात जात होता पण आता त्याला पुन्हा आपल्या जगात जाण्याची ओढ वाटू लागली. दोन बायकांची समजूत काढणं अत्यंत कठीण होतं. एक प्रकारे प्राणाशी गाठच. तरीही त्यानं लालीचं मन वळवलं.........**

# पॅपिलॉन

मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**


ती रात्र खूपच आल्हाददायक होती. वस्ती सोडून जायला लालीकडून अनपेक्षितपणे मान्यता मिळाल्यानं छातीवरचं दडपण उतरलं होतं. परंतु त्या दोघी बहिणींची हळू आवाजात चाललेली कुजबूज ऐकून अंत:करणात दाटून येत होतं.

दुसऱ्या दिवशी तिघेजण परतलो. झोरायमाच्या अवघडलेल्या स्थितीमुळे हळूहळू जावं लागलं. येत्या पौर्णिमेनंतर आठवडयानं निघायचा बेत ठरला, कारण लालीला दिवस गेले असण्याची शक्यता वाटत होती. तिला त्याची खात्री करून घ्यायची होती. झोरिल्लोनं माझे कपडे आणावेत. गोआजिरा लोकांच्यात अर्धनग्न वावरून झाल्यावर मला पुन्हा पहिल्या वेशात यायचं होतं. परतीच्या सावकाश प्रवासाबाबत विशेष सांगण्यासारखं काही नाही. दोघींनी पुढे त्यांच्या खेडयातच राहायचं निश्चित केलं होतं. सर्व पुरुष आणि स्त्रियांपासून चार हात दूर राहायचं, अगदी गरज पडेल तेव्हाच त्यांच्यात मिसळायचं. झोरायमाला एकदा मूल झालं की तिनं समुद्रावर जात राहायचं, माझ्यासाठी खूप मोती साठवून ठेवायचे. लालीनंसुद्धा जास्तीत जास्त वेळ समुद्रात गुंतून राहायचं.

दहा-बारा शब्दांपलीकडे माझं गोआजिरा भाषेचं ज्ञान न गेल्यामुळे खूप वाईट वाटत होतं, कारण मला दोघींशी खूप खूप बोलायचं होतं. ते सर्व दुभाषामार्फत सांगणं अशक्यच होतं. आम्ही खेडयात पोचलो. सर्वप्रथम परवानगी न काढता गेल्याबद्दल झेटोची माफी मागणं आवश्यक होतं. झेटो आपल्या बापासारखाच उमद्या स्वभावाचा होता. मी काही बोलायच्या आतच तो म्हणाला, 'तू काहीही सांगण्याची जरूरी नाही, मला समजलं.' पौर्णिमा बारा दिवसांवर आली होती. म्हणजे इथलं वास्तव्य वीस दिवसांतच संपणार होतं.

नकाशात पाहून माझे पुढचे बेत वारंवार बदलत होते. कोणत्या ठिकाणी गेल्यावर आपल्याला जास्त सुख मिळेल ? इथे आपल्यावर प्रेमाचा जो वर्षाव होत आहे किंवा शांती अनुभवायला मिळतेय तशी नव्या जागी मिळेल याची खात्री काय ? सुधारलेल्या देशात जाण्याची धडपड करून मी दुर्दैव तर ओढवून घेत नसेन ना ? भविष्यात काय दडलंय कोणास ठाऊक !

पुढचे तीन आठवडे भराभर गेले. लालीला नक्की दिवस गेले होते. दोन किंवा तीन मुलं माझ्या परतण्याची वाट पाहणार होती. तीन कशी ? तिनं सांगितलं की तिच्या आईला दोनदा जुळी झाली होती. झोपडीचा माझा दरवाजा बंद करायचा नव्हता, फक्त त्याला आडवी फांदी ठोकायची. आमचा बिछाना छताला टांगून त्यात दोघींनी एकत्र निजायचं. कारण त्यांना जवळचं असं कोणी राहणार नव्हतं. मी झोरिल्लोला निरोप पाठवला, त्याप्रमाणे तो संध्याकाळी आला. आमच्या दारासमोर सर्व रात्रभर त्याच्या मदतीनं मी सर्वांशी



# प्रकरण दहा : सान्ता-मार्ता तुरुंग

बोलत राहिलो. प्रत्येक इंडियनाशी दोन दोन प्रेमाचे शब्द. त्यांनीही जवळजवळ तशाच भावना व्यक्त केल्या.

दुसऱ्या दिवशी दिवसभर मी दोघींच्या सहवासात पूर्ण वेळ काढला. आणि अखर माझी निघण्याची वेळ झाली. झोरिल्लोच्या द्वारा मी म्हणालो, 'झेटो, या वस्तीच्या लायक आणि सर्वश्रेष्ठ नायका, तू मला आपल्यामध्ये उदार आश्रय दिलास. इतकंच नाही तर सर्व काही दिलंस. मला आता खूप दिवसांसाठी तुमचा निरोप घ्यावा लागत आहे.'

'आपल्या चांगल्या मित्रांना दूर लोटून तुला जायलाच हवं का ?'

'होय, माझ्यावर ज्यांनी विनाकारण अन्याय केलेला आहे त्यांचा सूड घेण्यासाठी मला जायलाच हवं. मी इथे खरोखर सुखात होतो. अन्न, निवारा, तुमच्यासारखे मित्र आणि माझ्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या दोन बायका. मला आजवर इतकं समाधान कधीच मिळालं नाही. पण माझ्या शत्रूंशी मुकाबला केल्याशिवाय मला खरी स्वस्थता लाभणार नाही. शिवाय मी माझ्या वडिलांकडेही जाणार आहे, कारण त्यांना माझी जरूरी आहे. मी जात असलो तरी माझं अंतःकरण इथेच राहील. माझ्या दोन लग्नांची मधुर फळं लाली आणि झोरायमाच्या पोटात वाढत आहेत. माझी झोपडी केवळ त्यांच्याच मालकीची राहील. हे जर कोणी विसरला, तर झेटो. तू त्याला समज दिली पाहिजेस. तुझ्याप्रमाणेच 'उस्ली' नावाचा माणूस दोघींची दिवसरात्र काळजी वाहील. तुम्हा सर्वांवर मी मनापासून प्रेम केलं आहे आणि ते तसंच कायम राहील. मी लवकर परत येण्याचा आटोकाट प्रयत्न करीन. पण कामगिरी पार पाडत असताना जर मला मृत्यू आलाच तर माझे विचार लाली, झोरायमा, माझी मुलं आणि तुम्ही सर्व लोक–गोआजिरा प्रांतातील इंडियन्स–यांच्यापर्यंत येऊन पोचतील.'

मी झोपडीत शिरलो. दोन प्रेमळ बायका मागोमाग होत्याच. खाकी कपडे मी अंगावर चढवले, शिवाय बूट आणि मोजेही.

खूप वेळपर्यंत खेड्यातील सर्व गोष्टी मी डोळ्यात साठवून घेत होतो. सहा महिन्यांच्या वर इथे काढले होते. इतर इंडियन्स आणि गोरे लोक ज्या भागाला भयानक समजतात तो माझ्या दृष्टीनं स्वर्गच ठरला होता. मानवजातीच्या दुष्टपणापासून या लोकात मला संरक्षण मिळालं. प्रेम, शांती, मनःस्वास्थ्य, मनाचं मोठेपण, सगळं सगळं अनुभवायला मिळालं. अच्छा दोस्त हो, तुमच्या मागासलेल्या, रानटी जीवनमानातून मला खूप शिकायला मिळालं–पुढच्या आयुष्यात त्याचा नक्की उपयोग होईल. सुशिक्षित, कायद्यावर बोट ठेवणाऱ्या आम्हा लोकांपेक्षा तुम्ही खूप चांगले आहात !

लाली, झोरायमा, मी निघतो बरं. तुमच्या निर्व्याज, निर्मळ प्रेमाला तोड नाही. खरं नैसर्गिक, बिनहिशेबी प्रेम.

निघताना त्यांनी झोपडीत असलेले झाडून सगळे मोती एका पिशवीतून माझ्याकडे दिले. मी परत येईन, अगदी नक्की. केव्हा ? कसा ? ते सांगता येत नाही, पण वचन देतो की मी खात्रीपूर्वक परत येईन.

सायंकाळच्या सुमारास झोरिल्लोसह कोलंबियाकडे निघालो. मी डोक्यावर गवताची हॅट चढवली होती. घोड्याचा लगाम हातात धरून चालत होतो. खेड्यातला एकूणएक माणूस डाव्या हातानं आपला चेहरा झाकून आणि उजवा हात वर उंचावून मला निरोप देत होता. त्याचा अर्थ उघड होता, मी सोडून जातोय हे त्यांना खूप लागलं होतं. लवकर परत ये असं ते खुणावत होते. लाली आणि झोरायमा शंभरएक पावलं माझ्याबरोबर चालत आल्या. मला वाटलं की आता त्या माझं चुंबन घेणार असतील, एवढ्यात त्या एकदम वळल्या आणि किंचाळत आमच्या घराच्या दिशेनं धावत सुटल्या–पुन्हा मागे एकदाही न पाहता.

## ' सान्ता–मार्ता 'कडे

इंडियन प्रदेश आम्ही बघता बघता पार केला. ला व्हेला चौकी चुकवून जाण्यासही त्रास पडला नाही. पण आधी मी जिथून पळ काढला होता तो ' रिओ हॅशा 'चा पंचाहत्तर मैल परिसर धोकादायक होता.

दोन दिवसानंतर एका खानावळीत आम्ही खाद्यपेयांचा समाचार घेतला. तिथे कोलंबियन नागरिकांशी बोलण्याचा पहिला प्रयोग केला. अडखळत, जोर देऊन बोललं की तेच लोक माझी अर्धवट वाक्य पुरी करीत, वैतागानं. झोरिल्लो मदतीला होताच. या परीक्षेतून यशस्वीपणे पार पडलो. नंतर सान्ता मार्ताच्या दिशेनं पुन्हा कूच केलं. निम्मं अंतर कापल्यावर झोरिल्लो परतणार होता.

त्यानं ठरल्याप्रमाणे निरोप घेतला. मी घोडा बाळगणं धोक्याचं होतं. कारण त्याच्यामुळे माझा नक्की ठावठिकाणा लोकांना सांगावा लागणार होता, अडचणीत टाकणाऱ्या प्रश्नांना उत्तरं द्यावी लागली असती. ' तुम्ही अमुक अमुक यांना ओळखता का ? तिथल्या महापौराचं नाव काय ? श्रीमती ××× सध्या काय करतात ? तिथे गाडी कोणाकडे आहे ?' त्यामुळे झोरिल्लो घोडा घेऊन परत गेला.

मी पायी निघालो. लॉरी किंवा बस पकडून जाता येईल; सान्तामार्ता एकदा ओलांडलं की रेल्वे आहेच. त्या भागात मी नवखा आहे असं भासवायचं होतं–एका छोट्या कामानिमित्त त्या भागात यावं लागलं होतं. झोरिल्लोनं मला हजार सुटे पेसो (नाणी) दिले होते. त्या भागातली दिवसाची उत्तम कमाई आठ-दहा पेसो समजली जाई, म्हणजे माझ्याजवळ भरपूर पैसे होते. सान्ता–मार्ताजवळ जाणारी एक लॉरी मिळाली. तिच्यामुळे पंचाहत्तर मैलांचं अंतर विनासायास काटलं जाणार होतं.

दर सहा-सात मैलांवर दारूचे गुत्ते होते. एके ठिकाणी गाडी थांबवून ड्रायव्हरनं मला पिण्यासाठी बोलावलं. दारूचे पैसे मीच चुकते केले. पुढच्या तीस मैलांत हा प्रकार पाच वेळा झाला. तो पाचपाच ग्लास रिचवत होता आणि मी फक्त एकच. शेवटी तो एकदम तर्र झाला. त्याचा स्वतःवरचा ताबा इतका गेला की दिशा सोडून लॉरी बाजूच्या चिखलात जाऊन रुतली. खूप प्रयत्न करून निघता निघेना. काळजी करणं कोलंबियन लोकांच्या स्वभावात बसत नाही. त्यानं पाठीमागे ताणून दिली. पुढच्या सीटवर मलाही झोपायला सांगितलं. आता काय करावं हेच सुचेना. सान्ता मार्ता अजून पंचवीस मैल दूर होतं. गाडी बरोबर असल्यामुळे एक प्रकारची सुरक्षितता होती. वाटेत इतक्या वेळा थांबूनही कोणी मला प्रश्न विचारले नव्हते. शिवाय पायी चालण्यापेक्षा वेग नक्कीच जास्त पडला होता.

म्हणून पहाटे पहाटे मी झोपायचा निर्णय घेतला. जवळूनच दोन घोड्यांची गाडी येत होती. लॉरी वाटेत अडकल्यामुळे ती पुढे जाऊ शकत नव्हती. मी गाडीच्या पुढच्या भागात झोपलो असल्यामुळे ड्रायव्हर समजून मलाच त्यांनी उठवलं. झोपेतून उठल्या उठल्या एकदम बाजूला काय चाललंय, आपण कुठे आहोत ते समजत नाही. मी तसंच नाटक करून अडखळत बोलू लागलो.

गडबड ऐकून खरा ड्रायव्हर जागा झाला आणि घोडागाडीमधल्या माणसाशी वाद घालू लागला. खूप प्रयत्न करूनही लॉरी चिखलातून निघेना. दुसऱ्या गाडीत तीन छोट्या मुलींसह दोन काळ्या कपड्यातल्या धर्मोपदेशिका बसल्या होत्या. खूप चर्चा केल्यावर रस्त्याच्या बाजूने थोडी झाडंझुडपं साफ करून त्या गाडीला रस्ता करून द्यावा असं ठरलं. एक चाक रस्त्यावरून, दुसरं साफ केलेल्या कडेनं, अशी ती गाडी जाऊ शकणार होती, त्यामुळे वीस यार्डाचा चिखलही वाचणार होता.

गाडी बाजूला कलंडणार नाही अशा पद्धतीनं कडेचा रस्ता तयार झाला. या कामात तरी दोन तास गेले. सर्व झाल्यावर दोघीतल्या एका स्त्रीन माझे आभार मानले. विचारलं की मी कुठे निघालो होतो. मी उत्तरलो, ' सान्ता–मार्ता. '

' पण मग तुम्ही योग्य रस्त्यानं जात नाहीये. तुम्हाला आमच्याबरोबर मागे यावं लागेल. आम्ही तुला सान्ता–मार्ताजवळ सोडू शकू. अगदी पाच मैल अलीकडे. '

नकार देणं अशक्य होतं. नाहीतर माझ्याबद्दल संशय निर्माण करण्यासारखं होतं. ड्रायव्हरच्या मदतीसाठी मला तिथे थांबलं पाहिजे असं सांगायला हवं होतं, पण ते सर्व व्यक्त करणं कठीण वाटल्यामुळे मी बोलून गेलो, ' चालेल, चालेल. '

आणि काय, घोडागाडीत मागे तीन मुलींजवळ बसलो झालं. दोघीजणी पुढे बसल्या.

भलत्या रस्त्याला लागून लॉरी तीन चार मैल पुढे गेली होती, तेवढं अंतर आम्ही मागे आलो. चांगल्या मार्गाला लागल्यावर गाडीनं

छान वेग घेतला. दुपारचे बारा वाजायला आले. जेवणासाठी गाडी एका खानावळीपाशी थांबली. गाडीवाला आणि तीन मुली एका टेबलापाशी बसले. दोन नन्स आणि मी दुसऱ्या टेबलापाशी. त्या दोघी दिसायला चांगल्या होत्या, पंचवीस तीसच्या दरम्यान, गोऱ्यापान. एक स्पॅनिश, दुसरी आयरिश. दुसरीनं मला हळूच विचारलं, 'तू इथला नाहीस, बरोबर ना ?'

'इथलास तर आहे, बारांक्विला माझं गाव.'

'शक्य नाही, तू कोलंबियन नाहीस. तुझे केस खूप चांगले आहेत आणि कातडी केवळ उन्हामुळे काळवंडलेली दिसते. तू नक्की कुठून आलास ?'

'रिओ हॅशा.'

'तिथे तुझं काय काम होतं ?'

'इलेक्ट्रिक वायरिंग.'

'असं का ? तिथे वीज कंपनीत माझा एक मित्र आहे. त्याचं नाव पेरेझ. तो स्पेनचा रहिवासी आहे. तू त्याला ओळखतोस ?'

'होय, तो माझा चांगला मित्र आहे.'

'छान छान.'

जेवण झाल्यावर दोघीजणी हात धुवायला गेल्या. प्रथम फक्त आयरिश नन परत आली आणि मला फ्रेंचमध्ये म्हणाली, 'मी तुला दगा देणार नाही. पण माझी मैत्रीण म्हणते की तुझा फोटो वर्तमानपत्रात पाहिल्यासारखा वाटतो. रिओ हॅशा तुरुंगातून पळालेला फ्रेंच माणूस तूच ना ?'

नाकारणं जास्त धोक्याचं होतं. 'होय, सिस्टर. पण कृपा करून हे कुठे बोलू नका. ते समजतात इतका मी दुष्ट माणूस नाही. माझी देवावर श्रद्धा आहे, मी त्याला मानतो.'

स्पॅनिश नन आली. आयरिश तिला म्हणाली, 'होय.' नंतर त्या एकमेकींशी काय बोलल्या ते मला समजलंच नाही. त्या विचारात पडलेल्या दिसल्या. पुन्हा दोघी मोरीकडे गेल्या. त्यांच्या पाच मिनिटांच्या अनुपस्थितीत मी त्वरेनं विचार केला. त्या परत यायच्या आत पळून जावं का ? का थांबावं ? दोन्हीचा परिणाम सारखाच होणार होता. त्यांनी जर धोका दिला तर मी लगेच सापडू शकणार होतो. या भागात दाट झाडी अशी कुठेच नव्हती. मी त्यांच्यावर विश्वास ठेवायचं ठरवलं.

दोघीजणी हसत हसत परत आल्या. एकीनं माझं नाव विचारलं.

'अेन्‌रिक.'

'ठीक, अेन्‌रिक. आम्ही जातोय त्या कॉन्व्हेंटपर्यंत तू बरोबर ये. आता अजिबात काळजी करू नकोस. आमच्या गाडीत तू सुरक्षित आहेस. फक्त बोलू नकोस. सगळ्यांना असं वाटेल की तू आमच्या शाळेतला गडी आहेस.'

त्यांनीच पैसे चुकते केले. मी सिगारेटची बारा पाकिटं आणि लायटर खरेदी केला. आमचा प्रवास पुढे चालू झाला. वाटेत त्या माझ्याशी एक शब्दही बोलल्या नाहीत, त्यामुळे गाडीवाल्याला माझ्या अशुद्ध भाषेचा पत्ता लागला नाही. किती दयाळू अंतःकरण त्यांचं. संध्याकाळच्या सुमारास पुन्हा एका खानावळीत मुक्काम केला. बाहेर एक बस उभी होती. त्यावरची पाटी मी वाचली, 'रिओ हॅशा– सान्ता–मार्ता' या बसनंच जावं का ? मी आयरिश ननला विचारलं. 'नको रे बाबा, उगीच कशाला धोका पत्करतोस ?' ती म्हणाली, 'कारण वाटेत दोन ठिकाणी पोलिस चौक्या आहेत. तिथे तुम्हाला ओळखपत्र मागतात, आपल्या गाडीत ती भीती नाही.'

मी तिचे मनापासून आभार मानले. माझ्या मनातली उरलीसुरली भीतीही नष्ट झाली. किंबहुना या नन्स भेटणं हा एक चांगला योगायोगच ठरला. तिनं सांगितल्याप्रमाणे वाटेत लागलेल्या पहिल्याच पोलिस चौकीजवळ दोन बसेसची तपासणी चालू होती. वेळ रात्रीची. मी गाडीत मागच्या बाजूला आडवा पडलो होतो. तोंडावर गवताची हॅट ठेवून झोपल्याचं नाटक केलं होतं. माझ्या खांद्यावर डोकं ठेवून आठ वर्षांची एक मुलगी खरंच झोपली होती. चौकीजवळ आमची गाडी थांबली.

'तुम्ही सगळेजण ठीक आहात ना ?' स्पॅनिश नननी विचारलं.

'होय, सिस्टर.'

'उत्तम, चला आपण निघू या.' आणि आम्ही सावकाशपणे पुढे सटकलो.

रात्री दहा वाजता दुसरी चौकी लागली. इथे जास्त कडक तपासणी होत असावी, कारण ओळखपत्र नसलेल्या एका बाईला त्यांनी चौकीत नेलेलं मला दिसलं. जवळच बस उभी होती. त्यातल्या सगळ्या माणसांना खाली उतरवलं होतं. बायका–पुरुष एकच आरडाओरडा करीत होते. मी तर आशाच सोडली.

झोरिल्लोनं हे प्रकरण मला सांगितलं नव्हतं, नाहीतर बनावट ओळखपत्र बनवून घेता आलं असतं. मी मनाशी ठरवलं की या आताच्या दिव्यातून सहीसलामत बाहेर पडलो तर लागतील तेवढे पैसे खर्च करून आधी ओळखपत्र तयार करावं. सान्ता–मार्ता ते बारान्क्विला या प्रवासात ती अडचण यायला नको. बारान्क्विला हे अॅटलांटिक किनाऱ्यावरचं मोठं शहर होतं– अडीच लाखांच्यावर वस्ती असलेलं.

बसमधल्या लोकांच्या तपासणीतच फार वेळ गेला. आयरिश नन मागे वळून म्हणाली, 'स्वस्थ पड, एन्‌रिक्.' मी एकदम संतापलो. गाडीवाल्याच्या कानांवर हे शब्द नक्कीच पडले असणार.

आमची पाळी आल्यावर गाडी पुढे नेली. तिथे मोठा प्रकाश होता. मी उठून बसलो. कारण पडून राहिलं तरी त्यांना संशयाला जागा राहायची. बाहेरून माझ्या चेहऱ्याची एक बाजूच फक्त दिसणार होती. हॅट मी बरीच खाली ओढली होती. पण फारशी खाली नाही. शक्यतो सर्व काळजी घ्यावी.

'तुम्ही सर्वजण ठीक आहात ना ?' पुन्हा स्पॅनिश नन म्हणाली.

'होय, सिस्टर. पण तुम्ही इतक्या रात्रीचा प्रवास का करीत आहात ?'

**माझं भवितव्य त्या दोघींच्या हातात होतं, मी त्यांच्यावर विश्वास टाकला.**

' तसंच महत्त्वाचं काम असल्यामुळे. आम्ही फार घाईत आहोत. तुम्ही आमचा वेळ घेऊ नका. '

' तुम्ही जाऊ शकता सिस्टर्स. '

' धन्यवाद. ईश्वर तुमचं रक्षण करो. '

' आमेन. ' पोलीस म्हणाला. आमची गाडी तिथून निघाली. आम्हाला कोणी काहीही विचारलं नाही. शंभर यार्ड पुढे गेल्यावर त्यांनी गाडी थांबवली आणि दोघीजणी झुडुपाआड अदृश्य झाल्या. आयरिश नन परत आल्यावर मी तिचे मनःपूर्वक आभार मानले. माझं अंतःकरण हेलावलं होतं.

ती म्हणाली, ' त्यात विशेष काहीच नाही. पण आम्ही इतक्या घाबरलो होतो की त्यामुळे आमचं पोट बिघडलं. '

मध्यरात्री आम्ही कॉन्व्हेंटमध्ये पोचलो. उंच भिंती, प्रचंड दरवाजा. गाडीवाल्यानं घोडे सोडले आणि त्यांच्या व्यवस्थेला लागला. तीन मुलींना उचलून आत नेलं. दाराशी दोन नन्स् आणि प्रमुख सिस्टर यांच्यात कडाक्याची चर्चा चालू होती. आयरिश ननकडून कळलं की, मला रात्रीपुरतं तिथे झोपण्याची परवानगी काढण्यासाठी ती वरिष्ठ मदरला उठवायला तयार नव्हती. या क्षणी मी मूर्खासारखा वागलो. तिथून सरळ निघून जाण्याचा निर्णय घ्यायला हवा होता. सान्ता मार्ता अवघ्या पाच मैलांवर तर होतं.

या क्षुल्लक चुकीमुळे मला पुढे सात वर्षे जन्मठेप भोगावी लागली. चुकीचा निर्णय चांगलाच महागात पडला.

शेवटी मदरला उठवण्यात आलं आणि मला दुसऱ्या मजल्यावरची खोली देण्यात आली. खिडकीतून दूरच्या शहरातले दिवे दिसत होते. किनाऱ्याजवळचं दीपगृहसुद्धा दिसत होतं.

मी झोपलो. सकाळी दार ठोठावलं गेल्यामुळे मी जागा झालो. मला भयानक स्वप्न पडत होतं. लालीनं आपलं पोट फाडलं आहे आणि त्यातून आमच्या मुलाचे तुकडे तुकडे बाहेर पडत आहेत.

दाढी–आंघोळ जलद उरकून मी खाली आलो. मंद स्मित करून आयरिश ननने माझं स्वागत केलं. ' गुड मॉर्निंग, हेन्री; झोप चांगली लागली ना ?'

' होय सिस्टर. '

' आपण मदरच्या कार्यालयात जाऊ या. तुला भेटायची तिची इच्छा आहे. '

आम्ही आत गेलो. टेबलाच्या पलीकडे एक स्त्री बसली होती. पन्नाशीच्या जवळपासची, उग्र चेहरा असलेली मदर. डोळ्यांत दयेचा यत्किंचितही मागमूस नव्हता.

' तुला स्पॅनिश येतं ?' तिनं त्याच भाषेत विचारलं.

' अगदी थोडं. '

' ठीक, सिस्टर दुभाषाचं काम करील. त्या म्हणतात, तू फ्रेंच आहेस ! '

' होय, मदर. '

' तू रिओ हॅशा तुरुंगातून पळालास ?'

' होय मदर. '

' किती दिवसांपूर्वी ?'

' साधारण सात महिने झाले. '

' या काळात तू काय करीत होतास ?'

' मी इंडियन लोकांच्या वस्तीत होतो. '

' काय ? तू आणि इंडियन लोकांत ? अशक्य. ते रानटी लोक त्यांच्या भागात कोणालाही शिरकाव करू देत नाहीत. अजून एकही मिशनरी माणूस तिथे पोचू शकलेला नाही, यावरून कल्पना कर. तेव्हा मला असल्या थापा मारू नकोस. खरं सांग, तू कुठे होतास ?'

' मी त्या भागातच होतो, मदर. तसं सिद्धही करता येईल. '

' कसं काय ?'

' हे मोती पाहा, जे फक्त तिथेच समुद्रातून काढतात. ' माझ्याजवळची पिशवी मी तिच्याकडे सरकवली. तिनं ती उघडताच टेबलावर सगळे मोती पसरले.

' हे एकूण किती मोती आहेत ?'

' कुणाला ठाऊक. पण पाच–सहाशे तरी असावेत. '

' हा काही पुरावा होऊ शकत नाही. तू हे कुठूनतरी चोरलेसुद्धा असशील. '

' तुमची जर इच्छा असेल तर मी इथे थांबतो. तुम्ही चौकशी करू शकता, की कुठे मोत्यांची चोरी झाली आहे का. माझ्याकडे काही पैसे आहेत. इथला खर्च देण्याची माझी तयारी आहे. तुम्ही सांगेपर्यंत मी माझ्या खोलीतून हलणारही नाही. '

तिनं माझ्याकडे टक लावून पाहिलं. तिच्या या बघण्याचा अभिप्राय असावा, ' आणि तू पळालास तर काय ? आधीच एकदा तुरुंगातून पळाला आहेस. इथून ते काम तर जास्तच सोपं आहे. '

' माझी मोत्यांची पिशवी मी तुमच्याजवळ ठेवतो–ते माझं सर्वस्व आहे. चांगल्या विश्वासू हातात ती आहे याची मला खात्री आहे. '

' मग ठीक आहे. तुला खोलीत अडकून राहण्याची जरूरी नाही. सकाळी आणि दुपारी तू खाली बागेत येऊ शकतोस. त्या वेळी सगळ्या मुली आपापल्या वर्गात असतात. सेवकवर्गाबरोबर तू स्वयंपाकघरात जेवू शकतोस. '

मी बाहेर मोकळ्या मनानं आलो. आयरिश नन मला स्वयंपाकघरात घेऊन गेली. तिनं मला ब्रेड, लोणी आणि कॉफी दिली. माझा नाश्ता चालू असताना ती लक्षपूर्वक पाहत होती. तिचा चेहरा चिंतायुक्त वाटला. मी म्हणालो, ' थँक् यू, सिस्टर, तुम्ही माझ्यासाठी खूप कष्ट घेतले. '

' माझी आणखी मदत करायची इच्छा आहे, पण ते कठीण दिसतं–बस्स्, मी जाते हेन्री. ' आणि ती बाहेर पडली.




खोलीत येऊन मी खिडकीशी बसलो. समोर शहर, बंदर आणि समुद्र या सगळ्या गोष्टी दिसत होत्या. शहराबाहेर चांगली लागवड केली होती. मी संकटात असल्याची सूचना मन सारखं देत होतं. त्या रात्रीच पळ काढावा असा विचार सारखा येत होता. मोती गेले तर गेले. मदर ते कॉन्व्हेंटसाठी वापरो किंवा वाटलं तर स्वतः-साठी! माझा तर तिच्यावर अजीबात विश्वास नव्हता. एका कॉन्व्हेंटची मुख्य, चांगली सुशिक्षित असूनही तिला फ्रेंच येत नाही—अविश्वसनीय. सारांश, रात्री इथून सटकावं. दुपारी बागेत जाऊन भिंतीच्या कोणत्या बाजूनं बाहेर उडी टाकावी हे ठरवावं. दुपारी एक वाजता मला जेवण्यासाठी बोलावलं.

### अखेर घात झालाच !

खाली जाऊन जेवायला सुरुवात करणार, इतक्यात चार पांढऱ्या गणवेशातील पोलीस तिथे दाखल झाले. हातात बंदुका, सोबत एक पिस्तुलधारी अधिकारी.

'अजीबात हालचाल करू नकोस, नाहीतर मी तुला ठार मारीन.'

त्यानं माझ्या हातात बेडया ठोकल्या. आयरिश नन मोठ्याने किंचाळली आणि भोवळ येऊन खाली कोसळली. दोघींनी तिला सावरलं.

'चला जाऊ या.' तो म्हणाला. माझ्या खोलीत जाऊन त्यांनी सामानाची तपासणी केली. त्यातच छत्तीसशे सोन्याची नाणी होती. विषारी बाणांची केस न पाहताच बाजूला ठेवली—त्यांना नक्की त्या पेन्सिली वाटल्या असणार. पोलिसानं अधिकाऱ्याचा डोळा चुकवून पैसे खिशात घातले नाहीत हे नशीब. आम्ही निघालो. एक डबडी गाडी बाहेर उभी होती.

ड्रायव्हर काळाकुट्ट होता. त्यानं गाडी वेगात हाणली. मी इतका गलितगात्र झालो होतो की, किंचितही निषेध व्यक्त केला नाही. मी सावरण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होतो. दया, क्षमा मागायची ही वेळ नव्हती—पुरुषासारखं वाग आणि आशा कधीही सोडू नकोस. माझ्या मनात पूर्वीच्या सगळ्या प्रसंगाची उजळणी झाली. गाडीतून खाली उतरताना माझ्या मनाची एवढी तयारी झाली की, ताठ मानेनं मी चौकीत शिरलो. माणसात धैर्य हवं, मूषकासारखं वागू नये. पोलीस अधिकारी म्हणालासुद्धा, 'हा फ्रेंच माणूस पक्का तयार आहे. पकडला जाण्याचं त्याला सुतराम दुःख झालेलं दिसत नाही.'

माझ्या सामानाचा बोजा पायाशी ठेवून, न सांगताच मी खुर्चीवर बसलो.

'स्पॅनिश येतं का ?'

'नाही.'

दुभाषाला बोलावण्यात आलं.

'सुमारे वर्षापूर्वी रिओ हॅशामधून पळालेला फ्रेंच माणूस तूच ना?'

'नाही.'

'खोटं का बोलतोस ?'

'मी खोटं बोलत नाही. तो फ्रेंच माणूस मी नाही.'

'त्याच्या बेडया काढा. तुझा सदरा आणि जाकीट काढ पाहू.' त्यानं एक कागद पाहिला. त्यात माझ्या छातीवर गोंदलेल्या चित्रांचं वर्णन लिहिलं होतं.

'डाव्या हाताचा अंगठा नाही, म्हणजे नक्की तूच तो.'

'नाही, मी तो नाही. कारण मी सात महिन्यांपूर्वी पळालो होतो.

'एकूण एकच.'

'तुमच्या दृष्टीनं असेल पण माझ्या नाही.'

'लक्षात आलं. तुम्ही फ्रेंच आणि कोलंबियन खुनी सारखेच. अजीबात दाद देणार नाही. असो, माझ्यावरती एक अधिकारी आहे. तो तुझ्याबद्दल काय निर्णय घेईल ते सांगता येत नाही. मी तूर्त तुला तुझ्या साथीदारांच्या कोठडीत टाकतो.'

'कोण साथीदार ?'

'तूच कोलंबियाला आणलेले फ्रेंच लोक.'

मी पोलिसांच्या मागोमाग गेलो आणि पुन्हा पाच जिवलग मित्रांच्यात येऊन पडलो. आम्ही एकमेकांना आलिंगन दिलं. 'आम्हाला वाटलं, तू धोक्याच्या अगदी पार झालास मित्रा.' जोन्स म्हणाला. मॅच्युरेट तर रडायलाच लागला. तसा तो लहानच होता. बाकीच्या तिघांनाही मोठ्ठाच धक्का बसला होता. सगळ्यांना पाहून माझी गेलेली शक्ती पुन्हा जागृत झाली.

'आम्हाला सगळं सगळं सांग पाहू.' ते म्हणाले.

'नंतर. आधी तुमचं काय ते सांगा.'

'आम्ही काय, गेले तीन महिने इथे आहोत.'

'त्यांनी तुम्हाला चांगली वागणूक दिली ना ?'

'धड चांगलीही नाही, धड वाईटही नाही. आम्हाला बारान्‌क्विलाला रवाना करण्याची ते वाट पाहत आहेत. बहुधा तिथे आम्हाला फ्रेंच वरिष्ठांच्या ताब्यात देण्याचा त्यांचा विचार असावा.'

'किती हलकट आहेत इथले लोक! पण पळ काढण्याबाबत काय ?'

'ती शक्यता फारच कमी आहे.'

'का ? इथं काय विशेष वेगळी गोष्ट आहे ? तुमच्यावर कडक पहारा आहे ?'

'दिवसा फार नाही, पण रात्री खास गार्ड आहेत.'

'किती ?'

'तीन वार्डर्स.'

'तुझा पाय आता कसा आहे ?'

'चांगला आहे. आता मी लंगडत नाही.'

'तुम्हाला कायम आत ठेवतात ?'

'नाही. बाहेर ऊन खायला सोडतात. सकाळी दोन तास, दुपारी तीन.'

'इतर कोलंबियन कैदी कसे काय आहेत ?'

'ते धोकेबाज वाटतात. साधे चोरसुद्धा खुनी असल्यासारखे दिसतात.'

जोन्सशी गुप्त मसलत करून मी दुपारी बाहेर पडलो. ऑफिसात मला नेण्यात आलं. तिथे गव्हर्नर आणि सकाळचा माणूस असे बसले होते. गव्हर्नर काळाच होता. केस निग्रोसारखे कुरळे. पन्नाशीला झुकलेला, डोळे खुनशी. जाड ओठांवर बारीक मिशा आणि रागावलेला चेहरा. दुभाषा जवळ होताच.

'फ्रेंच इसमा, सात महिन्यांच्या अवधीनंतर तुला पुन्हा पकडलेलं आहे. इतके दिवस तू कुठे होतास ?'

'गोआजिरा लोकांच्या वस्तीत.'

'मला बनवाबनवी खपणार नाही. खरं सांग नाहीतर कडक

शिक्षा होईल.'

'मी सांगितलं ते सत्य आहे.'

'तिथे कोणीच राहू शकत नाही. या गेल्या एका वर्षातच त्यांनी किनाऱ्यावरील पंचवीस रक्षकांना ठार केलेलं आहे.'

'नाही. ते रक्षक स्मगलर लोकांच्या हातून ठार झालेत.'

'तुला कसं ठाऊक?'

'मी तिथे सात महिने राहिलेलो आहे. गोआजिरा लोक आपला प्रदेश कधीच सोडत नाहीत.'

'ठीक आहे. कदाचित तुझंही खरं असेल. पण तू पैसे कुठून चोरलेस?'

'ते माझेच आहेत. जस्टो नावाच्या टोळी-प्रमुखानं ते मला दिलेले आहेत.'

'इंडियन माणसाकडे इतके पैसे कुठून आले? आणि त्यानं ते तुला का दिले?'

'मला हे सांगा की, तुमच्याकडे सोन्याची नाणी चोरीला गेल्याची तक्रार आली आहे का?'

'नाही, अजून तरी नाही. पण त्याचा अर्थ असा नाही की चौकशीच करू नये.'

'जरूर करा, त्यात माझाच फायदा आहे.'

'भल्या गृहस्था, आधी तू रिओ हॅशा तुरुंगातून पळून जाण्याचा गुन्हा केलास आणि त्यात भर म्हणून अँन्टोनिओसारख्या खुनी माणसाला बरोबर घेतलंस, हे आणखी गंभीर कृत्य झालं. तू फ्रान्सच्या अधिकाऱ्यांना हवा आहेस. जन्मठेप तुझी वाट बघतेय. तू अत्यंत दगाबाज खुनी आहेस. इतर फ्रेंच कैद्यांजवळ तुला ठेवून पुन्हा पळून जाण्याची संधी आता मी देणार नाही. बारान्क्विला गावाला पाठवेपर्यंत तुला अंधारकोठडीत ठेवण्यात येईल. कोणी चोरीची वर्दी दिली नाही तर सोन्याची नाणी तुला परत करण्यात येतील.'

मला तळघरात जाणाऱ्या जिन्याकडे नेण्यात आलं. पंचवीस-एक पायऱ्या उतरून गेल्यावर डाव्या-उजव्या बाजूस अपुरा प्रकाश असलेले पिंजरे दिसले. याच त्या कोठड्या. एकीत मला टाकण्यात आलं. दार बंद झाल्यावर ओलसर जमिनीच्या कुजण्याचा वास आला. हा मूर्तिमंत नरकच होता. जाड गजांच्या प्रत्येक कोठडीत एक किंवा दोन कैदी होते. एकात तर तीन.

'तू काय केलंस? तुला इथे का टाकलं? हे मृत्यूचे सापळे आहेत, तुला ठाऊक आहे का?'

'तुम्ही गप्प बसा! त्याला बोलू दे.' एकजण ओरडला.

'मी फ्रेंच आहे. रिओ हॅशा तुरुंगातून पळालो म्हणून मला इथे टाकण्यात आलं आहे.' माझं धेडगुजरी स्पॅनिश त्यांना व्यवस्थित कळलं.

'ऐक, फ्रेंच माणसा. मी तुला काही गोष्टी सांगून ठेवतो. कोठडीत पाठीमागे एक लाकडी ओंडका आहे; तो पडण्यासाठी. उजव्या बाजूला पाण्याचं भांडं सापडेल. ते वाया घालवू नकोस, कारण सकाळी एकदा त्यात थोडं पाणी भरलं की दिवसभरात पुन्हा तुम्हाला पाणी मागता येणार नाही. डावीकडे लघवी-शौचासाठी बादली आहे, तुझ्या जाकिटानं ती झाकून ठेव. म्हणजे घाण वास येणार नाही. इथे इतकी उष्णता असते की जाकिटाची बिलकुल जरूरी नाही.'

गजापाशी जाऊन त्यांचे चेहरे पाहाण्याचा मी प्रयत्न केला. फक्त समोरचे दोन तेवढे दिसले. तंगड्या गजाबाहेर काढून ते बसले होते. एक स्पॅनिश-इंडियन, दुसरा निग्रो- सुरेख आणि तरुण, फक्त काळसर. निग्रोनं मला बजावलं की खूप भरती आली की लोठडीत पाणी शिरतं. समुद्र जवळच होता. कमरेच्यावर पाणी सहसा चढत नाही, त्यामुळे घाबरण्याचं कारण नव्हतं. उंदीर बरेच होते. त्यातल्या एकालाही अंगावर चढू द्यायचं नाही, मारायचं. पकडलं तर ते कडकडून चावतात. मी विचारलं, या अंधारकोठडीत येऊन तुला किती दिवस झाले?'

'दोन महिने.'

'इतरांचं काय?'

'तीन महिन्याच्या वर कोणालाही झाले नाहीत. तीन महिन्यानंतर तुम्हाला बाहेर काढलं नाही तर इथेच खाली तुमचा बुडून मृत्यू होणार असं समजावं.'

'जास्तीत जास्त किती दिवस इथे टिकता येईल.'

'आठ महिने, त्याहून जास्त टिकाव लागणं अशक्य आहे. एकाला आता आठ महिने पुरे होतील. गेल्या महिन्यापर्यंत तो केवळ गुडघ्यावर बसू शकत होता, आता तर साफ आडवाच झाला आहे. पुढच्या भरतीमध्ये तो नक्की बुडून मरणार.'

'म्हणजे तुमचा देश रानटी लोकांच्या वरताण आहे.'

'आम्ही सुधारलेले आहोत असं कधीच म्हणालो नव्हतो? काय खरं की नाही? तुमचा देशही काही फार सुधारलेला नाही, कारण तुलाही जन्मठेप मिळाली आहे. इथे कोलंबियात वीस वर्षांची शिक्षा किंवा मृत्युदंड-पण जन्मठेप कधीही देत नाहीत.'

'होय, तुझं म्हणणं खरं आहे, इथून तिथून सगळे लोक सारखेच.'

'तू खूप लोक मारलेस का?'

'छे, फक्त एक.'

'काय सांगतोस, अगदी अशक्य. केवळ एका माणसासाठी तुला जन्मठेप?'

'मी सांगितलं ते खरं आहे.'

'मग तुझाही देश माझ्या देशाइतकाच रानटी अवस्थेत आहे, काय?'

'असो, आता आपापल्या देशाची तरफदारी बंद. तुझं म्हणणं मान्य. सगळीकडचे पोलीस गांडूच असतात. बरं, पण तू काय केलंस?'

'मी एका माणसाला, त्याच्या बायकोला आणि मुलाला मारलं.'

'कारण?'

'त्यांनी माझ्या लहान भावाला रानडुकराच्या तोंडी दिलं.'

'देव जागा आहे, अशाही गोष्टी जगात घडू शकतात!'

'माझा पाच वर्षांचा गोड भाऊ- तो त्यांच्या मुलाला रोज खडे मारीत असे आणि बऱ्याच वेळा डोक्याला तडाखे देत असे.'

'म्हणून काय तसली शिक्षा द्यायची?'

'मला पकडल्यावर मी सुद्धा हेच म्हणालो.'

'तुला ते कळलं कसं?'

'तीन दिवस भाऊ बेपत्ता होता. मी शोध घेऊ लागल्यावर जवळच्या दलदलीवर मला त्याची सँडल सापडली. चिखल बाजूला केल्यावर नको ते दृश्य मला दिसलं. ठार करण्यापूर्वी त्या स्त्रीनं

कबुली दिली. गोळी झाडण्यापूर्वी मी त्यांना प्रार्थना करू दिली.'

'मग तुझं कृत्य योग्यच होतं. तुला शिक्षा काय होईल ?'

'वीस वर्षं.'

'इथे अंधार कोठडीत कसा आलास ?'

'एका पोलिसाला मी बदडलं, तो आता या तुरुंगात नाही.'

एवढ्यात दार उघडलं आणि वॉर्डरसह दोन स्वच्छता-कामगार तिथे आले. प्रत्येक कोठडीतल्या बादल्या एक मोठ्या टबमध्ये रिकाम्या केल्या जात होत्या. दोन वॉर्डर बंदुका धरून उभे होते. दुर्गंधी असह्य येत होती. कोणी बोलणं शक्यच नव्हतं. माझ्या खोलीतली बादली उचलणाऱ्या इसमानं काहीतरी वस्तू खाली टाकली. मी ती त्वरित पायानं अंधारात सरकवली. सगळे गेल्यावर मी पाहिलं तर सिगारेटची पाकिटं, लायटर आणि फ्रेंचमध्ये चिठ्ठी, दोन सिगारेट पेटवून मी समोरच्या कोठडीत भिरकावल्या. नंतर शेजारच्या लोकांना एक एक करून पेटवून दिली. सगळ्यांना देऊन झाल्यावर मग मी ओढू लागलो. मधल्या भागातील प्रकाशात चिठ्ठी वाचायचा प्रयत्न करू लागलो. पण अक्षरं कळत नव्हती. खूप प्रयत्नानंतर मी वाचलं, 'काळजी करू नकोस, पॅपिलॉन. आमच्यावर विसंबून राहा. स्वतःला नीट सांभाळ. उद्या तुझ्यासाठी कागद आणि पेन्सिल पाठवू, म्हणजे तुलाही लिहिता येईल. आमची तुला अखेरपर्यंत साथ राहील.' या चिठ्ठीमुळे मला किती धीर आला म्हणून सांगू ! मी आता एकटा नव्हतो, माझ्या मदतीला मित्रही तिथे होते.

न बोलता सर्व धूम्रपान करीत होते. मी दिलेल्या सिगारेटच्या संख्येवरून अंधारकोठडीत एकूण एकोणीसजण होते. मी पुन्हा एकदा या नरकात येऊन पोचलो होतो आणि आता प्रकरण गळ्यापर्यंत आलं होतं. त्या दोन्ही सिस्टर्स सैतानच निघाल्या. निदान स्पॅनिश नन तरी ! मी त्यांच्यावर विश्वास टाकण्याइतका बुद्दू कसा झालो ! छे, त्या नसतील. मला त्या धोका देणार नाहीत. कदाचित गाडीवालाही असेल. दोन तीन वेळा आम्ही निष्काळजीपणे फ्रेंचमध्ये बोललो होतो. कोणामुळे का असेना, मी अडकलो खरा ! शेवटी परिणाम एकच.

आता या बुडणाऱ्या कोठडीत येऊन पडलो होतो. दिवसातून दोनदा तरी आत पाणी शिरत होतं. उष्णता इतकी होती की सदरा-विजार काढून टाकावी लागली. बूटसुद्धा काढले. सर्व वस्तू गजांवर टांगल्या.

पंधराशे मैलांच्या समुद्रसाहसाची अखेर अशी व्हावी ! इथे ! केवढे प्रचंड यश. प्रिय ईश्वरा, तू आता मला वाऱ्यावर सोडणार का ? आजवर तूच मला मुक्त हातानं मदत केलीस ना ! कदाचित तू रागावलाही असशील– काही झालं तरी तू मला स्वातंत्र्य मिळवून दिलं होतंस, मला हृदयाशी धरणारा समाज दिला होतास, एक सोडून दोन प्रेमळ बायका दिल्यास. आणि तू मला सूर्य आणि समुद्र मुक्तपणे उपभोगण्यासाठी दिलेस. जिचा मी सार्वभौम मालक होतो अशी झोपडी दिलीस. अगदी पुरातन, नैसर्गिक-साधं आयुष्य, पण किती सुखद. क्लेश, दुःख, विकारविरहित आयुष्य. तू मला खऱ्या अर्थानं स्वतंत्र केलं होतंस; पोलीस नाहीत, न्यायाधीश नाही, पाठीत खंजीर खुपसणारे दुष्ट लोक नाहीत ! त्यांची खरी किंमत मला तरी करताच येणार नाही. पैशावाचून एकही गोष्ट तिथे अडत नव्हती. माणसाला हव्या हव्याशा वाटणाऱ्या सर्व गरजेच्या गोष्टी मला मिळाल्या. मी अगदी तृप्त होतो. पण त्या सगळ्यांवर लाथ मारून मी कमनशिबी बाहेर पडलो– कशासाठी ? ज्या समाजाला माझ्याबद्दल काडीमात्र प्रेम नाही, ज्या समाजाला माझ्यात काही चांगल्या गोष्टीही असू शकतील हे जाणून घेण्याची फिकीर नाही; ज्या समाजानं मला दूर लोटलं होतं आणि माझ्यात आशेचा अंकुरही जिवंत ठेवला नाही; ज्यांनी फक्त मला चिरडून टाकण्याचं महत्कर्म केलं होतं– अशा लोकांमध्ये परत जाण्याची दुर्बुद्धी मला कशी झाली ?

मला परत पकडल्याचं ऐकून ते खदखदा हसतील; बारा पंच, हलकट पोलेन, पोलीस आणि सरकारी वकील. कारण इथून एखादा बातमीदार ही बातमी फ्रान्सला पाठविण्याचं सत्कृत्य नक्की करील.

आणि माझ्या कुटुंबाचं काय ? मी गियानाहून पळाल्याचं समजल्यावर त्यांना कोण आनंद झाला असेल. आता पुन्हा ते दुःखाच्या दरीत कोसळले असतील.

माझी इंडियन टोळी सोडण्यात चूकच झाली असं म्हणावं लागेल. होय, 'माझी टोळी' असं मी अभिमानानं म्हणेन, कारण त्यांनी माझा स्वीकार केला होता. माझ्या चुकीचं योग्य प्रायश्चित्त मला मिळत होतं. पण आणखीही एक गोष्ट होती–मी दक्षिण अमेरिकेतील इंडियन प्रजा वाढवण्यासाठी पळालो नव्हतो. हे परमेश्वरा, तुझ्या लक्षात येईल की मला अगदी साध्या पद्धतीनं पण सुधारलेल्या जगात राहून हे सिद्ध करायचं आहे की मी अगदी निरुपद्रवी आहे. तेच माझं खरं ध्येय आहे– तुझ्या मदतीनं किंवा मदतीशिवाय मी ते साध्य करीन.

सर्वसामान्य माणसाप्रमाणे मलाही जगण्याचा हक्क आहे. त्यासाठी मी प्रयत्न करीत राहिलो तर माझी चूक आहे का ? ठराविक समाजातील किंवा देशातील काही चांगल्या लोकांसारखा मी नसेनही कदाचित, पण माझ्या उद्दिष्टासाठी मी सतत झगडत राहीन.

[ क्रमशः

---

'गव्हर्नरसाहेब, ज्यामुळे तुमच्या उत्पन्नात भरपूर वाढ होऊ शकेल असा नवीन उद्योग शोधून काढा ना– त्यासाठी तुम्हाला साधारण किती भांडवल लागेल ?'

'चांगला धंदा सुरू करण्यासाठी निदान पन्नास-साठ हजार पेसो तरी जवळ असावे लागतात.'

'मग तेवढे जमले तर सध्याच्या तीन-चार पट कमाई करू शकाल ?'

'जास्तच. आताच्या भिकार पगाराच्या पाच-सहापट.'

'मी जर तुम्हाला पन्नास हजार पेसो दिले तर–'

'उगीच थट्टा करू नकोस.'

'नाही, मी गंभीरपणे बोलत आहे. फक्त मला पळून जायची संधी द्या. तुम्ही म्हणाल त्या क्षणी पैसे तुमचे होतील.'

## सुटकेची अखेरचीधडपड

**पुढील अंकी**

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २९-३-७५ ते ४-४-७५

### जगाच्या रंगमंचावर भारताची राजनीती चमकेल

भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी जनतेचे लक्ष वेधून घेणाऱ्या पुन्हा एकदा 'हिरो' ठरतील, या माझ्या भविष्याचा 'अलाहाबादच्या साक्षी'ने प्रत्यय आला, हे वाचकांच्या ध्यानी आले असेलच! भारताच्या लग्नाला दशमस्थानी झालेली रवी-गुरूची युती जगाच्या राजकारणात भारताच्या राजनीतीला महत्त्वाचे स्थान प्राप्त करून देणार आहे. अमेरिका, चीन, रशिया व पाकिस्तान ही राष्ट्रे देखील या राजनीतीने आश्चर्यचकित होतील. याचे श्रेय देखील पंतप्रधान इंदिरा गांधी व काही अंशी परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण यांना मिळणार आहे. बिहारच्या नेतृत्वाचा प्रश्न पुन्हा पुढे ढकलला जाईल. पण मुख्यमंत्री गफूर यांचे स्थान अत्यंत अस्थिर होईल. काँग्रेस अध्यक्ष देवकांत बारुआ यांना पक्षात वरिष्ठ नेत्यांचा विरोध होऊ लागेल. महाराष्ट्र राज्यात अस्वस्थता जाणवल्यास आश्चर्य वाटू नये.

**मेष : महत्त्वाची कामे होतील**

हा आठवडा तुम्हाला विशेष महत्त्वाचा जाणार आहे. सोमवार ते बुधवार या दिवसांची नोंद ठेवा. मकरेचा मंगळ व मिथून राशीचा शनी काहीतरी विशेष घडवून जाणार आहेत. आशाआकांक्षा आजवर रखडत होत्या, त्यांना या वेळी प्रसन्नतेचा स्पर्श होणार असून अनेक क्षेत्रांत काही तरी नवे घडवण्याची जिद्द तुमच्या ठायी निर्माण होईल. मनात घर करून राहिलेली निराशा दूर होऊन तेथे नव्या युगाचा प्रकाश दिसू लागेल. नोकरी-व्यवसायात तुमच्या कर्तृत्वाला संधी मिळेल. पैशाची कामे जरी रेंगाळत झाली तरी प्रतिष्ठेला तडा जाणार नाही. संसारात सुखाचा शोध लागेल. परीक्षेत प्रयत्नाने यश. महिलांना या वेळी तरी तीर्थयात्रा घडणे कठीण. शुभांक १०-१२-१.

**वृषभ : लॉटरीत बक्षीस**

अकराव्या गुरूचे खरे कार्य आताच सुरू होणार आहे. त्यामुळे आजवरचा अपयशाचा काळ तुम्ही विसरून जाणे आवश्यक आहे. तुम्ही सरकारमान्य लॉटरीचा लाभ घ्यावा. नशीब जोरदार आहे. दुसरा शनी आर्थिक सामर्थ्य तुम्हाला देऊन जाईल. तुम्ही जर लेखक वा पत्रकार असाल तर नाविन्यपूर्ण अशा विषयावर लेखन करा. गौरव होईल. तुम्ही ग्रंथकार असाल तर तुमच्या ग्रंथाला सरकारी पारितोषिक मिळणार आहे. एखाद्या कीर्तिवान उच्चपदस्थाचा तुम्हाला आश्रय लाभणार आहे. रविवार, गुरुवार व शुक्रवार हे दिवस व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. कलावंताच्या जीवनातील उपेक्षा संपणार असून वृद्ध कलावंतांना मानधन वा पेन्शन मिळणार आहे. तरुणांनी भावनेला आवर घालावा. महिलांना नोकरीधंद्यात प्राधान्याने काम मिळणार आहे. शुभांक ३-५-६.

**मिथून : अधिकाराचा योग**

पहिला शनी व दशमस्थानी मीन राशीतील रवी-गुरूची युती तुम्हाला अनुकूलतेची शाल देणार आहे. नोकरी असो की कोणताही धंदा असो, या आठवड्यात लाभदायक अशा घटना घडणार आहेत. नोकरीत उच्च अधिकाराचा योग आहे. प्रमोशन मिळणार आहे. नोकरी नसणाऱ्यांना उच्च प्रतीची नोकरी मिळणार आहे. तुम्ही एखादा प्रकाशनाचा, मुद्रणाचा व्यवसाय सुरू करू शकाल. चालू उद्योगातील कोणत्याही अडचणी दूर होतील. तुमचा कापड व्यापार असेल, कागदधंदा असेल अथवा स्टेशनरीचे दुकान असेल तर त्यातील सर्व अडचणी दूर होतील. या आठवड्यात परदेश प्रवासाचा सरकारी कामासाठी योग येणार आहे. सोमवारी उपासनेचा प्रत्यय येईल. तरुणतरुणींना शुभ वार्ता कळतील. महिलांना नोकरीत बढती-प्रमोशन मिळणार आहे. शुभांक ७-८-१०.

**कर्क : महत्त्वाच्या घटना**

मीन राशीत रवी-गुरूची युती हाच या आठवड्यातील महत्त्वाचा योग आहे. हा योग तुमच्या आयुष्यात क्रांतिकारक ठरावा असाच आहे. विशेषत: नोकरीच्या क्षेत्रांत काही तरी महत्त्वपूर्ण घडू शकेल. शुभ महत्त्वाकांक्षा अचानक पुऱ्या होतील. अनपेक्षित असे बदल या क्षेत्रात होतील. जे ज्या जागेवर असतील त्या जागेवरून त्यांचे अनुकूल स्थित्यंतर घडू शकेल. विज्ञान पदवीधर, वाणिज्य पदवीधर व वकील यांच्या बाबतीत चांगले घडेल. राजकारणापासून आजवर दूर राहिलेल्या या राशीच्या व्यक्तीसमोर चांगली संधी येणार आहे. आर्थिक क्षेत्रांत व स्थावराच्या बाबतीत प्रगती होईल. स्थावराची प्राप्ती होईल. घर वा बंगला मिळेल. लहानसा स्वत:चा प्लॉट घेऊ शकाल. सोमवार व शुक्रवार सार्वजनिक मान मिळेल. पैसा मिळेल. तब्येतीला मात्र जपा. महिलांना माहेरहून प्रॉपर्टी वा पैसा मिळेल. पतिराजांचे कौतुक होईल. शुभांक ३-६-७.

**सिंह : तब्येतीला जपावे**

मीन राशीत आठव्या स्थानी रवी-गुरू यांची युती झाली असून, मंगळ सहावा आहे. या ग्रहांची दखल तुम्हाला घ्यावीच लागेल. प्रामुख्याने उष्ण प्रकृतीच्या व रक्तदाबाचा आजार असणाऱ्या लोकांनी काही शारीरिक पथ्ये पाळावीत. सोमवारी कोर्ट व सरकारी कामाचा तुमच्यासारखा निकाल लागेल. दावा जिंकाल. मंगळवारी देवीच्या उपासनेने लाभ होईल. बुधवार ते शुक्रवार प्रामुख्याने नोकरीसंबंधीची कामे होतील. नोकरीत बदल होईल. इंजिनीयरिंग व औषधी उद्योगात या राशीचे लोक असतील तर त्यांना चांगली बातमी कळेल. तरुण-तरुणींनी यावेळी तरी प्रेम हा विषय टाळावा. महिलांना लघु-उद्योगांत महत्त्वाचे स्थान मिळेल. संसारात सुख. शुभांक ४-९-११.

**कन्या : त्रास कमी होईल**

गुरूने तुमच्या सांसारिक जीवनात थोडाफार प्रेमाचा ओलावा आणला होता. पण रवी-गुरूची युती तो हिरावून घेण्याचा प्रयत्न करणार आहे. म्हणूनच यावेळी पतिपत्नींनी हे मार्गदर्शन लक्षात घेऊन आपसात भांडण करू नये. दोघांनीही संयमाने वागावे. या आठवड्यात तुमची प्रतिष्ठा वाढण्याच्या दृष्टीने बरेच काही महत्त्वाचे घडणार आहे. हातून सार्वजनिक सेवा व कार्य घडेल. नोकरीधंद्याच्या दृष्टीने योग्य पावले उचलता येतील. वरिष्ठांची मर्जी राहील. मालक तुमच्या कामावर खूष राहतील. पदवीधरांना

स्वतंत्र उद्योगासाठी पैसा मिळेल. आशा-आकांक्षा पुऱ्या करणारा असा हा काळ आहे. प्रेमात यश मिळेल. विवाहेच्छू स्त्रियांचा प्रेमविवाह होण्याची शक्यता आहे. शुभांक ५–९–१०.

**तूळ : मतभेद वाढवू नका**

हर्शल हीच काय ती सध्या तरी तुमची एकमेव शक्ती आहे. या वेळेच्या एकंदर ग्रहांचे स्थानच असे आहे की, प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा व मतभेद निर्माण होणार आहेत. प्रामुख्याने नोकरीच्या बाबतीत मतभेद वाढवू नयेत. तुमच्या खालच्या व्यक्तीस तुमच्या वरचढ करण्याचा खटाटोप मालक अथवा वरिष्ठ करणार आहेत. तुमच्या कामाची दखल न घेणे, तुमच्या चुका काढीत राहणे असे काही तरी प्रकार घडतील. शनिवार, सोमवार व मंगळवार हे दिवस त्यांतल्या त्यांत अनुकूल आहेत. लेखी वा तोंडी परीक्षेत यश मिळेल. महत्त्वाचा पत्रव्यवहार होईल. जवळचा प्रवास घडेल. वाहन-खरेदीच्या वाटाघाटी होतील. कृषि पदवीधरांना उद्योग मिळेल. विवाहाचा बेत लांबणीवर पडेल. महिलांनी शेजारी व माहेरची माणसे यांच्याबरोबर सलोखा ठेवावा. शुभराशी ४–६–११.

**वृश्चिक : यशाची घोडदौड**

मीन राशीत गुरू–रवी या ग्रहांची युती झाल्यापासूनच खरे म्हणजे तुमच्या जीवनात व्यावसायिक व नोकरीच्या क्षत्रात महत्त्वपूर्ण अशा अनुकूल घटना घडू लागल्या आहेत. तुमची उपेक्षा संपून आजवरच्या परिश्रमाचे चीज होऊन नोकरीत तुम्ही 'वरिष्ठ' बनलात तर आश्चर्य वाटू नये. उद्योग व शेती याबाबतीत तुम्ही या वेळी मालकच बनणार आहात. सोमवार ते शुक्रवार शेअर्सचे वायदे व कापड-व्यापार तेजीत राहून तुम्हाला नफा होईल. रेसच्या नादी मात्र या वेळी लागू नका. पैसा जाण्याची बरीच शक्यता आहे. राहत्या जागेचा वाद वा प्रश्न सुटेल. स्थावरात यश. नवा पत्रव्यवहार करा. महिलांना स्वतःची जागा घेता येईल. नोकरीत यश मिळण्यास हरकत नाही. शुभराशी ५–६–१२.

**धनू : नव्या योजना आखा**

सुखस्थानी रवी–गुरू युती ही काही तशी सुखदायी कल्पना नाही. परंतु ही युती मीन राशीत होत आहे, हीच त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट होय. धावपळ, कामाचा ताण, पोटात बिघाड, चालू कामात अनपेक्षित अडचण, अनारोग्य, अस्वस्थ असे काही तरी यावेळी होऊ शकेल. महत्त्वाकांक्षा पुऱ्या होतील. पण मन संतापी बनेल. सरळ माणसाशी देखील सरळ वागणे जमणार नाही. कौटुंबिक स्वास्थ्य मिळणार आहे, पण ते अनुभवणे तुम्हाला जमणार नाही. मुलांवर उगीचच वैतागत राहाल. थोडीफार पैशाची चणचणही जाणवेल. व्यवसायात अडचणी निर्माण झाल्या तरी अपयश मात्र नाही. व्यापारउद्योगात तोटा नाही. विवाहाच्या प्रश्नात गैरसमज वाढतील. महिलांनी उपासना करावी. मन समाधानी ठेवावे. शुभराशी ५–७–११.

**मकर : बौद्धिक क्षेत्रात प्रगती**

मंगळाने तुमचे आंतरिक व ऐहिक सामर्थ्य वाढविले आहे. तर गुरूने तुमचे कर्तृत्वाचे स्वरूप विशाल केले आहे. त्यामुळे हा आठवडा तुमचे नाव सर्वत्र गाजणार आहे. तुम्ही जर राजकारणी असाल, तुम्ही जर सत्तेत असाल तर रविवार ते बुधवारच्या दरम्यान अशी एखादी घटना घडेल की, ज्याच्या त्याच्या तोंडी तुमचे नाव होईल. आर्थिक परिस्थिती या आठवड्यात सुधारेल. व्यापार-व्यवसायात चांगलाच नफा मिळवू शकाल. शेती, लोखंडी अवजारे व खते यांचे जर तुमचे उद्योग असतील किंवा या उद्योगात तुम्ही नोकरी करीत असाल तर तुम्हाला पगार, महागाईभत्ता वाढवून मिळणार आहे. महिलांनी भरतकाम, विणकाम यासारखे घरगुती उद्योग सुरू करावेत. पैसे मिळतील. शुभांक ३–७–१०.

**कुंभ : राजकारणात यश**

तसे पाहिले तर या आठवड्यात तुम्हाला शनीखेरीज इतर कोणत्याच ग्रहाची फारशी अनुकूलता नाही. रवी–गुरूची युती धनस्थानी होत आहे. त्यामुळे तुम्ही कितीही पैसा मिळवला तरी तो पुरा पडणार नाही. पाचवा शनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात थोडाफार व्यत्यय आणणार आहे. पण सरकारी नोकरांच्या नोकरीविषयक स्पर्धा–परीक्षा, व्यवसायातील त्रांत्रिक परीक्षा मात्र मोठ्या यशाने तुम्ही पास व्हाल. नोकरीच्या दृष्टीने आठवडा तसा वाईट नाही. शनिवार, बुधवार व गुरुवार या दिवशी राजकारणात तुम्हाला महत्त्वाचे स्थान मिळणार आहे. नेतृत्व, सत्तेत बढती वगैरे काही तरी घडू शकेल. विवाहाला हा आठवडा अनुकूल नाही. महिलांना नोकरीत अगर महिलामंडळात मोठेपण मिळेल. शुभांक ७–८–१०.

**मीन : स्थावराची प्राप्ती**

तुमच्या चंद्राच्या सहवासात रवी–गुरू आल्यापासूनच तुम्ही अडचणींतून मुक्त होऊन खरे तर तुमची प्रतिष्ठा उत्तुंग उंचावली आहे. पण या आठवड्यात तुम्हाला खरा प्रत्यय येणार आहे तो शनीचा. चौथा शनी सुखस्थानात जरी तुमचे सुख हिरावून घेत असला तरी तो तुमचे काही वाईट करणार नाही. उलट तुमचे काहीतरी हितच तो करणार आहे. तुम्हाला शेतीची आवड असली तर तुमचा शेतजमीन मिळवण्याचा प्रयत्न फलदायी होईल. तुमच्या जागेचा विलक्षण त्रासदायक ठरलेला प्रश्न अनपेक्षितरीत्या सुटू शकेल. वणवण संपेल, अशाच भाषेत याचे वर्णन करावे लागेल. तुमच्यापैकी जे कुणी लग्न करू इच्छितात त्यांना विनासायास जोडीदार मिळणार आहे. लॉटरीत तुमचे नशीब उघडणार आहे. तब्येतीची मात्र काळजी घ्या. नैराश्य मनात डोकावणार आहे. महिलांना नवा उद्योग मिळेल. शुभराशी ७–८–११.



# चैताली

## बिमल रॉयची ही मानसकन्या लवकरच पडद्यावर येणार


१९६५ ते १९७५.
दहा वर्षं ' चैताली 'ची वाटचाल चालू आहे. दरम्यान तीन मोठे बदल झाले; पण अडखळत, धडपडत मंद पावलांनी ' चैताली 'ची वाटचाल चालू राहिली. प्रारंभीचं नाव ' सहारा ' होतं. ते पुढे ' चैताली ' झालं. मुहूर्तदृश्याच्या कॅमेऱ्यासमोर उभी राहणारी नायिका शर्मिला टागोर होती. आता ' चैताली 'च्या शूटिंगच्या वेळी अधिकृत नायिका म्हणून सायरा बानू कॅमेऱ्यासमोर उभी राहते. पण सगळ्यात मोठा बदल–खरं तर आघात म्हणजे... ' चैताली ' ज्याचं बोट धरून या वाटचालीला निघाली, तोच वाटेत हरवून गेला. निर्माते–दिग्दर्शक बिमल रॉय यांच्या आकस्मिक निधनानंतर ' सहारा 'चं भवितव्य धोक्यात आलं. बिमलदांचं हे अपुरं राहिलेलं स्वप्न पूर्ण करायचंच, असा त्यांच्या कुटुंबियांनी निर्धार केला. पण संकल्प आणि सिद्धी यांच्यामध्ये इन्कम टॅक्सचं देणं उभं राहिलं. ' इन्कम टॅक्सनं बिमल रॉय यांच्या घरादाराकडे, फर्निचरकडे नजर वळवल्या 'च्या वार्ता आम्ही भयचकित नजरेनं वाचल्या. श्रीमती मनोबिना बिमल रॉय यांनी ' सहारा 'कडे तात्पुरती डोळेझाक करायची आणि इन्कम टॅक्सचं देणं चुकतं करणं नि मुलांची शिक्षणं पुरी करणं एवढंच ईप्सित ठरवलं. कॉलेजमध्ये शिकणाऱ्या दोन मुली, शाळेत शिकणारा एक मुलगा नि एक मुलगी यांचं शिक्षण + इन्कम टॅक्स, ह्या जबाबदाऱ्या पूर्ण करायला १९७३ सालपर्यंत वाट पाहावी लागली.
१९७३ साल बिमल रॉय कुटुंबियांकरता नवे संकल्प आणि नव्या आशा घेऊन आलं. आठ वर्षांच्या मध्यन्तरानंतर पुन्हा एकदा ' बिमल रॉय प्रॉडक्शन्स 'चं युनिट उत्साहानं कामाला लागलं. त्या वेळचे सर्वाधिक व्यस्त दिग्दर्शक आणि बिमलदांचे पट्टशिष्य हृषिकेश मुखर्जी पुढे आले. कोणत्याही परिस्थितीत ' चैताली ' पूर्ण करीन, अशी प्रतिज्ञा त्यांनी केली. त्या वेळचा सर्वाधिक व्यस्त हिरो आणि ' बंदिनी 'पासून बिमलदांचं ऋण मनात वागवत आलेल्या धर्मेंद्रनं वचन दिलं, ' महिन्यातून दोन दिवस काहीही करून मी ' चैताली 'च्या शूटिंगला देईनच. ' या ठरलेल्या दोन दिवशी तो बाकीची शूटिंग्ज उरकतो आणि सकाळ–संध्याकाळ जमेल तेव्हा येऊन ' चैताली 'चं काम पूर्ण करतो. पुष्कळदा सकाळपासूनचं शूटिंग ठरतं आणि धर्मेंद्रला यायला संध्याकाळचे सहा वाजतात ! पण तो येतो. बाकीचे कुणी कलाकार वा तंत्रज्ञ तक्रार करत नाहीत. ' आपल्या दादांचा सिनेमा आपण पुरा केला पाहिजे ' ही भावना बिमल रॉय प्रॉडक्शन्सच्या युनिटमध्ये दिसते. ' दो बिघा जमीन 'पासूनचे लाइटमन आणि साहाय्यक ' चैताली 'च्या सेटवर काम करत आहेत. ' चैताली 'चं काम सुरू झालं आहे म्हटल्यावर हाकेचीसुद्धा वाट न पाहता आले. श्रीमती मनोबिनादेवींच्या बरोबरीनं लगबग करणाऱ्या त्यांच्या लेकीला–यशोधरा बिमल रॉयला–ती मंडळी ' अगंतुगं 'देखील करतात. शूटिंगच्या मधल्या लंच ब्रेकमध्ये यशोधरा आणि तिची आई स्वहस्ते मंडळींना जेवण वाढण्यात रमून गेलेली दिसणं, हे हृद्य दृश्य ' चैताली 'च्या सेटवर नवं नाही.
' चैतालीच्या निमित्तानं बिमल रॉय प्रॉडक्शन्सच्या कुटुंबात जी भर पडत गेली ती मला महत्त्वाची वाटते. ' ' मोहन स्टुडिओ ' ते माउंट मेरी रोडवरचं बिमलदांचं निवासस्थान. या दरम्यानच्या धावत्या मुलाखतीत यशोधरा सांगत होती, ' सायरा आली, असरानी आला, लक्ष्मी-प्यारे आले. '
असरानी तर आपण होऊन आला. ' बिमलदांबद्दलचा आदर व्यक्त करण्याची संधी म्हणून ' चैताली 'त आपण भूमिका करणारच, मग ती दोन का मिनिटांची असेना '–त्यानं प्रेमाचा हट्ट धरला. हृषिदांनी त्याच्या प्रेमाचं चीज केलं. चांगली मोठ्ठी भूमिका त्याला ' चैताली 'त आहे. पण एक पैसाही मानधनाखातर न घेता असरानी ती करतो आहे.
असरानीच्याच भावनेनं लता मंगेशकरनं स्नेहाचा हात पुढं केला. ' चैताली 'साठी मागितली ती रेकॉर्डिंग डेट तिनं विनाशर्त, विना मानधन दिली. '
' लक्ष्मीकांत–प्यारेलालनं संगीत कसं काय दिलंय ?'
यशोधराला प्रश्नाचा रोख कळतो. ती हसते. ' बाबांच्या सिनेमाला म्हणजे सचिनदांचं ( एस्. डी. बर्मन ) नाहीतर सलीलदांचं ( सलील चौधरी ) संगीत ऐकायची सवय झालीय, म्हणून ना ? मी देखील पहिल्यानं लक्ष्मी-प्यारेंना नाकं मुरडत होते. वाद्यांच्या गदारोळात लडबडलेलं संगीत ऐकावं लागणार असं भय वाटत होतं. पण लक्ष्मी-प्यारेंनी अगदी वेगळं नि मनापासून संगीत दिलंय. ' ( नंतर मेहबूब स्टुडिओच्या रेकॉर्डिंग रूममध्येदेखील ' चैताली 'च्या संगीताची अनाहुत प्रशस्ती ऐकायला मिळाली खरी. )
' बिमल रॉय प्रॉडक्शन्स ' चैताली 'नंतर चित्रनिर्मिती करत राहणार ना ?'
' नक्कीच. आमची इच्छा तरी खूप आहे. '
' चैताली 'च्या शूटिंगमध्ये एवढी गॅप मध्ये पडली. डिस्ट्रिब्युटर्स मिळवायला त्रास नाही पडला ?'
' पडला तर ! अगदी स्पष्टच सांगायचं तर, हृषिदांचं नाव पाठीशी उभं होतं म्हणून

पृष्ठ ३३ वर

# झिलमिल सितारे

अरुणा अंतरकर

पित्याच्या मृत्यूनंतर चैताली (सायराबानू) चा एकमेव आधार रहातो डॉक्टर. (धर्मेन्द्र)



‘ चैताली ’



आणि हे गुरू (असरानी) तिला चौर्यकलेतले तज्ञ बनवू पहातात.



प्रसंगाची नाट्यपूर्णता वाढवण्यात बिन्दू आणि प्रदीपकुमार सुद्धा वाटा उचलतात.



यंदाचा फिल्मफेअर ॲवार्ड विजेता
राजेशखन्ना (अविष्कार) यांचे हे
सैनिकी रूप!
चित्रपट - जे. ओमप्रकाश यांचा 'आक्रमण'







फिल्मफेअर ॲवार्ड ही एकेकाळी
दिलीपकुमारची ठेकेदारी होती.
आता ती जयाची होणार कां ?

‘चैनसे हमको कभी’ हे आशा - नय्यर जोडीचं अखेरचं गाणंच तिला ॲवार्ड देवून गेलं ! योगायोग दुसरं काय ?



# चैताली

पृष्ठ २८ वरून

आम्ही डिस्ट्रिब्युटर्सपुढे उभे राहिलो. बिमल रॉय हे नाव असेल मोठं. पण कलाकार गेल्यानंतर, आठ वर्षं पडून राहिलेल्या सिनेमाला कोण हात लावतो ?...आम्ही नेटानं 'चैताली'च्या एक-दोन रिळांचं चित्रण पुरं केलं. ती रिळं घेऊन मगच डिस्ट्रिब्युटर्सकडे गेलो. तेवढं काम पाहिलं मात्र,–'चैताली'ला सगळ्या ठिकाणची डिस्ट्रिब्युशन्स खुली झाली.'

यशोधरा रॉय हिनं दिलेल्या माहितीनुसार 'चैताली'चं आता फक्त बाह्यचित्रणाचं काम शिल्लक आहे. पन्हाळा, महाबळेश्वर, किंवा कोडाइकॅनॉल यांपैकी एका ठिकाणी ते पुरं होईल. एव्हाना खरं म्हणजे 'चैताली' पूर्ण व्हायला हवा होता. पण सायरा बानूचं मध्यंतरीचे आजारपण आणि त्याहीपेक्षा मोठा आघात म्हणजे म्युझिशिअन्सच्या संपानं 'चैताली' आणखी रखडली. शेवटी चारांपैकी एक गाणं सिनेमातून रद्दच करायचं ठरलं. १९७५ साल 'चैताली'चा रीलीज झाल्याविना संपू नये, अशी बिमल रॉय युनिटची इच्छा आहे.

तथास्तु ! ◻

# फिल्म फेअर : लिटल फेअर

## 'फिल्म फेअर इज लिट्ल फेअर ऑफ धिस इयर !'

'फिल्म फेअर : लिट्ल फेअर...'

'फिल्म फेअर इज लिट्ल फेअर धिस इयर !

'फिल्मफेअर' अ‍ॅवॉर्डसच्या यंदाच्या निवाड्याबद्दलची ही प्रतिक्रिया खुद्द चित्रवर्तुळातलीच. 'मेहबूब स्टुडिओ'च्या रेकॉर्डिंगरूममध्ये ती ऐकू आली. त्या सद्गृहस्थाचं नावगाव कळलं नाही, पण प्रॉडक्शन साइडचा कुणी असावा. असो. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे, हल्ली 'फिल्मफेअर'खेरीज अन्य मासिकांच्या आणि संस्थेच्या पारितोषिकांचं बारमहा उदंड पीक निघतं; पण या सगळ्या भाऊगर्दीतही 'फिल्मफेअर' पारितोषिकं आपलं नाव आणि प्रतिष्ठा राखून आहेत खरी. दर्जा राखून आहेत किंवा काय, हा चांगलाच वादाचा मुद्दा ठरेल. जुन्या पिढीतल्या एका ज्येष्ठ अभिनेत्यानं 'फिलमफेअर'च्या पूर्वीच्या आणि हल्लीच्या निवडीबद्दल मत व्यक्त केलं होतं ते फक्त एका वाक्यात : 'बक्षी गहू आणि मिलो !' गेल्या पाचसहा वर्षांच्या खदखदत्या असंतोषाचं हे एका वाक्यातलं मार्मिक दर्शन होतं. त्यातही गंमत म्हणजे, 'फिल्मफेअर'चे ख्यातनाम (आणि बहुचर्चित) समीक्षक एस. के. बानाजी ज्याला हटकून 'भिकार' चित्रपटांच्या श्रेणीत ढकलायचे, तोच चित्रपट फिल्मफेअर'च्या वाचकांकडून पोत्यानं बक्षिसांची खिरापत लुटून जायचा. ('बिचाऱ्या बानाजीचं काम फार फार कठीण आहे. हिंदी सिनेमांचे फक्त दोनच प्रकार आहेत–टाकाऊ, आणि अत्यंत टाकाऊ. यातून वर्गीकरण ते काय करायचं ?'–इति रोखठोक आय. एस. जोहर.) बानाजीनं 'बेइमान'ला सडकून ठोकावं, आणि 'बेइमान'नं सात फिल्मफेअर अ‍ॅवॉर्डस पटकवावीत, हे प्रेक्षणीय दृश्य नवं नव्हतं. हास्यविनोदाची चणचण भासू लागली, की त्या वर्षीचा 'फिल्मफेअर' अ‍ॅवॉर्डसचा निकाल वाचावा. काय बिशाद हसून हसून पोट दुखणार नाही ? मनोजकुमारला त्या वर्षीचा सर्वोत्कृष्ट अभिनेता ठरवणं, याहून 'बेस्ट जोक ऑफ द इयर' ऐकलाय तुम्ही ? संगीतदिग्दर्शकाच्या निवडीबद्दल याहून कटू गदारोळ व्हायचा. इतका की त्यापुढे या संगीतकारांची दोनशे वाद्यांच्या ताफ्यातली गाणीसुद्धा (ऐकू आलीच तर) फिकी पडावीत. बहुसंख्य जनता 'गाइड'च्या किंवा 'आराधना'च्या संगीताला उचलून असायची, तेव्हा 'फिल्मफेअर'ची वरमाला मात्र 'सूरज'च्या किंवा 'बेइमान' दर्जाच्या संगीतकाराच्या गळ्यात पडायची. ही अशी पारितोषिकं मिळतात तरी कशी, हे कोडं एखाद्या वेळी फार सुरसपणे सुटायचं. संगीतकलेबरोबरच राजकारणविद्येत पटू असलेले एखादे सुपीक मेंदूचे संगीतकार खरीदता येईल तेवढे 'फिल्मफेअर' खरीदायचे, आणि त्यातल्या कुपन्सवर 'सर्वोत्कृष्ट संगीतकार' म्हणून स्वतःच स्वतःची निवड करून टाकायचे. हा प्रकार उघडकीला आला नाही, तर संगीतकार 'फिल्मफेअर'ची बाजी मारून जायचेही.

प्रेक्षकांबरोबरच चित्रवर्तुळातली नाराजी वाढू लागली तशी 'फिल्मफेअर'नं, हिंदी सिनेमात आढळणाऱ्या कर्त्या पुरुषाची भूमिका घेतली–सगळ्यांना खुश करायचं. शंकर-जयकिशनच्या संगीताला बक्षीस दिलं, तर सर्वोत्कृष्ट गीताचं बक्षीस लक्ष्मीकांत प्यारेलालला द्यायचं, आणि पार्श्वगायनाचं बक्षीस कल्याणजी–आनंदजीच्या गायकाला-गायिकेला द्यायचं. राजकपूर आणि दिलीपकुमार रिंगणात उतरलेले असले, तर अभिनयाचा मान दिलीपकुमारला द्यायचा आणि दिग्दर्शन संकलनाचं मानकरी ठरवायचं राजकपूरला !

गेल्या वर्षी तर या समंजसपणाचा कळस झाला. गतवर्षी विवाह करणाऱ्या फिल्मी दांपत्यांना 'फिल्मफेअर'नं जणू पारितोषिकांचा जाहीर अहेर केला. गुलजारला संवादलेखनाचं बक्षीस, तर सौ. राखीला 'समांतर' भूमिकेचं. अमिताभलादेखील 'समान्तर' भूमिकेबद्दल सक्रिय शाबासकी, तर 'अभिमान'बद्दल जयाच खास पारितोषिक देऊन कौतुक. डिम्पलला तिच्या पहिल्याच कामाबद्दल प्रोत्साहन द्यायचं, तर तिच्या पतिराजांच्या वर्षानुवर्षांच्या कामगिरीबद्दल त्याची नको पाठ थोपटायला ? मग 'अनुराग'मधली त्याची भूमिका किती का साचेबंद असेना ! खास पारितोषिक देऊन त्या आकारमानानं लहान पण आशयानं 'महान' भूमिकेचं कौतुक करण्यात आलं. आणि राजेश-मनोजकुमारला अभिनयाचं बक्षीस देणं म्हणजे 'हास्यास्पदतेचा कळस' म्हणत होता !

'फिल्मफेअर'नं लुटवलेली ही वाणं पाहता एका पत्रकारानं कोपरखळी दिली होती : 'पुढल्या वर्षी या जोडप्यांच्या नवजात अर्भकांनाही बक्षीसं देण्यात येतील...'

...योगायोगानं त्याच सुमारास 'फिल्म इन्स्टिटयूट 'मध्ये 'फिल्मफेअर' संपादक बी. के. करंजिया भेटले होते. त्यांच्या मासिकांच्या पारितोषिकाबद्दल त्यांना काय वाटतं, म्हणून विचारता ते हसून उत्तरले होते, 'काही करा, 'फिल्मफेअर अॅवॉर्डस'-बद्दलची चर्चा टळत नाही एवढं खरं! आपल्या सिनेमांना हे अॅवॉर्ड मिळत नाही अशी तक्रार करणाऱ्या सिनेमावाल्यांना मी एवढंच म्हणेन : 'बाबांनो, माझ्या हातात ह्या अॅवॉर्डसचा निकाल नाही.' नाहीतर मी आद्याक्षरानुसार क्रम लावून प्रत्येक सिनेमाला बक्षीस दिलं असतं!'

—प्रत्यक्षात असाच काहीसा प्रकार चालू असल्याची शंका येत होती खरी. यंदा मात्र 'फिल्मफेअर'नं अनपेक्षित आश्चर्याचा धक्का दिला आहे. 'रजनीगंधा'ची सर्वोत्कृष्ट चित्रपट म्हणून निवड काय, राजेश खन्नाची त्याच्या खरोखरीच्या उत्तम भूमिकेबद्दल निवड काय (आविष्कार), आणि खास पारितोषिक द्यावं अशी लायकी असलेल्या 'अंकुर'लाच ते पारितोषिक काय! प्रेक्षकांच्या शिफारशीतून अंतिम निवड करणाऱ्या 'फिल्मफेअर अॅवॉर्डस'च्या कमिटीत सुधारणा आहे म्हणायची. एरवी 'आविष्कार'च्या राजेश खन्नाऐवजी त्यांनी 'प्रेमनगर'च्या राजेश खन्नाला बक्षीस दिलं असतं म्हणजे (फुकटच्या)

## एक आश्चर्य

पार्श्वगायनाबद्दलचं पारितोषिक सुयोग्य गीताला देऊन सुखद आश्चर्याचा आणखी एक धक्का 'फिल्मफेअर' पारितोषिकांनी दिला आहे. 'चैनसे हमको कभी' हे आशानं जीव ओतून गायिलेलं, संथ, कोमल चालीचं गाणं 'प्राण जाय पर वचन न जाय' नावाच्या 'ए' क्लासच्या स्टंटपटात असेल, आणि ते बक्षीस घेऊन जाईल, अशी अपेक्षा फार थोड्या जणांनी केली असेल. आशा भोसले—ओ. पी. नय्यर जोडीचं हे शेवटचं गाणं. त्यांच्यातल्या जाहीर मतभेदांमुळे, आशा भोसले हे पारितोषिक घ्यायला पुढे येईल किंवा काय, यावद्दल सध्या चित्रवर्तुळात चर्चा सुरू आहे.

आरडाओरडीशिवाय आपण काय करू शकणार होतो. आणि चालत्या विमानात अॅक्शनसह गाणं म्हणू शकणारा, 'लडकी हां कहे तो छोडना नही, ना कहे तो छूना नही' असलं उदात्त तत्त्वज्ञान सांगणारा; 'लता, जबानको लगाम दो' या डायलॉगमधल्या प्रत्येक अक्षराची ठाशीव फेक करणारा 'प्रेमनगर'मधला राजेश पारितोषिकपात्र ठरायला या कमिटीची काय हरकत निघाली कोण जाणे!

उत्कृष्ट संवादलेखनाचा मान त्यांनी कैफी आझमींना दिला आहे. वास्तविक दाक्षिणात्य चित्रांचे हातखंडा, नाटयपूर्ण संवादलेखक इंद्रराज आनंद 'प्रेमनगर'च्या आतषबाजीसाठी हा मान संपादतील, असा नम्र अंदाज होता. 'प्रेमनगर' नाही तर नाही, 'अमीर-गरीब'चे डायलॉग्ज काय कमी नाटयपूर्ण आणि वास्तव होते? 'अरे, तुझे इतना बडा दिल दिया है, तो क्या तेरा छोटासा दिल नही देंगे?' हा हेमामालिनीनं देव आनंदवर 'मारलेल्या' डायलॉगपेक्षा अधिक 'अर्थपूर्ण' डायलॉग आठवतोय तुम्हाला? पण त्यांच्याकडे काणा डोळा—किंवा बहिरा कान म्हणा हवं तर—करून कैफी आझमींना 'फिल्मफेअर' विभूषित करण्यात आलं आहे.

मग सगळीच पारितोषिकं 'नव्या' किंवा 'वास्तववादी' म्हटल्या जाणाऱ्या चित्रपटांना दिली, असा ओरडा होऊ नये म्हणून की काय, मनोजकुमारच्या हातावर 'रोटी, कपडा और मकान'च्या दिग्दर्शनाबद्दल खाऊ ठेवण्यात आला आहे. बिचारे शाम बेनेगल (अंकुर), बासू भट्टाचार्य (आविष्कार) आणि अनिल गांगुली (कोरा कागज)! 'रोटी, कपडा और मकान'बद्दल एक गोष्ट मात्र लक्षात घेण्यासारखी आहे. सर्वात जास्त म्हणजे ११ शिफारशी या एकट्या 'बोल'पटानं मिळवल्या आहेत. आणि त्यात उत्कृष्ट चित्रपट, दिग्दर्शन, संगीत, साहाय्यक नट व नटी, गीतलेखन, पार्श्वगायन इत्यादी शाखांसह उत्कृष्ट अभिनयाची शिफारस होती. आणि तीही अमिताभ बच्चन किंवा शशिकपूर यांच्या वाटयाला न जाता मनोजकुमारच्या नावे जमा आहे! त्याला ते मिळालं असतं तर...तर निदान एका गोष्टीकरता ते त्याला देणं खचितच चुकीचं ठरलं नसतं. 'अगर मैं तुझे हीरेकी अंगुठी तेरे जनमदिनपर नही दे सका, तो...' इथपासून सुरू होणारा, बाणभट्टाच्या कादंबरीत शोभावा असा लांबलच्चक संवाद आठवा. आणि मग सांगा, एवढा भलामोठा डायलॉग एका दमात, एका सुरात घडाघडा म्हणून दाखवणाऱ्या नटाला दाद नको द्यायला?

...संगीताबाबत कल्याणजी आनंदजींची पुण्याई थोर. 'कोरा कागज'मधलं केवळ एक चांगलं गाणं त्यांना हात देऊन गेलं आहे. तर आर. डी. बर्मन बिचारा याही वेळी चांगलं संगीत देऊन हरला आहे. श्रुतिमाधुर्य आणि वैचित्र्य या दृष्टीनं 'आपकी कसम'चं संगीत सरस असूनही 'कोरा कागज'नं बाजी जिंकली. एक परीनं हे बरं झालं. चांगल्या चित्रपटसंगीतात शब्दरचना अद्याप महत्त्वाची मानली जाते, हे आपोआप सिद्ध झालं आहे.

...जया भादुरी 'फिल्मफेअर'बाबत मिरासदारी निर्माण करणारसं दिसतं. दर वर्षाआड जयाला हे पारितोषिक मिळतंच. व्यक्तिशः जया भादुरीचं 'कोरा कागज'मधलं काम पसंत पडूनही, माझा कल 'अंकुर'च्या शबाना आझमीकडे आहे. निदान शबानाला डावलून हेमामालिनीला 'अमीरगरीब'बद्दल निवडलं नाही, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट. जया भादुरीकरता वेळप्रसंगी खास पारितोषिकाची सोय होते. शबाना आझमीचं दैव तिला अद्याप साथ देत नसावं. नाहीतर डिम्पलचं कौतुक करणाऱ्या 'फिल्मफेअर'नं शबानाची उपेक्षा केली नसती.

'फिल्मफेअर'ची एक गंमत आहे. त्यांच्या पारितोषिकांशी आपलं मत जुळायचं तर त्यांच्याशी लहान मुलांसारखं वागावं लागतं. लहान मुलाकडून एखादी गोष्ट करून घ्यायची असली तर त्याला ती करू नकोसं म्हणूनच सांगायचं, आणि मग ती ते हमखास करून दाखवतंच! आपण आपल्या अपेक्षांच्या बरोबर विरुद्ध नावं 'फिल्मफेअर'कडे पाठवायची. मग ते यंदाच्याप्रमाणे एखाद्या वर्षी, चुकून का होईना, पण आपल्याला पटावी अशा रीतीनं पारितोषिकं देतातच. ■ ■

भारत विश्वविजेता झाला !

# कुर्बां तुमपर ऐ बहार लानेवालो !

श्रीकांत जपे

भारत विश्वविजेता झाला ! कप्तान अजितपालसिंगचे स्वप्न साकार झाले. ज्या क्षणी भारत–पाक सामन्याची ७० मिनिटे संपली, त्याक्षणी कोटयवधी भारतीयांचा आनंद परकोटीस पोहोचला. तब्बल ११ वर्ष ज्या जागतिक अजिक्यपदाने भारतास हुलकावणी दिली होती, ते हॉकी जगताचे सर्वोच्च स्थान भारतास पंजाबच्या या सर्वोत्कृष्ट सेंटर हाफने मिळवून दिले. आता या संघाचे अभूतपूर्व असे स्वागत होईल. पण या संघाचा मार्ग किती अवघड होता, प्रतिकूलता कशी पावलापावलावर आडवी येत होती, याचा कोणीच विशेषसा विचार करणार नाही. जे त्याचे कौतुक सर्वच करतात, पण ह्या विश्वविजयी संघास आपण निरोप कसा दिला होता, याची साधी आठवणसुद्धा कोणाला होणार नाही. खऱ्या क्रीडा–रसिकास मात्र हे चालणार नाही. हे आमचे थोर विश्वविजयी खेळाडू कोणत्या अग्निदिव्यातून गेले याचा विचार करणे आत्यंतिक जरूरीचे आहे. तसेच त्यांचे कौशल्य कसे होते, त्यांचे स्ट्राँग–पॉईन्टस् कोणते होते, तसेच वीक पॉईन्टसूही कोणते होते व शिवाय त्यांना प्रतिस्पर्धी कोणत्या दर्जाचे भेटले, या साऱ्या गोष्टींचा परखडपणे विचार या लेखात करण्याचा मनोदय आहे.

वास्तविक हॉकी या एकाच सांघिक खेळात भारताने गेली जवळजवळ ५० वर्षे एकप्रकारचा दबदबा निर्माण केला आहे. १९२८ च्या ॲमस्टरडॅम ऑलिम्पिकपासून १९६० च्या रोम ऑलिम्पिकपर्यंत भारताने सतत सुवर्णपदक जिंकले. रोमला लेस्ली क्लॉडीयसचा संघ हरला. पण पुन्हा ६४ च्या टोकियो ऑलिम्पिकला मोहिंदरलालच्या पेनल्टी–फ्लिकच्या सुंदर गोलाने भारतास पुन्हा एकदा सुवर्णपदकाचा लाभ मिळवून दिला होता. त्यानंतर मात्र मेक्सिको व म्युनिक ऑलिम्पिकला भारतास ब्रॉन्झवरच समाधान मानावे लागले. ७१ पासून सुरू झालेल्या या विश्वचषक स्पर्धेची सुरुवातही भारताने ब्रॉन्झ पदक मिळवून केली होती. ७३ ला आम्हाला रौप्यावरच समाधान मानावे लागले. म्हणजेच १९६४ पासून १५ मार्च १९७५ पर्यंत भारताचा तिसरा किंवा दुसरा क्रमांक होता. याचाच जरी आम्ही सुवर्णपदक–विजेते नव्हतो तरी या पृथ्वीतलावरच्या एक उत्कृष्ट हॉकी खेळणाऱ्या संघात आमची निश्चितपणे गणना होत होती. इतर सर्व खेळांत मात्र भारत इतकेही स्थान कधीही निर्माण करू शकला नव्हता. (व तसे तो निर्माण ( नजीकच्या भविष्यकाळात) करू शकतो असे मात्र अजीबात वाटत नाहीय. एवढे ) असूनही भारतीय हॉकी खेळाडूंची अक्षरशः परवड गेली १०–१२ वर्षे चालू होती. १९३२ पासून क्रिकेट कसोटी सामन्याचा इतिहास नजरेसमोर आणला तर फारच थोड्या वेळेस भारतीय क्रिकेटर्सनी म्हणावा असा पराक्रम केल्याचे निदर्शनास येते. अजित वाडेकरच्या नेतृत्वाखाली मिळविलेले ते दोन कसोटी सामन्यांतले विजय सोडले तर संपूर्णतया भारतीय क्रिकेट संघ यशस्वी झाल्याचे कधीच झाले नाही. परंतु आमच्या क्रिकेटर्सचे लाट थांबल्याचेही कधीही निदर्शनास आले नाही. सध्या रणजी सामन्यासाठी सुद्धा आमच्या या खेळाडूंना ' फाईव्ह स्टार ' हॉटेलसमध्ये ठेवण्यात येते. इतर सुखसोयी निराळ्याच. परंतु सतत ५० वर्षे ज्या एकुलत्या एका खेळात आम्ही सतत जागतिक दर्जा मिळवितोय, त्या खेळाच्या कलाकारांना मात्र साध्याही सुखसोयी देणे आमच्या क्रीडा–संघटकांना जमत नाही. त्यांची होणारी अवहेलना पाहूनही आमच्या रसिकांना चीड येत नाही. मी हे ॲलगेशन करीत नसून, एक वस्तुस्थिती समोर मांडतोय. उदाहरणादाखल सांगतो. गेल्या वर्षी जेव्हा पुण्यामध्ये हॉकी नॅशनल्स झाल्या तेव्हा भारताचे अशोक, गोविंदा, अजितपाल, सुरजित इत्यादींना, हॉकीचा उद्धार करावयाला निघालेल्या महाराष्ट्र हॉकी संघटनेने अक्षरशः ' एकेका खोलीत सात–सात ' असे कोंबले होते. त्यांना एक बाथरूम १२ ते १५ जणांत वापरावी लागत होती. रोजचा भत्ता होता केवळ ७ रुपये आणि त्या सात रुपयांतूनही तीन रुपये लॉजिंग चार्जेस म्हणून वळते केले जायचे. राहिलेल्या चार रुपयांत या खेळाडूंना जेवण व इतर खर्च भागवावा लागायचा. ही परिस्थिती केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नाही हं, तर पतियाळाच्या राष्ट्रीय क्रीडा संघटनेतही असेच चालते. उलटपक्षी परवा पुण्यास एक फालतू क्रिकेट सामना झाला. टीम्स होत्या ' मुंबई स्टेट बँक विरुद्ध मद्रास बँक. ' एकट्या विश्वनाथचा अपवाद वगळता बाकी सारे खेळाडू फार तर रणजी ट्रॉफी दर्जाचे होते. पण साऱ्यांची व्यवस्था केली होती जिमखान्याच्या अजित हॉटेलमध्ये. येथे तुलना एकाच उद्देशाने केली आहे की, ज्या खेळाडूंनी भारतीय तिरंगा ५० वर्षे गाजविला त्यांची आम्ही परवड करतो व ज्यांनी विशेष अशी

कोणतीच कामगिरी अजूनपर्यंतही केली नाही त्यांना आम्ही डोक्यावर घेऊन नाचतो. अजितपालचा हा विश्वविजयी संघ मलेशियाला जातो किंवा नाही, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे आठवत असेलच. स्पर्धा जेमतेम ४-५ दिवसावर आली होती, परंतु संघाचे जाणे निश्चित नव्हते. कारण हॉकी संघटनेतल्या पदाधिकाऱ्यांमधील दोन गटांची भांडणे. रामस्वामी गटाचे प्रमुख प्रवक्ते पुण्याचे डेव्हिड यांच्याशी जेव्हा मी याबाबत सखोल चर्चा केली तेव्हा त्यांनी मला एकच ठणठणीत उत्तर दिले, ' जपे, आमचा गट लोकशाही पद्धतीनेच निवडून आला आहे. त्यामुळे आधी आम्हाला मान्यता ऑलिम्पिक संघटनेने द्यावयास हवी व नंतरच संघ आमच्याच झेंड्याखाली मलेशियास जाईल. ' यावर जेव्हा विचारले, ' सर्व मान्य, पण या कलहाचा खेळाडूंच्या मन:स्थितीवर होणाऱ्या विपरीत परिणामाचा विचार करावयास हवा. ' यावर या लोकशाही सिद्धान्तावर विश्वास असलेल्या अखिल भारतीय ' हॉकी संघटनेच्या चिटणीसा ' चे उत्तर मोठे मासलेवाईक होते. तो म्हणाला, ' अरे, खेळाडूंचा आमच्या भांडणाशी काय संबंध ? आणि हा संघ काय मेडल् बिडल् जिंकण्याच्या लायकीचा आहे ? सेमी-फायनलला पोहोचले तरीही चालेल. मलेशियाच काय पण मॉन्ट्रियललाही संघ गेला नाही तरी चालेल, पण हॉकी संघटनेतली ही घाण पुरती निघाली पाहिजे. आम्ही निवडून आलो आहोत, आम्हाला या ऑलिम्पिक संघटनेने मान्यताही द्यावयासच हवी.' एका हॉकी संघटकाच्या या वक्तव्यावर जास्त चर्चा करणे योग्य नाही. किंवा त्याची फारशी गरजही वाटत नाही. त्याची बाजू, त्याच्या मनाचा कलच सारे सांगून जातो.

मात्र ही चर्चा संपून जेव्हा मी माझ्या कचेरीत गेलो तेव्हा समजले की, भारतीय हॉकी संघातल्या प्रत्येक खेळाडूने पंतप्रधानांना हस्तक्षेपासाठी विनंती केलीय. ' हे राजकारणी हाकून द्या व आम्हाला मोकळे करा. आम्ही सुवर्णयुग परत आणण्यासाठी जिवाचे रान करणार आहोत. रोज आम्ही ट्रेनिंग कॅम्पमध्ये सात-सात तास खपतोय, पण आमच्याकडे या संघटनेतल्या कोणाचेच लक्ष नाही, ' अशा तऱ्हेची विनंती या १६ विश्वविजेत्यांनी भारताच्या समर्थ पंतप्रधानांना केली. ' खेळाडूंची मन:स्थिती मी जाणतो, ' असे आश्विनीकुमार म्हणाले. पण हॉकी संघटनेचे अध्वर्यू म्हणतात, ' हे सारे ढोंग आहे. हॉकी संघटनेत भांडणे आहेत, हे या खेळाडूंना कसे माहीत झाले ? ही सगळी फूस सहानी, भालिंदरसिंग व आश्विनीकुमारने लावली आहे. हा वर्ल्डकप होऊन जाऊ दे, मग आम्ही या खेळाडूंवर शिस्तभंगाबद्दल इलाज करू. ' मी कोणाचीच बाजू एकांगीपणे मांडत नाहीय. तर या व्यक्तींनी जाहीर केलेली भाषणेच सुसंगतवार मांडतोय.

शेवटी संघ कसाबसा कुआलालंपूरला पोहोचला. यांच्याकडून अपेक्षा काहीच नव्हती. ऑन-लुकरने प्रसिद्ध केलेल्या एस्. पी. सिंग यांच्या लेखाच्या सुरुवातीस म्हटले आहे, ' वर्ल्ड कप भारताने जिंकावा असे साऱ्यांना वाटते, पण सत्याचा विचार करता हे होणे शक्यच नाही. मला कितीही जिंकावा असे वाटले तरी भारतीय संघ जिंकेल असे वाटत नाही. ' म्हणजेच आता समोर दोन विधाने येतात. पहिले खेळाडूंचे, ' आम्ही जिवाची बाजी लावू ', दुसरे एका समीक्षकाचे, ' हा संघ फालतू आहे, त्याच्यात क्षमता नाही. ' परंतु सुरुवातीलाच काय पण १५ मार्चपर्यंतही साऱ्यांना समीक्षकांचे बोल खरे वाटत होते. या संघास साधा निरोपही व्यवस्थित दिला गेला नाही. ते कसेबसेच मलेशियात पोहोचले.

पहिला सामना झाला ब्रिटनबरोबर. दोन विरुद्ध एक गोल्स्‌नी आपण तो जिंकला. गोल्स झाले पेनल्टी-फिलकच्या साहाय्याने. फॉरवर्डस्‌ना गोल करता येत नाहीयत अशी चौफेर बोंब झाली. ब्रिटनचा पराभव किमान ४ गोल्सनी करावयाला हवा होता, आदी वक्तव्ये आधुनिक हॉकीशी विशेष संपर्क नसलेले आणि ' हमारा जमाना कुछ औरही था, ' अशा गप्पा मारणारे एक पुणेरी बडबडू लागले. पण याच सामन्यात भारतीय संघाने पहिली चुणूक दाखविली असे मी म्हणेन. कारण याच सामन्यात भारताला १२ पेनल्टी कॉर्नर्स मिळाले. फील्ड गोल्सही भरपूर झाले असते. यशाचे पहिले चिन्ह म्हणजे फॉरवर्ड लाईनची योग्य मूव्हमेंट इथेच दिसली. आता गोल्स् झाले नाहीत, ते व्हावयास हवे होते हे सारे कबूल. पण पहिल्याच आउटिंगमध्ये, ह्यूमीड ॲटमॉस्फिअरमध्ये व स्लो ग्राऊंडवरची ही कामगिरी उत्तमच होती, असे मला वाटते. सर्वांत उत्तम गोष्ट होती ती ही की, आमचे विंगर्स ' फिलिप्स व हरचरण ' तुफानाप्रमाणे जात होते. गोविंदा व त्याच्यापेक्षा अशोक या सामन्यात छान खेळले. प्रश्न होता सेंटर फॉरवर्डचा. चिमणीचा डॅश पवारमध्ये नव्हता. ' पवार शेवटच्या १० यार्डांपर्यंत मुसंडी मारतो पण त्याला भेजा नाही, ' हे आर्. एस्. जंटलचे वक्तव्य मला पुरते मान्य आहे. एवढे मात्र खरे की, पश्चिम रेल्वेच्या बलबीरसारखे हे दोघेही आमच्या फॉरवर्ड लाइनमध्ये ' फिट्ट ' बसत नव्हते. पण बलबीरची निवड झाली नव्हती. ऐनवेळी इलाज काहीच नव्हता.

इंग्लंडनतर घानाशी मुकाबला होता. परंतु पावसाने पचका केला. त्यानंतर जर्मनीशी सामना सुरू झाला. हरचरणने सुरुवातीलाच गोल करून आघाडी मिळवून दिली. त्या दिवशी झालेल्या ४६ मिनिटांच्या खेळानेच भारताच्या आगामी यशाची चाहूल लागून दिली असे म्हटले तर चुकणार नाही. कारण ' ग्रुप बी 'मध्ये सर्वात बलवान संघ होता पश्चिम जर्मनीचा, व त्याला पुरते नामोहरम करण्याची जिद्द आमच्या संघाने दाखविली होती. ' ऑसीसला हरविणे जमले नाही व अर्जेन्टिनाशी आम्ही हरलो ' या दोन घटनांना मी तितके महत्त्व देणार नाही. कारण पावसाने राडा केलेल्या ग्राऊंडवर हॉकी खेळताच येत नाही. खेळता येतो तो फक्त ' रासक्रीडेचा प्रकार. ' त्यामुळे या अपयशांना हॉकीच्या दृष्टीने फारसे महत्त्व देऊन चालणार नाही. भारत-पाकच्या खेळाडूंना नव्हे, कलाकारांना अशा मैदानावर उतरावे लागले हाच एक संघटकी मूर्खपणा मी म्हणेन. घानाबरोबरचा सामना भारताने ७-० च्या फरकाने जिंकला. आणखीन गोल्स् व्हावयाला हवे होते. परंतु झाले नाहीत, त्यात फारसे बिघडले नाही. कारण ' ऑल आऊट ', ' कोठे जावयाचे व कोठे जावयाचे नाही ', याचा प्रोफेशनल विचार

करता, घानाविरुद्ध ऑल आऊट जाणे जरूरीचे नव्हते, हे कोणीही कबूल करेल. कारणे म्हणजे, स्टॅमिना कायम ठेवणे, पावसाने लडबडलेल्या मैदानावर दुखापती होण्याच्या संकटांना दूर ठेवणे ही होत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे फक्त महत्त्वाच्या व आत्यंतिक जरूरीच्या क्षणीच टॉप फॉर्ममध्ये येणे. ऑलिंपिक व इतर जागतिक स्पर्धांतल्या घटनांचा ज्यांनी अभ्यास केला आहे त्यांना एक गोष्ट निश्चितपणे लक्षात आली असेल की, ‘ फक्त ऐन मोक्याचे वेळीच जगातले सर्वोत्कृष्ट खेळाडू ’ स्वतःच्या टॉप फॉर्ममध्ये खेळतात. इतर वेळी ते रिदम् कायम ठेवतात. ’ जर्मनीशी पुन्हा खेळताना भारताने पुन्हा एकदा आपला टॉप फॉर्म आणला. सामना ३–१ गोल्सच्या फरकाने जिंकला व ‘ ग्रुप बी ’मध्ये टॉप बर्थ मिळविला.

जी तऱ्हा भारताची होती तीच गोष्ट इस्लाउद्दीनच्या पाकिस्तानी संघाची होती. पोलंडच्या संघाचा पराभव करणे त्यांना पहिल्या आउटिंगमध्ये जमले नाही. एकतर शहनाज व रशिद ऐनवेळी नसल्याने त्यांच्या फॉरवर्डस्‌ना पुन्हा रिदम् साधावयाचा होता. शिवाय हे दोन स्टार्स जखमी झाल्याने इतर मंडळी शाबूत ठेवण्याची कामगिरी त्यांच्यावर होतीच. त्यानंतर हॉलंडला पाक पराभूत करेल, ही अपेक्षाही फोल ठरली. कारण ‘ पेनल्टीच्या स्ट्रोक्सच्या नियमाचा पंचांनी केलेला गैरवापर. या सामन्यात पाकिस्तानी फॉरवर्डस् वेल्ड् ग्रीसड् मशिनप्रमाणे काम करीत होते. पाकिस्तानविरुद्ध दिल्या गेलेल्या दुसऱ्या स्ट्रोकचा उल्लेख करणे विशेष जरूरीचे वाटते. ‘ डी ’मध्ये आलेला चेंडू क्लिअर करताना मंझूरचा धक्का चुकूनच डच इन्साइड–राईट मन्ड्ट्‌ला लागला. या फाउलबद्दल वास्तविक पेनल्टी कॉर्नर फार तर द्यावयास हवा होता. परंतु पंचाच्या या निर्णयाचा फायदा डचांना मिळाला. हा सामना पाकने ३–२ च्या फरकाने तरी जिंकावयास हवा होता. परंतु झाले ते वेगळेच. सामना ३–३च्या बरोबरीने अनिर्णित राहिला. या सामन्यात पाकिस्तानी तुफानासारखे भासले. फक्त इस्लाउद्दीन व समीउल्ला मौजूद असताना इन्साइड फॉरवर्डस्‌तर्फे ओपनिंग्ज् करावयाचा प्रयत्न त्यांनी करावयास नको होता.

पाकिस्तानचा न्यूझीलंडबरोबरचा सामना त्यांनी २–१ च्या फरकाने जिंकला. या सामन्याचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण सामन्यात पाकच्या फॉरवर्डस्‌नी केलेल्या आक्रमक चाली. इस्लाउद्दीन व शाहीदनी पहिला गोल करून लीड घेतला. इस्लाने तब्बल ४५ यार्डांचा सोलो करून गोलमाऊथसमोर शाहीदला क्रॉस पास दिला. शाहीदने चेंडू गोलात मारावयाची कामगिरी सहजतेने पार पाडली. दुसरा गोल मध्यंतरानंतर शाहीदनेच सोलो रन करून शेवटी अॅक्यूट अॅन्गलने १० यार्डांची फ्लिक मारून केला. मात्र या सामन्यात पाकचा डिफेन्स उघडा पडला. मंसूर व मुनव्वरचे क्लिअरन्सेस् योजनाबद्ध नव्हते. कसाबसा चेंडू फेकून द्यावयाचा हेच त्यांचे जणू ध्येय होते. स्पेनचा मात्र पाकिस्तानने पुरता खिमा केला. ५–० ने ते विजयी झाले. युरोपच्या या विजेत्या संघाकडून थोडफार



कॅप्टन अजितपाल



पाकिस्तानचा शहनाझ

जिद्दीच्या लढतीची अपेक्षा होती. परंतु इस्ला, समी, झाहीद, मन्सूर ( ज्युनियर ) आणि आझम या फॉरवर्डसपुढे काहीच चालले नाही. कॅरियासारख्या जगप्रसिद्ध गोलकीपरचीही पुरती धांदल उडाली. समीऊल्लाने तर एकदा २०–२२ यार्ड सोलो रन करून, त्याच्या भोवती एक रिंगण मारून ( म्हणजेच त्याला वेढा करून ), पाकिस्तानचा पाचवा गोल केला. समीच्या या गोलाला मी अशोकच्या विजयी गोलाखाली स्थान देईन.

हे झाले दोन्ही संघांच्या लीग सामन्यातल्या कामगिरीबाबत. दोघांचे उद्दिष्ट होते की, फायनलमध्ये गाठ पडावी. ते सुदैवाने व प्रयत्नाने साध्य झाले.

उपान्त्य फेरीत पाक नशिबी ठरला, तर भारताला टेन्शन आले. कारण पाकचा सामना होता पश्चिम जर्मनीशी तर भारताचा यजमान मलेशियाशी. मलेशियाला हरविताना पाकला नाकीनऊ आले होते. कारण पार्टीझन क्राऊडसमोर खेळावयाचे. तसेच मैदानही विशेष सराव नसलेले. त्यामुळे पाकने जेमतेमच २–१ ने मलेशियास पराभूत केले होते. उपान्त्य फेरीत पश्चिम जर्मनीचे जुने देणे त्यांनी मोठ्या आनंदाने देऊ केले. अंतिम फेरीत प्रवेश अगदी गाजत–वाजत केला. पण याच सामन्यात संपूर्ण कस कामाला लावण्यात पाकने थोडी चूक केली असे वाटते. कारण स्पर्धा अजून शिल्लक होती.

भारताने मलेशियास सुंदर लढत दिली असेच म्हणावेसे वाटते. वास्तविक हा सामना ६–२ च्या फरकानेच जिंकता येणे शक्य होते. परंतु शिवाजी पवार आणि गोविंदाच्या हातून काही ' क्लिन सीटर्स ' चुकले. ही मंडळी चेंडू पुश करण्याच्या भानगडीत का पडली हे समजत नाही. अशोकचा खेळही त्याच्या लौकिकास साजेसा या सामन्यात तरी झाला नाही, असे म्हणावे लागेल. कारण सुरजितला सुद्धा फिलिप्सला फीड करावे लागत होते. अर्थात अशोकला ब्लॉक करण्याच्या प्रयत्नात फिलिप्स मोकळा सुटल हे विसरून चालणार नाही. परंतु इन्साइड फॉरवर्डस् निष्प्रभ झाल्याने आमच्या तोंडचे पाणी निष्कारण पळाले होते. तसेच पेनल्टी कॉर्नर्सचा उपयोग सुरजितला करता येत नव्हता हे वेगळेच. अशाच वेळी आस्लम आमचा तारक ठरला. बरोबरी झाली. शेवटी हरचरणने स्वतःच संधी साधून विजयी गोल केला. अर्थात याच सामन्यात ज्या पद्धतीने वा ज्या स्थितीत भारतीय संघाने **' यजमान संघावर मात केली '**, ती अंतिम सामन्याची नांदीच ठरावी.

कारण एकतर मलेशिया आपल्या घरी खेळत होता. संपूर्ण स्टेडियम त्यांच्या बाजूचे होते. तसेच दांडगाई, मारामारी, प्रकाराचाही त्यांनी अवलंब केला. पंचांनी मात्र त्याकडे दुर्लक्ष केले. एवढे असूनही शेवटी त्यांचेच ' पून–फ्लूक–लोक ' व ' खैरुद्दीन ' दमले हे विसरून चालणार नाही. याचाच अर्थ भारतीय संघ ती आत्यंतिक जरूरीची लक्ष्मणरेषा ओलांडू शकत होता. नव्हेस फर्नान्डिसचा अपवाद वगळता सारे काही ठीक होते. आस्लमचा ऐनवेळचा समावेशही संघात एकप्रकारचे ' न्यू लाईफ ' भरण्यासारखा होता. वास्तविक मायकेल किंडो डिफेन्समध्ये आस्लमपेक्षा जास्त चांगला आहे. कारण त्याला पुन्हा रिर्गेनिंग जास्त चांगले जमते. परंतु आस्लम शॉटस् छान मारतो. शिवाय एका ताज्या दमाच्या बॅकला शेवटच्या सामन्यासाठी ऐनवेळी उतरविण्याच्या निर्णयाबद्दल अजितपाल व बलबीरचे अभिनंदनच करावेसे वाटते. कारण पाकिस्तानी फॉरवर्डस्ना थोपविण्यासाठी आम्हाला डिफेन्स जास्तीत जास्त मजबूत हवा होता. तो या निर्णयाने मिळाला. अंतिम सामना भारताने सर्वर्थैव जिंकला असेच म्हणावे लागेल. एका ' तेहरान–एशियन्सचा ' अपवाद वगळता मेक्सिको, म्युनिक वा रोम या प्रत्येक ठिकाणी कौशल्याच्या तुलनेत आमचाच संघ सरस होता. म्युनिकलाही आम्हीच ३.४ वेळ पाकवर ताबा मिळवून होतो. पण ते गोल

मिळत नव्हते. आस्लमच्या आगमनाने आमचा डिफेन्स मजबूत झाला, तर अशोकच्या ऐनवेळी सापडलेल्या फॉर्मने इन्साइड–फॉरवर्डस् जिवंत झाले. फिलिप्सला रोखून अजितपाल, अशोकला मोकळे सोडण्याचा मूर्खपणा अख्तर रसूल, इफ्तिकार व मुन्नव्वर कधीही विसरणार नाहीत, असे वाटते. कारण एकदा अशोकसारखा फॉरवर्ड फॉर्मात आला, तर केवळ चिधडयाच उडावयाच्या. अशोकचे स्कीमिंग इतके उत्तम होते की, त्या तुफानी फिलिप्सला आवर घालणे शक्यच झाले नाही. उलट आधी जर्मनीविरुद्ध ऑलआऊट गेलेल्या समीउल्लास विरींदरला, अजितपालशी सामना करताना, स्वतःचा तोल सांभाळता आला नाही केवळ ७-८ मिनिटांत त्याला बाहेर जावे लागले. 'समी बाहेर जाणे' हाच पाकचा सर्वांत मोठा पराभव होता. एक तर शहनाझ व रशिद आधीच जखमी झाले होते. त्यात ही भर म्हणजे पाकचा पुरताच फडशा पडला, असे म्हणावयाला हरकत नाही.

१५ मार्चला खेळलेल्या भारतीय संघातला एकुलता एक कच्चा दुवा म्हणजे गोलकीपर अशोक दिवाण हाच होय. पाकिस्तानचा गोल 'ऑफ–साईड' आहे किंवा नाही, याबद्दल त्याने निर्णय घेण्याच्या फंदात पडावयाची जरूरी नव्हती. तसेच विरींदर (दोनदा), अजितपाल (एकदा गोललाईनवर सेव्ह), आणि आस्लम व सुरजित यांनी अगणित वेळा त्याला वाचविले. फार काय, शेवटी एकदा अशोकने इस्लाच्या स्टीकवरचाच चेंडू घेऊन त्याला सांभाळले. अर्थात चूक दिवाणची नाही, तर त्याला सिलेक्ट करणाऱ्यांची आहे. त्याच्याजागी वास्तविक जॉन कोरियाला पाठविणे जरूरीचे होते. ह्या दिवाणचा समावेश, रेल्वेच्या अकरा खेळाडूमध्येही झाला नाही, हे त्याच्या दर्जाचे व क्षमतेचे द्योतक आहे. अर्थात अननुभवी व क्षमतेने यथातथा असूनही त्याने शर्थ केली, यात शंकाच नाही. पण ही चूक फार भोवली असती हे विसरून चालणार नाही.

अंतिम सामन्यातला खरा गुन्हेगार मात्र बेळगावचा शिवाजी पवार. फिलिप्स्, हरचरण आणि अशोकने पाकिस्तानी 'डी' मध्ये काढून दिलेले–अगदी ५–७ यार्डावरचे–सेंटर्स याला जमविता आले नाहीत. एकच अपेक्षा की हा लवकरात लवकर सुधारावा. सलीम शेरवानीसारखा गोलकीपर नेहेमीच बीट होत नाही, हे या शिवाजी पवारने पक्के ठसवून घ्यावे. बाकी सारा संघ पाकविरुद्ध टॉप फॉर्मात होता. सुरजितचा फक्त एकच फटका चुकला असे मी म्हणेन. गोल्स् झाले नाहीत याचे कारण मुन्नव्वर, मंसूर व शेरदिल सलीम शेरवानी. मंसूरने आस्लमचा एक तुफानी टोला गोल लाईनवर थांबविला. सुरजितने कनव्हर्ट केलेला तो पेनल्टी कॉर्नर मात्र या स्पर्धेतला सर्वोत्कृष्ट फटका ठरावा. ३५ अंशाचा तो फटका अडविणे कठीणच होते, नव्हे अशक्यच होते.

ध्यानचंदचा मुलगा–नव्हे वारसदार अशोककुमारच्या गोलाचीही जितकी स्तुती करावी तितकी कमीच. फिलिप्सचा सेंटर व्यवस्थित घेऊन १५ यार्डावरून चेंडू फ्लिक करणे व सलीमला पुरते चकविणे, हे कार्य बहुतांशी स्वप्नातच घडते.

पण या खेपेस सारे कसे स्वप्नवत घडले. क्षमता, कौशल्य, जिद्द व सर्वस्व पणाला लावून, सतत होणारी मानहानी सोसून आमच्या संघाने विश्वविजेतेपद खेचून आणले. यापूर्वीही आम्ही या पदावर अनेक वेळा आरूढ झालो होतो. परंतु या संघास जे काय सोसावे लागले, त्याची नुसते बसून कल्पना येणे कठीणच आहे.

यानंतर येतो एक सर्वांत महत्त्वाचा मुद्दा. भारत व पाकिस्तानचे संघ गोलकीपर, दोन बॅकस, तीन व्हाव्हज व पाच फॉरवर्डस् या पद्धतीने खेळतात. तर युरोपीय देश गोलकीपर, एक फुलबॅक, दोन बॅकस्, तीन व्हाव्हज व चार फॉरवर्डस्चा उपयोग करतात. प्रसंगी तीनच फॉरवर्डस् ठेवून, चार व्हाव्हज ठेवतात. भारत पाकचा खेळ हा शॉर्ट पासिंग, ड्रिबलिंग आणि



फिलिप्स गोविन्दा

बॉडी–स्वर्व्हचा उपयोग करून, आक्रमणावर मुख्यत्वे भर देणारा असतो. तसेच विंग्जचा उपयोग करून, डी मध्ये सेंटर्स पाठविण्यावर आमचा भर असतो. या उलट युरोपीय पद्धत ही 'चेंडू बडव व पळ' या तत्वावर अवलंबून असते. कारण म्हणजे त्यांना एकतर बोजडपणामुळे कलात्मक खेळ करणे शक्य नसते. तसेच 'मॅन-टू-मॅन मार्किंग' प्रकाराचाही ते अवलंब करतात यामुळे दांडगाईचा खेळ होतो. ब्रिटनच्या डिफेन्डर्सनी अशोक व चिमणीला आणि नंतर जर्मन डिफेन्डर्सनी विरींदर व फिलिप्सला ज्या प्रकाराने मारले त्याबद्दल त्यांना 'हॉकीचे प्राथमिक स्वरूप' पुन्हा एकदा समजावावे असे वाटते. या उलट भारत-पाक सामना हा हॉकीदृष्ट्या सदैवच सर्वोत्कृष्ट कलेचा आविष्कार म्हणून यासाठीच गणला जातो. 'रफगेम' होत नाही. खेळात तुफानी गती असते. पॉझिटिव्ह अॅटॅकिंग मूव्हज् असतात. कंटाळा असा अजीबात येत नाही. मलेशियाच्या दलदलयुक्त मैदानांवर वास्तविक ही पद्धत खेळावयास कठीण होती परंतु तीच खरी हॉकी खेळावयाची पद्धत आहे, हे भारत व पाकने सिद्ध केले. या उलट युरोपीय देश अपेक्षेप्रमाणे छान नटवले. हॉकीमध्ये त्यांनी जरी काही प्रगती केलेली असली तरी शेवटी ती होती एका सरड्याची धाव. ती आमच्या 'तुफानांना' कशी थोपविणार होती ? हॉकीचा खेळ जितका कंटाळवाणा करता येईल व त्यात जितकी दांडगाई भरता येईल, तितके करण्याचा युरोपने आतापर्यंत प्रयत्न केला आहे. पेनल्टी बुलीत भारत-पाकचे खेळाडू फक्त कुशल म्हणून त्यांच्या जागी पेनल्टी स्ट्रोकचा उपयोग आणला. नंतर 'ऑफ साईड' प्रकरण आले. नतर पेनल्टी स्ट्रोकचा सर्रास व मुक्तहस्ताने वापर करण्यात येऊ लागला. कसेही करून खऱ्या कलाकारांना हरविण्याचा मूळ हेतू या कलाहीन, दिशाहीन हॉकी खेळणाऱ्या युरोपीय देशांचा होता. परंतु शेवटी कुआलालंपूरला त्यांचा पुरता फडशा पाडला गेला. या घटनेमुळे 'आपली पद्धत सोडून द्या व युरोपीय पद्धतीचा अवलंब करा' असा अनाहूत व मूर्ख सल्ला देणाऱ्या तथाकथित भारतीय हॉकी समीक्षकांनाही छान दणका बसला.

या समीक्षणाच्या शेवटी आठवतात व्यवस्थापक बलवीरसिंगचे बोल–' केवळ त्या विधात्याच्या आशीर्वादामुळेच आम्ही विजयी झालो'. हे वाचून काही 'मॉडर्न' व 'उच्चभ्रू' व हायसोसायटी मंडळी टिंगलही उडवावयाचा प्रयत्न करतील. मला मात्र बलबीरचे मत तंतोतंत पटते. श्रद्धास्थान असणे पाप निश्चितच नाही. विशेषतः खेळाडूंच्या जीवनात काही असे प्रसंग येतात की सर्वस्व पणाला लावूनही पुरेसे झाले, असे वाटत नाही. तेव्हा त्या विधात्याची प्रार्थना उपयोगी पडते. आमच्या भारतीय संघाला त्या विधात्याशिवाय कोणताच दुसरा पाठीराखा नव्हता, हे तर लेखाच्या सुरुवातीला पाहिले. या प्रसंगी असाच या क्रीडाइतिहासातला एक सुवर्णक्षण आठवतो.

'हेलसिंकीच्या ऑलिम्पिक मध्ये बॉब रिचर्डस् नावाचा एक पोल व्हॉल्टर भाग घेत होता. तो सुवर्णपदक जिंकणार अशीही साऱ्यांची खात्री होती. पण पहिल्याच दिवशी त्याच्या डाव्या पायाचा स्नायू दुखावला. ज्यांना थोडेफार खेळाचे ज्ञान आहे ते तरी समजतील की अशा अवस्थेत पोल व्हॉल्ट जंप तर सोडाच, पण साधे चालणेही कठीण जाते. इथे तर स्टार्ट घेतल्यापासून फायनल लीप मारताना सर्व गोष्टीच डाव्या पायावर जोर देऊन कराव्या लागणार होत्या. बॉबने एकदा प्रयत्न केला. पण पायात सुरी खुपसल्याप्रमाणे वेदना झाल्या.

बिचारा ! पुरता निराश होऊन परतला. ज्यासाठी इतके धडपडलो तेच आता केवळ दुर्दैवाच्या आघातामुळे मिळणार नव्हते. निराशेच्या जणू सागरात बुडून तो रूममध्ये परतत होता. तेवढ्यात त्याला त्याचा कोच ब्रूटस् हॅमिल्टन भेटला व तो म्हणाला, 'बॉब, अरे ज्यांची त्या विधात्यावर श्रद्धा आहे, त्याच्यावर विश्वास आहे व जे सर्वस्व पणाला लावतात त्यांच्या तो मदतीला धावतो.' या मैत्रीच्या बोलाचा त्याच्यावर परिणाम झाला. प्रार्थना करून तो पुन्हा मैदानात उतरला.

फायनल सुरू झाली. १४ फूट ११½ इंचावर क्रॉसबार गेला. केवळ दोनच स्पर्धक उरले–एक बॉब रिचर्डस् व दुसरा डॉन लॅश. दोघांच्याही पहिल्या दोन जंपस चुकल्या. डॉनची तिसरीही चुकली. आली बॉबची शेवटची पाळी. ७० हजार प्रेक्षकांचे डोळे त्याच्याकडे लागले होते. चौफेर शांतता होती. बॉबला क्रॉसबार २५ फूट उंचीवर आहे असे वाटू लागले. हातापायाला घाम फुटला. जगाचा अंत समीप झाला आहे, असेही वाटले. पण त्याच क्षणी त्याने मस्तक नमवून, 'परमेश्वरा, तूच माझा पाठीराखा. मला माझे सर्वस्व पणाला लावायला मदत कर,' अशी प्रार्थना केली. क्षणार्धात त्याचे मन शांत झाले. टेन्शन नाहीसे झाले. रिलॅक्सड्मूड परत येऊ लागला. शरीरात पुन्हा ताकद येऊ लागली. मन प्रसन्न झाले. दुखापतीचा विसर पडला. त्याने स्टार्ट घेतला. उसळी मारली. जवळ जवळ ५ इंच जास्त उडी मारून वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केले.'

एका विश्वविजेत्याच्या जीवनातला हा परमोच्च यशाचा क्षण सांगावयाचे कारण एकच की बलबीरच्या श्रद्धेस तडा गेला नाही. एकाकी पडलेल्या आमच्या या विश्वविजेत्यांना परमेश्वराने मदत केली. (अर्थात अजूनही काहींना ते पटणार नाही परंतु ही मंडळी बहुतांशाने आयुष्यात कधीच मैदानावर उतरत नाहीत. त्यांची कदर कोण करतो.) इसलिए एकही चीज कह सकता हूँ, 'बहार वापस लानेवालो तुमपर मैं कुर्बान जाऊँ तो भी कुछ नहीं !

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १० सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगाव

# २० जाने. ७४ ला आंदोलनाचा पहिला इशारा आम्ही दिला होता

मुखपृष्ठ २ वरून

प्रश्नात आस्थेने फारसा भाग न घेणारा प्राध्यापक आज अन्याया-विरुद्ध, उभा राहिला आहे. जो स्वत: अन्याय सहन करतो तो विद्यार्थ्याला अन्यायाविरुद्ध उभा रहा हे कसे काय सांगणार? विद्यार्थ्यात प्रखर सामाजिक जाणीव निर्माण करणारा प्राध्यापक आज हवा आहे.'

'ते ठीक आहे. परंतु प्राध्यापकांनी ट्रेड-युनियनचे मार्ग अवलंबावे हे कितकेसे योग्य ठरते का?'

'समाजात बौद्धिक व शारीरिक कष्ट करणाऱ्याला त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळतो का? नाही मिळत. तो जर मिळवायचा असेल तर संघटना उभारल्या पाहिजेत. कार्यक्रम ठरविले पाहिजेत. पाठिंबा मिळविला पाहिजे. हे करण्यात गैर काय आहे. आमचा प्राध्यापकांचा आजचा लढा हा पददलीत जनतेच्या लढ्याचा एक भाग आहे.

'वेतनाच्या प्रश्नापुरताच हा लढा मर्यादित आहे का?'

'सध्या तरी आहे. संघटना बळकट होत जाईल, समाजातील इतर घटकांचे लढे प्रबळ होतील तसतसे अनेक विधायक कार्यक्रम हाती घेता येतील. पण अर्थात या सर्व पुढच्या गोष्टी झाल्या. आताच त्याबद्दल बोलणे फारसे बरोबर ठरणार नाही.

बहिष्काराचा प्रश्न धसास लावण्यात तरुण प्राध्यापकांचा पुढाकार. भरघोस पाठिंबा. अर्थात वेतन श्रेणी लागू झाली तर सर्वात जास्त फायदा त्यांचाच आहे. त्यापैकी एकाशी दिलखुलास चर्चा.

'लोकांना आमच्या सुट्ट्या दिसतात. दोनतीनच तास रोज शिकवावं लागतं ते दिसतं. पण इतर झंझटी दिसत नाहीत. एक-तास शिकवायचं (मनापासून) तर तीन तास घरी तयारी करावी लागते. सुट्ट्या असल्या तरी परीक्षा असतात, पेपर तपासणं असतं सातत्याने वाचून ठेवावं लागतं.'

'संघटनेची गरज का भासली?'

'एकटा प्राध्यापक काय करणार? कुठे कुठे तोंड देणार. दर-वर्षी सालं आम्ही फ्रेश होतो. मॅनेजमेंट कन्फर्म करीत नाही. विद्यार्थी त्रास देतात. आम्ही जायचे तरी कुणाकडे. मॅनेजमेंटशी वाकडं आलं तर नोकरी जायची भिती, विद्यार्थ्यांशी कसं वागावं तेच कळत नाही. फर्ग्युसनमध्ये प्राध्यापकाला मारहाण झाल्याचा प्रकार डोळ्या-समोर आहेच. शासनही दुर्लक्ष करते. राजकीय पक्ष वाटेल तसा उपयोग करून घेतात. मग अशा वेळी दाद मागण्यासाठी, न्यायलढा देण्यासाठी संघटना नको? संघटना आमची ताकद आहे बाबा. त्याशिवाय आज कोण ऐकतं?'

प्राध्यापकावर भावीपीढी निर्माण करण्याची नैतिक जबाबदारी टाकणाऱ्या समाजाला विचार करायला लावणारा, अस्वस्थ करणारा तरुण प्राध्यापक मित्राचा अगतिक प्रश्न बरेच काही सांगून जातो. ◻

णे विद्यापीठातील प्राध्यापकांची लढाऊ संघटना उभारणाऱ्या

प्रा. सौ. नलिनी तारळेकर यांची भेट घेतली. बाईंना ट्रेड युनियनचा पूर्वीचा अनुभव आहे. तेथेच प्रा. एन्. डी. मेहताही भेटले.

प्राध्यापकांच्या मागण्या न्याय्य असतील पण ऐन परीक्षेच्यावेळी बहिष्काराचा निर्णय घेऊन अडवणूकीचे धोरण तुम्ही स्वीकारले आहे असा आरोप आहे.'

'परीक्षांवरील बहिष्काराचा आमचा निर्णय काही आम्ही आताच घेतलेला नाही. आमचे फ्लॅश आंदोलन नाही. २० जानेवारी १९७४ रोजी मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा विद्या-पीठाला दिला होता व त्याच वेळी एक अस्थायी समिती नेमण्यात आली. नव्या शैक्षणिक आकृतिबंधामुळे प्राध्यापक बेकार होणार असून त्यांना कामावरून काढणे सहज शक्य व्हावे म्हणून शासनाने कोणत्याही प्राध्यापकाला कामावर कायम न करण्याचे आदेश काढले. त्यावर विचार करण्यासाठी जळगाव येथे २५ ऑगस्ट रोजी भरलेल्या प्राध्यापकांच्या मेळाव्यात ३१ डिसेंबर ७४ पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास एप्रिल ७५ मध्ये होणाऱ्या परीक्षांवर बहिष्कार घालणार असल्याचा इशारा शासन व विद्यापीठास देण्यात आला. परंतु त्याची दखल घेण्यात न आल्यामुळे २० जानेवारी ७५ रोजी विद्यापीठांच्या परीक्षांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय आम्ही घेतला.'

'तुमच्या मागण्यांबाबत शासनाचे धोरण काय आहे?'


'आमच्या प्रश्नाचा शासन सहानुभूतीने विचार करीत आहे, असे मला वाटत नाही. शासनाचे धोरण चालढकलीचे आहे. १५ मार्चला शिक्षणमंत्री जाहीर करतात, १५ दिवसांत निर्णय जाहीर करू व १९ तारखेला काही निवडक प्रतिनिधींशी चर्चा करतात. बहिष्कारा-चेही आंदोलन फोडता आले तर पाहावे, असा शासनाचा प्रयत्न दिसतो.'

'आंदोलनामागे काही राजकीय पक्षाचा पाठिंबा किंवा विरोध.'

'राजकीय पक्षांपासून हे आंदोलन अलिप्त ठेवण्यात आम्ही यश मिळविलेलं आहे.'

'बहिष्काराचा निर्णय घेताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व आर्थिक

मलपृष्ठ २ वर



नॅशनल
ब्लॅक टूथ पावडर
कापूस, नेत्रांजन, बाळगोळी
उत्पादक
...अँड सन्स, २८ नवी पेठ, पुणे ३०

# प्राध्यापकांचे हे आंदोलन म्हणजे धुमसत असलेल्या असंतोपाचा स्फोट

नुकसानीचा विचार करण्यात आला काय ?'

'निश्चितपणे. या आंदोलनापासून विद्यार्थ्यांना आम्ही दूर ठेवले आहे. त्यांनी त्यांचा अभ्यास करावा व आमच्या आंदोलनाला विरोध करू नये, इतपत आम्ही काळजी घेतली आहे. आमचा लढा लढविण्यास आम्ही समर्थ आहोत. विद्यार्थी लढ्यात उतरले तर काय होईल, काही सांगता येत नाही.' ◻

'आमच्या ग्रामीण भागातील प्राध्यापकांचे प्रश्न शहरी प्राध्यापकांपेक्षा फार बिकट आहेत. नोकरीची शाश्वती नाही. पगार वेळेवर व पूर्ण नाहीत. गावगुंडांच्या राजकारणाला तोंड द्यावे लागते. शिवाजी विद्यापीठाने परीक्षा पुढे ढकलल्या आहेत.' सातारा जिल्हा प्राध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. विष्णूपंत जगताप सांगत होते, 'सातारा, सांगली, फलटण, कोल्हापूर, वाई येथे पालक व विद्यार्थी यांच्या संयुक्त सभा घेऊन त्यांना आम्ही आमची भूमिका सांगितली. अनेक विद्यार्थी संघटना व सामाजिक संस्थांचा आंदोलनाला आम्ही पाठिंबा मिळविला आहे. विद्यार्थ्यांच्या मनात आमच्या आंदोलनाविषयी नाराजी नाही. उलट बिहारधर्तीवर आंदोलन करू का अशी मागणी आहे. पण आम्हीच त्यांना थोपवून धरले आहे.'

ज्याच्यावर जबरदस्त अन्याय झाला आहे, असा ग्रामीण भागातील कॉलेजमधील एका तरुण प्राध्यापकाची प्रतिक्रिया फारच तीव्र. 'आम्हाला नैतिक जबाबदाऱ्या शिकवता, पण शासनाला सांगा की ? आम्हीच काय घोडं मारलंय. २५ वर्षे अन्याय आमच्या उरावर मारला, त्याचं काही नाही का ?' ग्रामीण महाविद्यालयेसुद्धा राजकारणाचा अड्डा. त्यावर विचारले असता तो म्हणाला, 'आम्हाला फोडण्याचे ढीग प्रयत्न झाले. काही पक्षाचे कार्यकर्ते आम्हाला सांगतात, पुण्याच्या बामणांच्या का नादी लागता ? तर इथं सांगतात, त्या छत्रपतींच्या नादी का लागता. पण आम्ही बुद्धिवादी काय खुळे नाही. आमच्या आंदोलनापासून राजकारण लांब आहे.'

'पुटा'च्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिलेले प्रा. भाऊसाहेब पटवर्धन यांचा बहिष्काराच्या आंदोलनाला पूर्ण पाठिंबा आहे. परंतु नैतिकदृष्ट्या वेतनश्रेणीची मागणी व बहिष्काराचे आंदोलन त्या परिस्थितीत पटत नव्हते व सर्वसाधारण सभेने तर बहिष्काराचा निर्णय घेतल्यामुळे राजीनामा दिल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील प्राध्यापकांचे प्रश्न जास्त ज्वलंत असल्याने त्या भागात संघटना बांधणे, लढाऊ धोरण आखणे शक्य झाले. परंतु पुण्यासारख्या शहरात ते फार अवघड होते. 'पुटा'च्या अपयशाचे कारण त्यांनी स्पष्ट केले. ◻

प्राध्यापकांचं हे आंदोलन एकाएकी उभं राहिलंय, असं वाटत नाही. धुमसत असलेला असंतोष, मॅनेजमेंटची हॅरॅसमेंट, सर्वच बाबतीत असुरक्षितता यामुळे प्राध्यापक संघटनांची ताकद वाढत गेली आहे. प्रश्न सामोपचाराने, चर्चेने सुटत नसतील तर ते आंदोलनाने, लोकशाही मार्गाने सोडविण्यास कोणाचाही विरोध नाही. पण या बहिष्काराच्या आंदोलनाचे पडसाद अनेक तऱ्हेने उमटणार असून, त्याचे अनेक परिणाम होणार आहेत. होस्टेलमध्ये राहणारे विद्यार्थी आहेत, बाहेरून परीक्षेला बसणारे नोकरदार रजा केव्हा काढावी, या संभ्रमात पडले आहेत, पालक चिंताग्रस्त आहेत, डिग्री घेणाऱ्यांच्या नोकरीचा प्रश्न आहे, इतर प्रोफेशनल संस्थामध्ये प्रवेश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रश्नही विचार करायला लावणारा आहे. या बहिष्काराच्या आंदोलनाबाबत गैरसमजच असंख्य पसरलेले आढळले. अर्थात याची जबाबदारी आंदोलनाच्या संयोजकांवरच असून, त्यांनी जनसंपर्कासाठी प्रयत्न केलेला नाही, हे नक्की.

या आंदोलनाचा पहिला तडाखा ज्यांच्यावर बसणार आहे, त्या विद्यार्थ्यांना याबद्दल काय वाटते. त्यांचा प्राध्यापकांना पाठिंबा आहे की विरोध आहे ? विद्यार्थ्यांच्या संमिश्र प्रतिक्रिया आढळल्या. परंतु विद्यार्थी संघटना मात्र याबाबत मौन धारण करून बसल्या आहेत.

नॅशनल स्टुडंटस् युनियनने एक पत्रक काढलंय व त्यात परीक्षा वेळेवर न झाल्यास शासन व प्राध्यापकांना विद्यार्थ्यांच्या बहिष्कारास तोंड द्यावे लागेल, असे म्हटले आहे. पण हा बहिष्कार कोणत्या स्वरूपाचा वगैरे काहीही स्पष्ट केलेले नाही. अर्थात या संघटनेची ताकदही बेताचीच असल्याने त्याला फारसे महत्त्वही नाही. धुळे-जळगावचे विद्यार्थी प्रा. तारळेकरबाईंना तुमच्या आंदोलनाचे काय झाले, परीक्षा केव्हा होणार, असे विचारतात तर पुण्याचे प्रा. एन्. डी. मेहता यांना 'सर, परीक्षा किती दिवस पुढे ढकलणार, कॅन्सल होणार का' असे प्रश्न विचारतात.

या बहिष्काराच्या आंदोलनामुळे परीक्षा पुढे ढकलल्या जातीलही. प्राध्यापकांच्या मागण्या मान्य होतील किंवा होणारही नाहीत. परंतु या आंदोलनाच्या निमित्ताने एकत्र आलेला बुद्धिजीवी कामगार आपले आंदोलन कोणत्या पद्धतीने लढवितो, त्यातील निर्माण झालेल्या शक्तीचा शैक्षणिक क्षेत्रातील विधायक क्रांतीसाठी कितपत उपयोग करून घेतो, सामाजिक जाण ठेवून समाज प्रबोधनात, दलित पतीतांच्या न्याय लढ्यात कितपत सहभागी होतो, हे पाहावयाचे आहे. ◻ ◻